# माणूस

शनिवार १५ सप्टेंबर १९७९ □ ७५ पैसे



पाकिस्तान
आणि इराण
यांच्याविरुद्ध घोषणा देणाऱ्या
अशा अनेक मिरवणुकी
काबुल शहरात
खेड्यापाड्यातून
आणवल्या जातात....

# आपल्याकडे आणीबाणी असताना जशा आणवल्या जात होत्या...!

अफगाणिस्थान लेखमाला
लेखांक चवथा

**पुरुषोत्तम करंडक** पण करंडकाची एकही एकांकिका नाही (पृष्ठ २१)

# सप्रेम नमस्कार..



▫ छाया दातारांच्या मताबद्दल माझेही मत अगदीच थोडक्यात—

२१।९।७९ च्या अकात छाया दातार म्हणतात 'ब्राह्मण व व्यापारी यांचा पाठिंबा संघाला मिळाला' व 'ब्राह्मण व व्यापारी समाज यांचे हितसंबंध व संघ यांचे एकात्मीकरण पूर्णतः झालेले असल्याने त्यांच्यात संघाबद्दल जी निष्ठा व कडवेपणा येईल तो इतर समाजघटकात येणे कठीण आहे.'

वरील दोन्ही विधाने सत्य आहेत असे मानल्यास संघाला निश्चितच फार मोठे भविष्य आहे. किंवा असे तरी म्हणावे लागेल, की व्यापारी या शब्दाचा अर्थ काहीतरी संकुचित असावा. ब्राह्मण व व्यापारी (?) आणि संघ यांचे एकात्मीकरण झाले असते तर आज जी संघाबद्दल फालतू ओरड होत आहे ती झालीच नसती.

उलट आज सामान्य जनता संघाकडे आकर्षित होऊ लागली आहे. ज्या ग्रामीण भागात, विशेषतः खेड्यात संघाचे नावही नव्हते, त्याच भागात आज संघाची शक्ती वाढते आहे. तालुक्याच्या ठिकाणी तर संघाबद्दल अतिशय चांगल्या भावना दिसतात व विशेष म्हणजे त्या सर्वसामान्य माणसांच्या; विशिष्ट जातीजमातीच्या नव्हे. म्हणूनच संघ ही सतत विकसित होणारी संघटना बनली आहे. तिचे भविष्य उज्वल आहे पण थोडाकाळ वाट पहायला हवी.

२ सप्टेंबर **रमेश बाहेती**, पाथर्डी

---

# मला मत द्या....

मी अनंत मोरेश्वर ओक.

एक सामान्य, कोठल्याही मतप्रणालीशी बांधिलकी नसलेला, नागरिक. आजपर्यंत कोणत्याही नगरपालिकेच्यासुद्धा निवडणुकीत भाग घेतलेला नाही. माझे नांव आजूबाजूच्या दोन घरापलिकडे माहित असेल की नाही ह्याचीही शंका आहे. ह्या निवडणुकीशी प्रत्यक्षाप्रत्यक्ष संबंध येईल अशी स्वप्नातही कल्पना नव्हती.

पण—

गेल्या काही महिन्यातल्या घडामोडी ऐकल्या, वाचाव्या लागल्या आणि मन एकाएकी आक्रंदून उठलं.

स्वातंत्र्याचा हाच का उपयोग? हिंदुस्थानच्या नागरिकाला सामाजिक जाणीव राष्ट्रीय जागृती नाही असा वारंवार घोष ऐकावा लागतो. पण अनेक हिवाळे, उन्हाळे, पावसाळे काढलेल्या राजकारणी मुत्सद्यांनीही काही वेगळे आदर्श आम्हाला दिले का?

मी निवडणुकीला उभा रहातो आहे. माझ्याजवळ पैसा नाही. माणूसबळ नाही ते तंत्र मला अवगत नाही. घरोघरी हिंडण्याइतपत माझ्याजवळ फौजफाटा नाही. मी स्वतःही हिंडणार नाही. स्वतःचा प्रचार करायला म्हणून बाहेर पडणार नाही. हे पत्र ही तुमची माझी पहिली व शेवटची भेट. माझ्यासारखाच तुम्हालाही उबग आला असेल तर मला मत द्या. दिया तो भला न दिया तोही भला.

कारण ही मानाची शर्तीची झुंज नाही.

गेल्या काही महिन्यातील, देशातील परिस्थितीकडे संपूर्णपणे पाठ फिरवून राजकारणी मुत्सद्यांच्या एकमेकांवर चाललेल्या डावपेचाने उबग आलेल्या एका अतिसामान्य नागरिकाची ही प्रतिक्रिया आहे.

यदा कदाचित निवडून आलोच तर समोरच्या प्रश्नावर, स्वतःच्या सद्सद्विवेक बुद्धीवर विसंबून मत देईन ते कदाचित फिरते असेल. पण सद्सद्विवेक बुद्धीला जागून असेल तेव्हा,

विचार करा — आणि मला मत द्या.

१० सप्टेंबर **अनंत मोरेश्वर ओक**

▫ मी काही माणूसचा नियमित वाचक नाही. 'माणूस' जेव्हा छोटचा आकारात येत असे त्यावेळी माझे एक शिवसेनेचे समर्थन


**साप्ताहिक माणूस**

**वर्ष : एकोणिसावे**
**अंक : सोळावा**
**१५ सप्टेंबर १९७९**
**किंमत : ७५ पैसे**

संपादक
**श्री. ग. माजगावकर**
साहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**सौ. निर्मला पुरंदरे**
वार्षिक वर्गणी :
**चाळीस रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४ ३४ ५९

करणारे पत्र आपल्या अंकात प्रसिद्ध झाले होते. मी माणूस मुखपृष्ठ पाहून कधीकधी विकत घेतो.

परंतु गेले काही आठवडे मला हे आपणास दिलखुलासपणे सांगावेसे वाटते, की 'माणूस'ने मला झपाटलेच आहे. 'माणूस'ची मी दर सप्ताहास चातकाप्रमाणे वाट पहात असतो. याचे कारण म्हणजे 'कुरुक्षेत्र केरळ' ही सतीश कामत व विनय हर्डीकर यांची लेखमाला. पण ही लेखमाला मी संपूर्ण वाचली नाही. पहिला लेख वाचला नंतरचे २।३ अंक माझे चुकले. मला माहीत नव्हते, की ती लेखमाला होती म्हणून आणि नंतर चौथा का पाचवा लेख वाचला आणि मधले लेख सुटल्याबद्दल मला हुरहुर लागली.

श्री. विनय हर्डीकरांचे आपण प्रकाशित केलेले 'जनांचा प्रवाहो चालिला' हे पुस्तक माझे संग्रही आहे. त्यात विनय हर्डीकर कट्टर संघवाले आज नाहीत हे मी वाचले तरीही ते पुस्तक प्रत्येक रा. स्व. संघीयांनी वाचावे असे माझे मत ठरले. कारण त्या पुस्तकातून पक्षपातीपणा किंवा द्वेषभावना दिसून येत नाही. तद्वतच 'कुरुक्षेत्र केरळ' या लेखमालेविषयी म्हणता येईल.

सतीश कामत आणि हर्डीकर या लेखक द्वयाचे मी मन:पूर्वक अभिनंदन करतो. प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन तेथील संघाच्या कार्याची माहिती घेऊन नि:पक्षपातीपणे त्यांनी जे लेखन केले आहे त्याला खरोखरच तोड नाही. आज संघावर टीका होत असता आपण संघ काय कार्य करतो ते प्रसिद्ध केले ते सुद्धा आपण कट्टर संघवाले नसताना याबद्दल खरोखरच आपले आभार मानले पाहिजेत. सदर लेखमालेत संघाबद्दल उगाच काहीतरी प्रशस्ती नाही तर केरळ आणि महाराष्ट्र यांतील संघनेतृत्वाची तुलना, महाराष्ट्रातील नेतृत्वातील वैगुण्य, कमतरता याचेही विवेचन केले आहे आणि ते योग्यच आहे. माझी आपणास अशी विनंती आहे की आपण कृपया ही लेखमाला 'कुरुक्षेत्र केरळ' या नावाने छोटयाशा पुस्तकरूपाने प्रसिद्ध करावी. म्हणजे माझ्यासारख्या संघ प्रेमींना ती संग्रही ठेवता येईल. त्या लेखमालेचे आणखी एक यश म्हणजे नुकत्याच मुंबई सकाळच्या अग्रलेखात संघावर आज जे टीकेचे काहूर उठले आहे त्यावर उत्तर देताना संघाच्या बाजूने आपल्या 'कुरुक्षेत्र केरळ' या लेखमालेचा आधार घेऊन संघाचे काम कसे चालते याविषयी लिहिले आहे. म्हणजे दैनिकांचे संपादक 'माणूस लेखमालेचा' आधार घेतात हे आपले यश नव्हे काय? कृपया आपण या लेखक द्वयीला इतरत्रही जेथे संघाचे काम चालू असेल तेथे पाठवावे. यात संघाची आपण यापुढे तरफदारीच करावी हे अभिप्रेत नाही. कुकर्मावर प्रहार आणि सत्कर्माची प्रशस्ती असेच आपले धोरण असावे. पाठीवर शाबासकी दिल्याने सत्कार्य करणाऱ्यांना आणखी बळ चढते. आपल्यासारख्या जो संघाचा कधीच पुरस्कर्ता नव्हता, त्यांच्याकडून अशाच आणखी लेखमालांची आवश्यकता / अपेक्षा आहे:

सध्याच्या राजकीय परिस्थितीवरील 'श्री. भगवान उवाच' ही दोन भागात प्रसिद्ध झालेली सतीश कामत यांची आधुनिक गीता-खरोखरच अवर्णनीय. 'या अंधार यात्रेचे फलित काय?' हा चंद्रशेखर पुरंदरे यांचा लेख, दिल्लीची श्री. मंदार फडके यांची लेखमाला व कालच्या आठवडयातील त्याचे आपले 'Summing-up' ही आवडले. आपले लेखन नि:पक्षपातीपणे केलेले, समतोल असते याबद्दल वादच नाही.

आता 'माणूस' नियमित वाचावयाचा म्हणतोय्-बघू या.

२५ ऑगस्ट **माधव बिवलकर, मुंबई**

---

## पुण्यातील गणेशोत्सव

# 'हे' जरा फारच झालं

**-प्रतिनिधी**

---

पुण्यातील गणपतीउत्सव ही एक दंतकथा आहे. इथल्या मूर्ती, इथली रोषणाई, इथले मानाचे गणपती, इथली मिरवणूक-प्रत्येक बाबीला काही तरी आख्यायिका चिकटलेली आहे. मुद्दाम बाहेरगावाहून पुण्याचे गणपती पाह्यला येणारे तर त्यामुळे अवाक होतातच; पण ज्या काही खास 'पुणेरी' गोष्टींबद्दल पुणेकरही भाव (आणि थापा) मारतात त्यात गणपतीउत्सव ही एक आहे.

यंदा तर गणेशभक्तांसाठी एक खास आकर्षण होतं. इथल्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात येणार होती. साहजिकच गणेशचतुर्थीच्या दिवशी सकाळपासूनच सिटीपोस्ट चौकातील या गणपतीसमोर भाविकांची मोठीच गर्दी जमू लागली. ज्यांच्या खिशात १००१ रु. होते असे श्रीमान हेलिकॉप्टरमधून येऊन ५० किलो फुलं गणपतीवर उधळणार होते. म्हणजे तशी संधी मिळणं कठीण नव्हतं. उलट कोणत्या तरी मार्गाने मिळवलेले पैसे सन्मार्गी लागणार होते. सकाळचे नऊ वाजले आणि पहिले श्रीमान हेलिकॉप्टमधून गणपतीच्या डोक्यावर आले. गणरायाने हळूच मान वर करून पाहिलं. आपल्याजवळ एक हजार रुपये असते तर? त्याच्या मनात विचार आला. अंगावरील दागिने विकून पैसे उभे करावेत असाही विचार त्याच्या मनात आला नसेलच असं नाही; पण पुन्हा आपण फुलं कोणावर ओतायची, हा प्रश्न त्यांच्या मनात आला आणि 'जे जे होईल ते ते पाहणे' हा तुकोबाचा अभंग गुणगुणत तो स्वस्थ झाला.

हेलिकॉप्टर अगदी डोक्यावर आलं. फुलांची टोपली उलटी केली गेली; पण दुष्ट वारा ती फुलं लांब लांबच नेऊ लागला. तेव्हा गणरायानेच शक्य तितकी हालचाल करून फुलं आपल्या अंगावर पाडून घेतली. काही फुलं भक्तगणांच्याच अंगावर पडली. त्यांनीही ती गणरायाचा प्रसाद म्हणून खिशात घातली. समुदायातील माता आणि भगिनींनी तशाही गर्दीत लांब देठाची फुलं अचूक निवडून डोकीत माळली; पण काही अभागी फुलं मात्र पायदळी तुडवली गेली.

पन्नास किलोपैकी किलोभरही आपल्या अंगावर न पडल्याने गणराया हिरमुसला, पुढल्या फेरीची वाट पाहू लागला; पण पुढल्याही वेळी यापेक्षा फार काही निराळं घडलं नाही. शेवटी गणरायाच्या लक्षात आलं की, हे काही आपल्यासाठी चाललेलं नाही. एक हजार रुपयात हेलिकॉप्टरमधून फेरी मारायला मिळणार म्हणून काहीजण आले होते. हेलिकॉप्टरमधून अन्नपाकिटं टाकली जातात हे ऐकलेलं होतं; पण प्रत्यक्ष पडताना पाहण्याची किंवा झेलण्याची संधी फारच थोडयांना लाभली असेल. त्यामुळे हेलिकॉप्टरमधून ५० किलो फुलं पडताना दिसतात तरी कशी, हे पाहण्यासाठी अनेकजण जमा झाले होते. ही खाली पडणारी फुलं वेचून त्यांचे वाटे करून विकता येतील या हिशेबी वृत्तीनेही कोणी आले नसतीलच असं नाही. तीन तासपर्यंत हा उद्योग चालला होता. हेलिकॉप्टरची शेवटली फेरी झाली आणि सर्वजण तृप्त मनाने परतू लागले. हेलिकॉप्टरमधून चक्कर मारायला मिळाली आणि हजार रुपयेही कामी आले म्हणून काही जण तृप्त झाले, हे अभूतपूर्व दृश्य 'याचि देही याचि डोळा' पाहचला मिळालं आणि आता आयुष्यभर त्याच्या गप्पा मारता येतील या या कल्पनेने काहीजणांचे आत्मे निवले; तर फूल ना फुलाची पाकळी खिशात पडली. म्हणून काही जण तृप्त झाले. तृप्त नव्हता फक्त एकच जण-- श्रीगणराया ! ज्याच्यासाठी हे सारं चाललं होतं असं इतर सर्वजण म्हणत होते तोच अतृप्त राहिला होता.

त्याला कळत नव्हतं की, हे सारं कशासाठी करण्यात आलं होतं ? मोर्वी-विदर्भाचं शल्य विघ्नहर्त्याच्या मनात ताजं होतं. शेजारच्या घरात मृत्यू झाला म्हणून अलीकडल्या घरातलीही चूल न पेटण्याचे दिवस आता भूतकालात जमा झाल्याचं त्याला माहीत होतं; पण शेजारच्या घरात मृत्यू झाला असताना आपल्या घरासमोर रोषणाई करण्याची अमानुषता गणरायालाही नवीन होती. हजारो रुपयांचा त्याच्या नावे चाललेला हा चुराडा त्याला पाहवत नव्हता; पण तो करू तरी काय शकत होता ? आता तो उत्सवमूर्ती होता.

□

विसर्जनाच्यावेळी तर याहूनही निराळा प्रकार घडला. श्रीमंत दटडूशेठ हलवायांचा गणपती फार जागृत, नवसाला पावणारा. साहजिकच नवस बोलणाऱ्यांनी आणि फेडणाऱ्यांनी नारळाच्या राशी त्याच्या पायाशी ओतल्या होत्या. विसर्जनाच्या वेळी हे नारळही मिरवणुकीत नेण्यात आले. मिरवणूक विसर्जनाच्या ठिकाणी पोचल्यावर गणपतीला वाहिलेली हार-फुलं भाविकांना प्रसाद म्हणून वाटण्यात आली. पण नारळांची मात्र तिथेच विक्री होऊ लागली. सव्वा रुपयाला एक नारळ या दराने हे भाविकांनी वाहिलेले नारळ विकले जाऊ लागले. सव्वा रुपया खिशातून निघाला नाही तर दिलेला नारळ ओरबाडून परत घेऊ जाऊ लागला. 'श्रीमंत दगडूशेठ' या नावाला हे निश्चितच शोभादायक नव्हते. पण गणपतीच्या संयोजकांचा हा हिशेबीपणा थक्क करणारा होता. हार-फुलांप्रमाणेच हे नारळही वाटून टाकणं योग्य ठरलं असतं. पण मग हेलिकॉप्टरमधून फुलं ओतता आली नसती. दागिन्यांनी नखशिखांत मढवता आलं नसतं. हजारो दिव्यांच्या झगमगीत रथामधून मिरवणूक काढता आली नसती ! आणि कोणत्याही उत्सवामध्ये उत्सवमूर्तीला काय आवडेल यापेक्षाही हा उत्सव साजरा करणाऱ्यांना काय हवं आहे, हेच महत्त्वाचं नसतं का ?

□

मानाच्या गणपतीच्या बाबतीत घडलेले हे प्रकार वगळता यंदा पुण्यातील गणपतीउत्सव दरवर्षीप्रमाणेच उत्तमपणे पार पडला. चौथ्या पाचव्या दिवशी आलेल्या जोरदार पावसामुळे गणपती पाहात हिंडणाऱ्यांची थोडी कुचंबणा झाली, पण ही कसर त्यांनी शेवटल्या दोन दिवसात भरून काढली. नेत्रदीपक विद्युत्‌रोषणाई हे आता एखाद्याच गणपतीचं वैशिष्टय राहिलेलं नाही. ज्यांची खर्च करण्याची ऐपत आहे अशी सर्वच गणेशोत्सव मंडळं देखाव्यापेक्षा विद्युतरोषणाईच अधिक पसंत करतात. कारण एक तर यामध्ये त्यांना काहीच कष्ट नसतात आणि दुसरं म्हणजे हल्ली लोकांचीही आवड विद्युतरोषणाईकडे अधिक झुकू लागली आहे. काहीजण तर म्हणे, अशी रोषणाई नसेल तर वर्गणी द्यायचंही नाकारतात.

अर्थात् ज्या काही थोडचा ठिकाणी देखावे उभे करण्यात आले होते त्यात पौराणिक राजकीय असे दोनच विषय प्रामुख्याने होते. दिल्लीतील सत्तास्पर्धा गोखलेनगर रहिवासी संघाने फारच प्रभावीपणे सादर केली होती आणि हे असंच चालू द्यायचं का, असा सवालही प्रेक्षकासमोर टाकला होता. तसंच येत्या मध्यावधी निवडणुकीत विचारपूर्वक मतदान करण्याचं आवाहन केलं होतं. गणेशोत्सव सुरु करण्यामागील लो. टिळकांचं उद्दिष्ट याहून काय निराळं होत? टेल्को गणेशोत्सव मंडळाने केलेली फुलांची सजावटही अतिशय प्रेक्षणीय होती.

मोर्वी-विदर्भाचं भान पुण्यातल्या मानाच्या गणपतींनी जरी ठेवलं नाही तरी इतर अनेक लहान-मोठ्या मंडळानी आपापल्या परीने पूरग्रस्त निधीला हातभार लावला. काहींनी विद्युतरोषणाईचे पैसे वाचविले तर काहींनी मिरवणुकीचे ! शेवटी प्रश्न किती पैसे दिले हा नसतो, तर वृत्तीचा असतो. पुण्यातली गणेशोत्सव मंडळं त्यात मागे पडली नाहीत.

नातूबाग गणेशोत्सव मंडळाच्या कार्यकर्त्यांचा एक मनोदयही इथे नमूद करण्यासारखा आहे. पुढील वर्षापासून हे मंडळ विद्युतरोषणाईवर होणाऱ्या चार-साडेचार हजार रुपयांच्या खर्चाला पूर्णपणे फाटा देणार आहे व तो पैसा लोकशिक्षणात्मक व लोकरंजनात्मक कार्यक्रमांवर खर्च करणार आहे. त्यांचा हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय आहे कारण गणेशोत्सवाच्या मूळ उद्दिष्टाशी तो कुठेतरी नातं सांगणारा आहे ! □

# बोधगया : ना रहेगा मठ, ना रहेगा महंत

शेखर सोनाळकर

राजकारणाबाहेर राहून संपूर्ण क्रांतीचे काम करणारी ध्येयवादी तरुणांची एक संघटना जयप्रकाशजींनी काढली. छात्र युवा संघर्ष वाहिनी भारतभर पसरलेली ही तरुणांची संघटना ठिकठिकाणी आदिवासी, शेतमजूर यांच्यात जाऊन जमिनीच्या मूलभूत प्रश्नावर लढत आहे. मग महाराष्ट्रात मुंबईचे शुभा आणि जतीन आपले ऐषआरामी जीवन सोडून तलासरीच्या आदिवासी भागात जाऊन आदिवासींचे लढे उभारतात. देवेन्द्र मेळघाटला आदिवासींमध्ये पाय रोवून काम करतो तर मोहन चंद्रपूरमध्ये जबरनजोत आंदोलन चालवतो.

बिहारमध्ये तर अधिक व्यापक प्रमाणावर भूमिहीनांचे लढे लढवले जात आहेत. बिहारमध्ये ठिकठिकाणी देवांच्या नावाने चालवले जाणारे मठ आहेत. या मठाचा एक महंत असतो. देवाच्या नावावर हजारो एकर जमीन बाळगली जाते आणि देवाच्या नावाने या संपत्तीचा भोग महंत घेत असतो. हे महंत राजकारणावरही वरचष्मा गाजवितात. कारण मतदान केंद्रे ताब्यात घेऊन एक गठ्ठा मतदान घडवून आणण्याचे सामर्थ्य त्यांच्याकडे असते. यामुळे राजकारणी लोक महंतांना दुखवत नाहीत. या महंतांकडे गुंडांची फौजही असते. बेकायदेशीर विनापरवाना हत्यारे (बंदुका, पिस्तुलं) असतात. आपल्या विभागातील शेतमजुरावर दशहत बसवून हे शोषणाचे काम झोपलेल्या देवाच्या नावाने महंत पार पाडीत असतात.

असाच एक मठ आहे, बोधगयेचा. भगवान बुद्धाने स्थापन केलेला जगप्रसिद्ध मठ आहे. जवळच हा शंकराचार्यांचा मठ आहे. या मठाचे महंत धनसुख गिरी आहेत. या मठाची हजारो एकर जमीन आहे, या महंतांनी एक, दोन नाही ४० खोटे ट्रस्ट बनविले आहेत. या सर्व ट्रस्टचे मालक स्वतः महंत आहेत. या ट्रस्टच्या नावाने हजारो एकर जमीन आहे. बेनामी, अस्तित्वातच नसलेल्यांच्याही नावाने जमिनी आहेत. हे सर्व कायदे गुंडाळून सिलिंगपेक्षा जास्त जमीन असताना सर्व काही गेली कित्येक वर्षं बिनबोभाट सुरू आहेत. बोधगया भागात या महंतांची १२,००० एकर जमीन आहे. तर भारत भरात ६८,००० एकर जमीन आहे. ही सर्वच्या सर्व जमीन दरवर्षी पिकवण्याची गरज महंताला वाटत नाही. यामुळे मोठी जमीन बेकार व पडून राहते.

१९७४ मध्ये बिहार आंदोलन सुरू झाले. युवकांना नवा उत्साह मिळाला. समाजाचा, गरिबीचा विचार करीत करीत ते या जमिनीच्या प्रश्नाशी जोडले गेले, बिहार आंदोलनाच्या काळात या लोकनायक जयप्रकाश नारायण यांच्या नेतृत्वाखाली बोधगयेच्या हजारो भूमिहीन, दलित, शोषित लोकांनी या मठासमोर सामुदायिक उपोषण करून महंताची बेकायदेशीर जमीन शेतमजुरांना वाटण्याची मागणी केली होती. यावेळी महंतांच्या १८ ट्रस्टपैकी १७ ट्रस्ट बेकायदेशीर घोषित झाले होते. पण आजपर्यंत हे ट्रस्ट अस्तित्वात आहेत व प्रत्यक्षात कोणतीही कारवाई सरकारने केलेली नाही.

बिहारमधील संघर्ष वाहिनीचे ५०० प्रमुख कार्यकर्ते बोधगयेला जमले. १५ दिवस त्यांनी गावोगावच्या जमिनीच्या मालकीचा सर्व्हे केला. बेकायदेशीर व्यवहारांची माहिती गोळा केली. आणि ८ एप्रिल ७८ ला बोधगयेच्या महंतावर ७०० मजुरांसह मोर्चा नेला आणि संघर्ष वाहिनीने महंताच्या शोषणाविरुद्धची आपली लढाई सुरू केली.

'जे ही जमीन कसतात तेच या जमिनीचे मालक आहेत. त्यांचा जमिनीवर आणि पिकांवर अधिकार आहे. तो अधिकार ते मिळविणारच' या भूमिकेतून संघर्ष वाहिनी या शेतमजुरांना संघटित करीत आहे. सध्या ३ पूर्ण वेळ कार्यकर्ते-कारु, प्रभात आणि रंजन तेथे कायम असतात. इतर अनेक कार्यकर्ते महिना दोन महिन्यांसाठी जाऊन राहतात. असे कायम १५/२० कार्यकर्ते तेथे ठाण मांडून असतात. ८ एप्रिल ७८ पासून प्रत्येक गावात दरमहा एक मोर्चा व एक दिवसाची शेतमजुरांची बैठक झाली आहे.

शेतमजुरांच्या केवळ आर्थिक लढ्याशी वाहिनी लढते आहे, असे नव्हे. तेथील लोकांत दारू पिण्याची आणि बायकांना मारण्याची प्रवृत्ती सर्वत्र आहे. संघर्ष वाहिनीच्या कार्यकर्त्यांनी या संबंधातही लोकांशी सतत बोलून, चर्चा करून लोकशिक्षणाचा प्रयत्न केला. स्त्रियांना या प्रश्नावर संघटित केले. आपल्या नवऱ्यांनी दारू पिऊन आपल्याला मारू नये यासाठी आता तेथील स्त्रिया सामुदायिक रीतीने बंड करून उठल्या आहेत. शेतमजुरांमधील परस्परांमधले जातिभेद व जातिभावना दूर करण्याचा सतत प्रयत्न केला जातो.

बिहारमध्ये संघर्षवाहिनीच्या कार्यकर्त्यांनी मजदूर किसान समितीच्या नावाने शेतमजुरांची संघटना स्थापन केली आहे. मजदूर–किसान समिती बोधगयेच्या गावागावात स्थापन झाली आहे. आणि या मजदूर-किसान समितीच्या द्वारे हा लढा लढविला जात आहे. हळूहळू हा लढा अधिकाधिक व्यापक होत जात होता. असहयोगाचे आंदोलन सुरू होते. म्हणजे ही आमची जमीन जोपर्यंत आमच्या नावाने होत नाही तोपर्यंत आम्ही महंताकडे ही जमीन कसण्यासाठी मजुरी करणार नाही व इतर कोणालाही ही जमीन कसू देणार नाही, असे आंदोलनाचे स्वरूप होते. हे आंदोलन २९ गावांत सुरू होते व २९ गावांतील महंताची जमीन शेतमजूर कसू देत नव्हते. त्यामुळे महंत संतापला होता.

आपल्यासमोर ब्र शब्द न उच्चारणारी ही भुखी-नंगी माणसे आपल्याला जाब विचारायला उभी राहतात यामुळे त्याचा अहंकार दुखावला होता.

### मजूर मजुरांशी लढणार नाही

८ ऑगस्टला मस्तीपूर या गावी महंताची माणसे जीप व ॲबॅसेडर मधून आली. दूरच्या गावातून त्यांनी मजूर आणले होते व ते जमीन कसू लागले. या महंताच्या माणसांमध्ये बंदूकधारी होते आणि लाठीधारी पहिलवानही होते. गावातील सर्व पुरुषमंडळी कामाच्या बदल्यात धान्य ( फुड फॉर वर्क ) योजनेखाली कामाला गेली होती. गावात फक्त स्त्रिया होत्या. त्यांनी मोर्चा काढायचे ठरविले. २५० लोकांच्या मोर्च्यात १५० स्त्रिया व ५० लहान मुले होती. वाहिनीचा कोणीही कार्यकर्ता मोर्चा काढतेवेळी नव्हता. हा मोर्चा सुरू झाल्यानंतर काही वेळाने वाहिनीचा पूर्ण वेळ कार्यकर्ता कारू तेथे पोहोचला व तो मोर्च्यात सामील झाला. महंताची माणसे कसत असलेल्या शेताजवळ मोर्चा येताच शेतात काम करीत असलेले मजूर काम सोडून दूर जाऊन उभे राहिले. कारण त्या भागात संघर्ष वाहिनीने ही भावना निर्माण केली आहे की मजूर मजुरांशी लढणार नाहीत. पोटासाठी जरी या मजुरांनी शेतावर काम करणे सुरू केले होते, तरी मनातून महंताचा पराभव व्हावा हीच त्यांची इच्छा होती. मोर्च्याने महंतांच्या माणसांनी शेती सोडून निघून जावे अशी मागणी केली. याला प्रति-उत्तर म्हणून महंताच्या गुंडांने मोर्च्यावर बॉंब फेकला, व गोळीबार करीत ते जीप व ॲबॅसीडरमध्ये बसून निघून गेले. यामुळे दोन शेतमजूर कार्यकर्ते रामदेव माजी आणि पांचु माजी मरण पावले. आणि ५ जण जखमी झाले. हे सर्व आदिवासी शेतमजूर कार्यकर्ते आहेत. त्यांच्यापैकी जानकी माजी गंभीर रीत्या जखमी असून त्यांच्या जांघेत गोळी शिरली आहे व कदाचित त्यांचा पाय तोडावा लागेल अशी परिस्थिती आहे.

महंताच्या लाठीधाऱ्यांसोबत एक गुमस्ता रामधारसिंग होते. हे रामधारसिंग जरी महंताकडे काम करीत असले तरी शेतमजुरांच्या आंदोलनाला त्यांची सहानुभूती होती. त्याच्याच घरात रहाणारा त्यांचा पुतण्या प्रदीप हा संघर्ष वाहिनीचा एक प्रमुख सक्रिय कार्यकर्ता होता. आपल्याच नोकराच्या घरातील एका तरुणाने आपल्या विरुद्धच्या संघर्षात अग्रभागी रहावे हे महंताला सहन होत नव्हे. महंताच्या गुंडांपैकी गिरीजासिंग याने रामधारीसिंगला ठार मारले. व ते सर्व गुंड गाडीत बसून तडक पोलिस चौकीत गेले व त्यांनी रामधारीसिंगला मारण्याचा खोटा आरोप संघर्ष वाहिनीवर करून आरोपी नं. १ रामधारीसिंगचा पुतण्या प्रदीपला केले. म्हणजे जणू काही पुतण्याने व्यक्तिगत वैरातून काकाचा खून केला असे दाखविण्याचा हा खोटारडा प्रयत्न आहे.

महंताच्या माणसांनी तक्रार केली म्हणून लगेच २० मिनिटांत पोलिस आले. समोर घायाळ अवस्थेत पडलेल्या शेतमजूर कार्यकर्त्यांकडे पूर्ण दुर्लक्ष करून वाहिनीच्या ५ कार्यकर्त्यांना अटक करून घेऊन गेले. आमचे कार्यकर्ते महंताच्या गुडांनी मारले आहेत. काही जखमी आहेत या आक्रोशाकडे दुर्लक्ष करून उलट सर्व प्रमुख ५ कार्यकर्त्यांना अटक करून घेऊन गेले.

तेवढ्यात वाहिनीच्या कार्यकर्त्या कांचन आणि कुमुद तेथे पोहोचल्या. त्यांनी जखमी लोकांना सरकारी दवाखान्यात नेले. पण डॉक्टरांवर सुद्धा महंताची दहशत असावी किंवा आर्थिक हितसंबंध असावेत. डॉक्टरने उपचार करण्यास नकार दिला. कांचन आणि कुमुदला काय करावे समजेना. त्या जखमींना घेऊन पोलीस चौकीत गेल्या व तक्रार नोंदविण्याची व जखमींना वैद्यकीय उपचार मिळावेत अशी त्यांनी मागणी केली. त्यांचे काही ऐकून न घेता त्यांनाच पोलीस चौकीतून हाकलून देण्यात आले.

अटक केलेल्या कार्यकर्त्यांना पोलिसांनी अमानुष मारहाण केली. प्रभातने ठाणेदारांच्या प्रश्नांना बाणेदारपणाने उत्तरे दिलीत व त्याला रंजन आणि सुशीलने साथ दिली म्हणून तर या तिघांना इतके मारले की त्यांना हालचाल करणेही कठीण जात होते. मारहाण करून जबरदस्तीने या कार्यकर्त्यांच्या कोऱ्या कागदावर पोलिसांनी सह्या घेतल्या. त्यांना मॅजिस्ट्रेट समोर न आणता पोलिस कस्टडी देण्यांत आली.

९ तारखेपासून संपूर्ण विहारमधून कार्यकर्त्यांचा ओघ बोधगयेकडे वाहू लागला. १५ ऑगस्टला हजारो शेतमजूर दलित आदिवासी तरुण यांचा मोर्चा महंताच्या मठावर गेला, एक जाहीर सभा झाली. या सभेत हा लढा शांततामय मार्गाने अंतिम विजयापर्यंत चालू ठेवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. संघर्ष वाहिनीचे २५ प्रमुख पूर्णवेळ कार्यकर्ते आता बोधगयेला ठाण मांडून बसणार आहेत.

वाहिनी नायक जयप्रकाश नारायण यांनी या संघर्षाला आपला आशीर्वाद दिला आहे. कोणत्याही अवस्थेत माघार घेऊ नये आणि शांततामय मार्ग सोडू नये अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे. ह्या गोळीबाराने आंदोलन दबले तर नाहीच उलट आंदोलन अधिक तीव्र झाले. पूर्वी २९ गावात असहयोग सुरू होता आता ४६ गावात असहयोग सुरू आहे. विहारचे मुख्य मंत्री शाम सुंदरदास यांनी ज्या जमिनीच्या मालकाचा पत्ता नाही, अशा ८००० एकर जमिनीचे वाटप भूमिहीनांना करण्याचे कबूल केले आहे.

### संघर्ष वाहिनीच्या मागण्या

**१ : बोध गयेच्या जमिनीचे वाटप भूमिहीनांना करा.**

**२ : मठाच्या ट्रस्टीजना हत्या केल्याबद्दल अटक करा.**

**३ : कार्यकर्त्यांवर भरलेले खोटे खटले मागे घ्या.**

**४ : संपूर्ण घटनेची न्यायालयीन चौकशी करा.**

**५ : महंताजवळील हत्यारांचा व वाहनांचा वापर बेकायदेशीर कामासाठी व दहशत पसरविण्यासाठी होत असल्याने महंताजवळील हत्यारे आणि वाहने जप्त करा.**

### वाहिनीची भूमिका

**१ : आम्ही कायद्याची लढाई कोर्टात लढत बसणार नाही. महंताच्या बेकायदेशीर गोष्टींची माहिती जनतेला व सरकारला जरूर देऊ. कारवाई करायची किंवा नाही ते सरकारने ठरवावे. आम्ही मात्र शेतमजुरांच्या संघटित शक्तीवर लढू.**

**२ : हा मजुरी वाढविण्याचा लढा नाही. जमिनीचा लढा आहे. एकूणच व्यवस्था परिवर्तनाचा हा लढा आहे.**

**३ : शांततामय संघर्ष हा आमचा बचावात्मक पवित्रा नाही तर आमच्या हातातील एक आक्रमणाचे हत्यार आहे. कोणतेही हत्यार नसलेल्या भुख्या शेतमजुरांची संघटित ताकद जमीनदारांच्या सर्व हत्यारांचा पराभव करून विजयी होणार आहे. हा बोधगयेचा विजय महाराष्ट्रातील शेतमजुरांचा विजय होणार आहे, हा दलित शोषित जनतेचा लढा सर्व दलित–शोषितांचा लढा आहे.** □

# इस्त्री कोण बिघडवू शकेल ?

गेल्या अंकातील (माणूस : दि. ८ सप्टेंबर) पुण्याच्या बी. जे. मेडिकलमधील 'डॉक्टर जगवतात की नागवतात' या परिसंवादाचा वृत्तान्त वाचून वाईच्या डॉ. शरद अभ्यंकर यांनी पुढील लेख अनुवाद करून पाठविला. मूळ लेखक डॉ. अभय बंग.

---

काही वर्षापूर्वीची गोष्ट. मिर्झापूर जिल्ह्यात काम करणाऱ्या एका सेवाभावी संस्थेचा कार्यकर्ता म्हणून मी त्या वेळी काम करत होतो. जंगलातून वसलेल्या खेड्यांतून फिरत होतो. एक गोष्ट लक्षात आली की, जवळच बभनी नावाच्या गावात प्राथमिक आरोग्य केंद्र होते; पण लोक तिथे जायला नाखूष असत. थोडे आश्चर्य वाटले. एक दिवस जाऊन भेटलो–

'हॅलो, डॉक्टर!' डॉक्टर अगदी तरुण होते. ओळख वगैरे झाली. वर्षातले चार महिने डॉक्टर इथे केंद्रावर असतात. बाकी काळ शहरातल्या आपल्या घरी! त्यांचे वरिष्ठही असेच करतात, तेव्हा यांना कोण विचारणार? माझी ओळख झाल्यावर त्याला आश्चर्य वाटते, 'चंदीगडला एम्. डी. सोडून इथे यार तुम्ही कशाला आला? किती ओसाड मुलूख आहे हा! आपण गेली दोन वर्ष इथं काळ्या पाण्यावर असल्यासारखे आहोत. एकदम बोअर!' त्याची व्यथा.

मी त्याला स्पष्टीकरण देतो, 'एम्. डी. झाल्यावर आपल्या देशातलीच खेडी काळ्या पाण्यासमान वाटू नयेत म्हणून आतापासून जरा सवय करतो आहे.'

मी इथे थोडा काळच रहाणार आहे, हे समजल्यावर माझ्याबद्दलची त्याची करुणा जरा कमी झाली. नाही तर माझ्याबद्दलच्या दयेने आणि काळजीने त्याचे पाणी झाले होते.

'इथे क्षयरोगाचे प्रमाण बरेच आहे, नाही? तुम्ही काही प्रतिरोधक उपाय करता का?' मी विचारतो.

'क्षयरोग? कुठं आहे क्षयरोग? मी तर गेल्या दीड वर्षात एकच केस पाहिली.'

मी विचारात पडतो. गेले तीन महिने मी रोज दोन–तीन नवे क्षयरोगी पहातो आहे. डॉ. रागिणीवहेननी गेल्या ८–१० वर्षांत शेकडो रोग्यांना इथेच उपचार केले आहेत. सूक्ष्मदर्शकातून पाहिलेले लालचुटुक क्षयरोगाचे जंतू, माशा माझ्या डोळ्यांपुढे फिरू लागतात.

'इथल्या सॅनिटेशनकरता आपण काय करता?' मी दिशा बदलून प्रश्न करतो.

'हां, कधी काळी कुणी आलाच हरीचा लाल मागायला तर थोडी ब्लीचिंग पावडर देतो. तीसुद्धा आता जुनी झाल्यामुळे फक्त चुना होऊन गेली आहे.' त्याचे थंड उत्तर.

'रोज साधारण किती पेशंट येतात तुमच्याकडे?' माझे कुतूहल.

'येतात साले दोन–तीन. सीरियस रोगी तर मी वर्जभगत बघितलाच नाही. आमच्यापाशी औषधे तरी कुठाहेत? फक्त सल्फा, अॅस्पिरिन, मल्टिव्हिटॅमिन. पेशंट येत नाहीत तेच बरे आहे. आले तर मी देणार तरी काय त्यांना?'

'मग दिवसभर तुम्ही करता तरी काय?' मला काही समजत नाही.

'कसा तरी वेळ घालवतो यार. बी. डी. ओ. बरोबर बॅडमिंटन नाही तर कॅरम खेळतो. असंच काही तरी करतो झालं!'

त्या मागासलेल्या आदिवासी भागाच्या जंगलात बॅडमिंटन खेळण्याची कल्पना मला मोठी मनोरंजक वाटली; पण त्याहीपेक्षा आश्चर्य वाटले ते याचे की, इथल्या नोकरीच्या काळातच हे महाशय कौलालंपूरला जाऊन अमेरिकेतील हॉस्पिटल्सची प्रवेशपरीक्षा (ECFMG) पास झाले होते. 'अमेरिकेत जाऊन मानसोपचारतज्ज्ञ होईन, यार.'

'इथं एकट्याला करमत नाही, तर पत्नीला का इथं आणत नाही?' मी शेवटचा प्रश्न विचारतो.

माझ्याकडे अतिशय कीव भरल्या नजरेने पहात तो उत्तरला, 'इंपाला गाडी कधी या पायवाटेने जाताना पाहिली आहे का? त्याचप्रमाणे भाऊसाहेब, आमची पत्नी कानपूर सोडून इथे येणार नाही. दिवसाआड पिक्चर पाहिल्याशिवाय तिचे भागत नाही. अजून मुलं नाहीत; पण होतील तेव्हा इथं कॉन्व्हेंट शाळा कुठली मिळायला हो?'

खिन्न मनाने त्या दिवशी मी परत आलो. बराच विचार केला. नाइलाज म्हणून खेड्यात गेलेले, किंवा पाठवलेले डॉक्टर त्या जागेला काळ्या पाण्याची शिक्षा मानून स्वत:ला वटवाघूळासारखे उलटे टांगून ऊर्ध्व लावून बसतात–शहराच्या किंवा अमेरिकेच्या दिशेने. शिक्षण आणि त्याबरोबर येणारी शहरी संस्कृती त्यांना आपल्याच देशाच्या मातीपासून तोडून टाकते. स्वत:च्याच देशाच्या खेडेगावात ते परदेशी बनून जातात. 'मानसशास्त्र शिकायला अमेरिकेला जाताय; पण डॉक्टरमहाशय, छिन्न व्यक्तित्व (schizophrenia) तर तुमच्यातच पहायला मिळतंय!' त्या दिवशी मी मनात विचार केला होता.

WHO च्या मते वैद्यकीय शिक्षणक्रमाकरता प्रवेश घेणारे बहुतेक विद्यार्थी शहरी उच्च वर्गातले असतात. याशिवाय ब्रिटिश वसाहतवादावरून वारसा मिळालेली आमची वैद्यकीय शिक्षण आणि उपचारपद्धती–आम्ही नुसती प्राप्त केली नाही तर जोपासली आहे. या अर्ध्या हळकुंडाने पिवळे झालेले त्या बभनीच्या डॉक्टरबाबूसारखे डॉक्टर मग यातून निर्माण होतात. याकरता संपूर्ण सांस्कृतिक क्रांतीचीच आवश्यकता आहे.

माओने चीनमध्ये हे करून दाखवले आहे. गांधीजींनी भारतात असे वातावरण निर्माण केले होते की, मोठमोठे बॅरिस्टर झालेले पुढारी, धोतर नसून गांधीजींच्या आश्रमात भाजी चिरण्यात किंवा झाडू मारण्यात कमीपणा मानत नसत. या दोन्ही नेत्यांनी एका पिढीची सांस्कृतिक मूल्ये, आकांक्षा आणि आचरण बदलून टाकले होते. आजच्या तरुण डॉक्टरांच्या शहरी टेरिकॉटच्या पॅंटची इस्त्री कोण बिघडवू शकेल? कोणती पद्धती वापरून? काय प्रेरणा देऊन?

केवळ भारताच्या आरोग्यव्यवस्थेची पहाणी करून वा ग्रामीण सेवा योजनेत दाखल होण्यापेक्षा डॉक्टर रहाणे का पसंत करतात याची नुसती चर्चा करून भागणार नाही तर पुढे जाऊन हे बदलून दाखवले पाहिजे. □

[ Medico Friends Bulletin वरून संपादकीय सौजन्याने ]

# निवडणुका

## लोकशाही शक्ती दुभंगल्या

**वा. दा. रानडे**

लोकसभेच्या येत्या मुदतपूर्व निवडणुकीतील निवडणूक समझोते, युत्या, आघाड्या यांना अजून निर्णायक स्वरूप यावयाचे आहे, पण मुख्यतः जनता पक्ष, जनता (एस) कांग्रेस, डावे गट आघाडी आणि इंदिरा कांग्रेस अशा तीन शक्तींमध्ये लढत होणार आहे; पण त्यात निर्णायक बहुमत कोणी मिळवू शकेल असे वाटत नाही. जनता आणि जनता (एस) यांची मते आपसात विभागली जाणार आणि त्याचा जास्तीत जास्त फायदा इंदिरा कांग्रेस घेणार हे उघड आहे. जणू सत्ता आपल्या हाती आलीच अशा आत्मविश्वासाने इंदिरा गांधी व त्यांचे सहकारी प्रचार करीत आहेत तर आम्ही निश्चित बहुमत मिळवू असा दावा जनता पक्ष आणि जनता (एस) चे नेतेही करीत आहेत. अखेर सत्ता कोणाच्या हाती सोपवावयाची याचा कौल मतदारांनीच द्यावयाचा आहे.

प्रत्येक निवडणूक विशिष्ट वातावरण घेऊन येत असते. १९७१ च्या निवडणुकीचे वेळी इंदिरा लाट होती. १९७७ मध्ये जनता लाट होती आता पुन्हा इंदिरा लाट आली आहे असे इंदिरा समर्थक म्हणत असले तरी त्यात वस्तुस्थितीपेक्षा प्रचाराचाच भाग अधिक आहे. इंदिरा कांग्रेसचा प्रभाव वाढत आहे; पण लाट आली असे म्हणता येणार नाही. प्रभाव वाढत आहे तोही स्वसामर्थ्यामुळे नव्हे तर जनता पक्षातील फुटीमुळे. वास्तविक हक्कभंगावद्दल लोकसभेने गेल्या वर्षी इंदिरा गांधींना जी शिक्षा केली त्यानंतर त्यांची प्रतिमा जनमतातून फार खाली गेली होती. तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम. जी. रामचंद्रन् यांनी त्यांच्या विजयाची हमी देण्याचे नाकारल्याने तंजावरची लोकसभा निवडणूक स्वतःच्या हिमतीवर लढविण्याचे धैर्य त्यांना झाले नाही. स्वतःच्या पुनरागमनाबद्दल कर्नाटकचे मुख्यमंत्री देवराज अरस यांनी बंडाचा झेंडा उभारला आणि त्यांचा गट इंदिरा कांग्रेसमधुन बाहेर पडला हा त्यांना बसलेला दुसरा मोठा हादरा होता. खास न्यायालयापुढे चालू असलेल्या खटल्याचा निकाल १९८२ पूर्वी लागून इंदिरा गांधींना निवडणूक लढविणे अशक्य होणार असे वाटू लागले होते. जनता पक्षाच्या नेत्यांमध्ये कितीही मतभेद व संघर्ष असले तरी तुटेपर्यंत ते ताणणार नाहीत आणि १९८२ पर्यंत मोरारजीभाईंचे सरकार टिकून राहील अशी आशा जनतेला वाटत होती पण सारेच विपरीत व अघटित घडले.

पण जे घडले ते खरोखरच विपरीत व अघटित होते कां? ते विपरीत होत हे खरे पण अघटित किंवा अनपेक्षित होते असे म्हणता येणार नाही. मोरारजीभाईंचे सरकार पाडण्याचा बनाव भालोदचे नेते आणि इंदिरा गांधी यांनी संगनमत करूनच रचला असावा अशी शंका येते. तुम्ही जनता पक्षातून बाहेर पडा आम्ही सरकार बनविण्यास तुम्हाला पाठिंबा देऊ असे निश्चित आश्वासन इंदिरा गांधींकडून मिळाल्यानंतरच राजनारायण यांनी एवढ्या मोठ्या प्रमाणावर पक्ष फूट घडवून आणली हाच निष्कर्ष एकंदर घटनांचा विचार करता निघतो. बनाव फार हुशारीने आखण्यात आला आणि गुप्त ठेवण्यात आला. एकदम सर्वांनी न फुटता रोज थोड्या सभासदांनी फुटावयाचे हे योजनापूर्वकच ठरविण्यात आले होते असे दिसते. मोरारजीभाई आणि चंद्रशेखर यांना एक तर या बनावाची कल्पना नसावी किंवा असली तरी त्याचे गांभीर्य जाणवले नाही.

जॉर्ज फर्नांडिस, मधु लिमये हे समाजवाद्यांचे प्रमुख नेते या बनावात कसे सहभागी झाले याचे आश्चर्य वाटते. त्यांच्या निर्णयामागे सत्ताकांक्षा नव्हती; पण परिस्थितीचे त्यांचे विश्लेषण व मूल्यमापन चुकले. त्यांना जे साधावयाचे होते ते साधले नाही. उलट इंदिरा गांधींचे बळ वाढण्यास मात्र त्यामुळे मदत झालेली आहे. जनसंघाबरोबर काम करणे अशक्य आहे या निष्कर्षाला भालोद व समाजवादी नेते आले. जनसघ आणि इंदिराकांग्रेस यांना वगळून लोकशाहीवादी व पुरोगामी शक्तिची आघाडी उभारायाची आणि तिचे सरकार केंद्रात आणावयाचे असा लिमये व फर्नांडिस यांचा प्रयत्न होता व त्यात आपणास यश येईल असे त्यांना वाटत होते पण त्यांचा अंदाज चुकला. जनता पक्षातील जनसंघ वगळून बाकी सर्व घटक त्यांच्या मागे गेले नाहीत. संघटना कांग्रेसचा गट जनता पक्षा बरोबरच राहिला. भालोदगट पूर्णपणे बाहेर पडला पण लोकशाहीवादी कांग्रेस आणि समाजवादी यांचे संपूर्ण सभासद नव्या आघाडीस मिळाले नाहीत. डाव्या गटांनी व काही प्रादेशिक पक्षांनी या आघाडीस पाठिंबा दिला तरीही आघाडीचे निर्णायक बहुमत होईना. सरकार बनविण्यासाठी इंदिरा कांग्रेसच्या पाठिंब्यावरच त्यांना विसंबून रहावे लागले वास्तविक इंदिरा कांग्रेसचे बळ कोणत्याही प्रकारे वाढले नसताना आपल्या लहरीप्रमाणे सरकार बनविण्याची व पाडण्याची शक्ती त्या पक्षास जनता पक्ष फोड्यांनी निर्माण केलेल्या परिस्थितीमुळे प्राप्त झाली. लिमये व फर्नांडिस यांना हे अपेक्षित नसेल पण तसे घडण्याची शक्यता त्यांनी जमेस धरावयास हवी होती. इंदिरा गांधींना नेमके हवे होते ते घडले. निवडणुकांपूर्वी आपल्यावरील खटल्यांचा निकाल लागून आपल्याला शिक्षा होऊ नये असा त्यांचा प्रयत्न होता. १९८२ पर्यंत खटल्यांचा निकाल निश्चित लागला असता. मोरारजीभाईंचे सरकार पाडून मुदतपूर्व निवडणुका घेण्यास भाग पाडणे हाच हे टाळण्याचा मार्ग होता. जनता पक्ष फुटल्याने ते जमले. त्यात त्यांच्या स्वतःच्या कर्तृत्वाचा भाग नाही पण आता इंदिरा गांधींना पुन्हा अनुकूल दिवस आले आहेत असे समजून त्यांच्या पक्षाकडे संधिसाधूंचा ओघ सुरू झाला. इंदिरा गांधींच्या हाती पुनः सत्ता आलीच तर जनता पक्षफोडेच त्याला मुख्यतः कारणीभूत आहेत याची दखल इतिहासाला घ्यावीच लागेल. पण लिमये फर्नांडिस यांच्या सारख्या समाजवादी नेत्यांचा यात सहभाग असावा याची खंत मनाला विशेष बोचते.

जनता पक्षाची फूट पुन्हा साधता येणार नाही कां? दोन्ही गटातील कटुता सध्या एवढी तीव्र आहे की पुनः एक होण्याच्या मनःस्थितीत हे गट नाहीतच पण इंदिरा कांग्रेस विरुद्ध एक आघाडी करण्याच्याही मनःस्थितीत ते नाहीत. आपल्या या धोरणामुळे लोकशाहीवादी शक्तीचे सामर्थ्य वाढण्याऐवजी हुकूमशाहीवादी शक्तीच बळावत आहेत हा धोका टाळण्यासाठी अंतर्मुख होऊन त्यांनी आपल्या धोरणाचा फेरविचार करायला हवा. जयप्रकाश नारायण आणि आचार्य कृपलानी यांच्यापुढे दोन्ही गटांनी आपल्या भूमिका मांडाव्यात आणि ते देतील तो निर्णय मान्य करावा. पुनः एकसंध पक्ष उभारणे शक्य नसेल तर निदान निवडणुकीपूर्वी इंदिरा कांग्रेसविरुद्ध सर्वलोकशाही वादी शक्तींची एक आघाडी होणे आवश्यक आहे. ☐

प्रा. इनामदार यांचा लेख म्हणजे

# अटलजींचे निमित्त करून संघावर केलेली जुनीच टीका

## –आमदार डॉ. अरविंद लेले

जनता पक्षाचे आणि भूतपूर्व जनसंघाचे आदरणीय नेते श्री. अटलविहारी वाजपेयी यांनी २ ऑगस्टच्या ' इंडियन एक्सप्रेस ' मध्ये लिहिलेल्या लेखामुळे देशभर विविध प्रतिक्रिया उमटल्या आहेत. मान्यवर अटलजी यांचे भारताच्या राजनीतीतील आजमितीचे स्थान असाधारण स्वरूपाचे आहे. २५–३० वर्षांची खडतर राजकीय–सामाजिक तपस्या, अमोघ वक्तृत्व, परराष्ट्रमंत्री म्हणून गाजविलेली कारकीर्द यामुळे त्यांच्या कोणत्याही वक्तव्याचे वेगळे महत्त्व मानले जाते. मान्यवर अटलजींच्या त्या लेखातील ' प्रकट चिंतना ' (Loud Thinking) ची दखल त्यामुळेच अनेकांनी घेतलेली आहे.

मात्र अशा प्रकट चिंतनातील मते नेहेमीच निर्णायक स्वरूपाची मानता येत नाहीत. परंतु अटलजींच्या त्या विचारांकडे काहीजण मात्र ' New Testament ' म्हणून पाहू लागले आहेत असे वाटते. विशेषत: संघ–जनसंघ आणि त्या परिवाराशी संबंधित अशा सर्व संस्थांकडे पहाण्याचा ज्यांचा दृष्टिकोण पूर्वग्रहदूषित आणि बंदिस्त स्वरूपाचा आहे. त्यांना तर अटलजींच्या लेखात एकदम ' बंड ' ' क्रांतिकारी भरारी ' धाडस असे काही तरी अलौकिक, थरारक असल्याची चाहूल लागली आहे.

१ सप्टेंबरच्या ' सा. माणूस ' मधील प्रा. मुकुंद इनामदार यांचा लेख वरील पंथाचाच प्रतिनिधी आहे. त्यांनी तर वाजपेयी हे ' एकाकी लढा देणारे द्रष्टे ' आहेत आणि आजवरचे त्यांचे संघ–जनसंघातील तद्दन सारे सहकारी त्यांचे विरोधक आहेत असा आभास निर्माण केला आहे. प्रा. इनामदारांच्या या काल्पनिक युद्धाचा आधार आहे १२ ऑगस्टच्या ' दै. तरुण भारत ' मधील ' विदुरा 'चा लेख. काही तरी आधार म्हणून एखादा लेख घ्यायचा आणि स्वत:च्या प्रतिभेला स्वैर सोडून मनातील दृढमूल गैरसमजांवर शाब्दिक फुलोरा चढवून संघावर हल्ला करायचा अशी अनेकांना सवय आहे. एकदा ' संघात बदल होणे शक्य नाही ' ' संघाचे कान बहिरे असतात ' ' संघाची भूमिका पंतोजीची, कल्पनाशून्य व संवेदनशून्य आहे ' ' संघ अलौकिक आत्मकेंद्रित आहे ' हे आत्मग्रहच सत्य मानून मनाची व विचारांची कवाडे बंद केली की मग अशा एखाद्या लेखामुळेही तो माणूस एकदम वेगळा वाटू लागतो. ती व्यक्ती एकदम उदारतेच्या क्षितिजावर उभी आहे असे वाटून त्यांचे सर्व सहकारी अनुदार; आत्मकेंद्रित वाटू लागतात. तथाकथित विचारवंतांच्या विचार करण्याच्या अशा अशास्त्रीय पद्धतीमुळे एखाद्या विचाराचे काही मूलगामी विवेचन होण्याऐवजी, एखाद्याचा गौरव व अन्यांची निंदा करून, मूळ विषयच बाजूला पडतो. प्रा. इनामदारांचा लेखही त्याच मार्गाने गेला आहे.

जे श्री. अटलविहारी वाजपेयी आज काहींना एकदम उदारमतवादी सुधारणावादी वगैरे वगैरे पुरोगामी गुणांनी युक्त वाटतात, त्याच अटलजींनी आजवरची वाटचाल सर्वश्री अडवाणी, नानाजी, ठेंगडी, स्वर्गीय दीनदयाळजी यांचेबरोबर एकविचाराने केलेली आहे हे त्यांच्या ध्यानात येत नाही. प्रा. इनामदामदारांनी गौरव करण्यासाठी वाजपेयींना ' हनुमंत ' म्हणून गंमतच केली आहे. तोच दृष्टांत द्यायचा झाला तर हनुमंताच्या रोमरोमात जसा राम भरलेला होता तसा अटलजींच्याही रोमारोमात संघविचार, संघाचा चैतन्यशील, व्यापक राष्ट्रवादाचा विचारच भरलेला आहे हे अवश्यमेव सांगितले पाहिजे.

### कटुता नाही सुसंवाद

संघाचा राष्ट्रवादी विचार राष्ट्रजीवनाकडे वेगवेगळ्या तुकड्यांच्या स्वरूपात पहात नाही. संघाची संस्कृतीची कल्पनाही कला-क्रीडा-करमणूक, नृत्य, संगीत, पंथ एवढ्यापुरती मर्यादित वा संकुचित नाही. त्यामुळे संघ ज्या वेळी राष्ट्राचा विचार मांडतो तेव्हा राष्ट्र-जीवनातील कोणतेही क्षेत्र वैचारिकदृष्ट्या तरी अलग राहू शकत नाही. राष्ट्राच्या साऱ्या जीवनात एक समन्वय, सुसंवाद राहिला पाहिजे असे संघ आग्रहाने मांडतो तेव्हा कधीच Political Domination अभिप्रेत नसते. राष्ट्रजीवनाची सारी अंगे एका नव्या जागृतीने व्यापावी, त्या त्या क्षेत्रांच्या मर्यादा व नियम कटाक्षाने पाळून ती क्षेत्रे शुद्ध व प्रभावी करावी हीच भावना त्या विचारा-मागे असते. त्याच प्रेरणेने संघाचे लक्षावधी कार्यकर्ते विविध क्षेत्रांत आज काम करीत आहेत; पण त्याचा अर्थ त्या सर्व क्षेत्रांवर संघ Domination करतो असा नाही. निखळ राजकीय विचारसरणीत, प्रत्येक क्षेत्राचा ' राजकीय लाभा 'चे दृष्टीने होणारा विचार संघाला कधीच अभिप्रेत नाही. काही आधुनिक राजकीय तत्त्वज्ञानात ' State is Supreme ' हा विचार प्रकर्षाने मांडला जातो. त्या विचाराची तार्किक व व्यावहारिक परिणती राज्याच्या म्हणजे राज्यकर्त्या पक्षाच्या म्हणजे राज्यकर्त्यांच्या आधीन सारा समाज असावा, या आग्रहात होते. संघाने ' राज्या 'चे हे ' सर्वोच्चत्व ' सातत्याने नाकार-लेले आहे व त्याऐवजी ' समाज ', ' राष्ट्र ' यांना सर्वोच्च स्थान दिलेले आहे. नेमकी हीच गोष्ट कितीही प्रामाणिकपणे सांगितली

तरी काही कुंठित विचाराच्या व्यक्तींना समजत नाही, पटत नाही, संघाच्या वरील दैनंदिन सत्ताकारणापासून दूर असलेल्या निखळ राष्ट्रवादी भूमिकेतून ज्यावेळी, सर्व क्षेत्रांचा राष्ट्रजीवनसन्मुख असा सुसंवाद असावा हा विचार मांडला जातो तेव्हा तो Domination, कब्जा, ताबा, या कल्पनांपासून फार दूर व फार उंच स्थानी असतो.

पण वरील विचार प्रत्यक्षात आणताना ज्या व्यावहारिक मर्यादा येतात, त्यामुळे तो विचार पूर्णांशाने, शुद्ध स्वरूपात सर्वत्र जाऊ शकत नाही. अनेक हितशत्रूंकडून निर्माण केले जाणारे गैरसमज व शंका यांचीही अडचण होते. याची जाणीव केवळ श्री. अटलजींना नाही तर अनेकांना आहे. विशुद्ध संघविचार, वेगवेगळ्या संस्थांच्या माध्यमातून समाजाला पटवून देण्याच्या अभियानात संघ अपुरा पडतो आहे. ही व्यथा सरसंघचालक मा. बाळासाहेब देवरस यांनीही अनेक वेळा जाहीरपणे व्यक्त केलेली आहे. तेच पुन्हा एकदा वाजपेयींनी सांगितले त्यात कसला नवा हुंकार ? संघ हिंदूंप्रमाणेच अन्य धर्मीय राष्ट्रघटकांनाही मुक्त आहे असे मा. देवरसांनी वारंवार सांगितले आहे; पण त्याला अद्याप पुरेसा प्रतिसाद मिळत नाही असे वाजपेयी म्हणाले तर त्यात भरारी ती कोठें आली ? अनिष्ट सामाजिक रूढी नष्ट करण्याचे संघाचे आजवरचे प्रयत्न अपुरे पडले असून त्या प्रयत्नांची गती वाढवली पाहिजे असे सरसंघचालक वारंवार सांगत असताना वाजपेयींनी त्याचा पुनरुच्चार केला तर त्याचा अर्थ त्यांनी ' संघाला ऐकविले ' असा कसा होतो ? ' संघाच्या विधायक कार्यशक्तीबद्दल अटलजींच्या मनात विश्वास आहे ' असे एकीकडे म्हणायचे; पण ती कार्यशक्ती अधिक प्रभावी झाली पाहिजे असे वाजपेयी म्हणाले की लगेच आजवरचे काम ' फुटकळ ' स्वरूपाचे झाले आहे असा निष्कर्ष काढायचा याचा अर्थ काय ? ज्या ' विदुरा '-वर प्रा. इनामदार तुटून पडले आहेत त्या ' विदुरा 'ने आजवर लिहिलेल्या लेखांचा मागोवा घेतला तर वाजपेयींचे आजचे प्रकट-चिंतन त्यानेही केलेले आहे असे त्यांना आढळेल; पण त्यासाठी ' मनाची कवाडे उघडी ठेवून आणि ' फुटकळ ' वाचन ' न करता अधिक साकल्याने चिंतन करून विचार मांडावे लागतील.

वाजपेयी हे भूतपूर्व जनसंघाच्या प्रदीर्घ राजकीय वाटचालीतील एक प्रभावी नेते होते. त्याचप्रमाणे संघाच्या व्यापक, सांस्कृतिक राष्ट्रवादाचे एक समर्थ भाष्यकार होते व आहेत. असे असताना त्यांनी मांडलेले विचार ' अरण्यरुदन ' ठरणार अशी खात्री प्रा. इनामदारांना वाटते याचे कारण त्यांनी फार वरवर, ढोबळमानाने आणि पुस्तकी बांधिलकीच्या आधारावर संघाचा विचार केला आहे.

" संघाबद्दल आजमितीला काहींच्या मनात भीती व शंका असू शकतात, हे वाजपेयींचे उद्गार म्हणजे एका निष्ठावान संघवाद्याने प्रस्तुतच्या संक्रमणकालीन परिस्थितीला दिलेला हुंकार आहे " असे प्रा. इनामदारांना वाटते. पण त्यांना अवश्य सांगू इच्छितो की तसा हुंकार अन्य अनेक निष्ठावान संघवादीही देत आहेत. आणि राजकीय स्वरूपाच्या आणि तथाकथित बुद्धिवादी लोकांकडून हेतुतः निर्माण केल्या गेलेल्या शंका दूर व्हाव्यात असा प्रयत्न ते करीत आहेत; पण असे प्रयत्न करताना सतत जाहीर चर्चा केली तरच ते प्रयत्न मान्य होतात का ? जाहीर वादविवाद म्हणजेच सुधारणावाद का ? परंतु ' सुधारणावादा 'सारखे काही शब्द एकाचा गौरव आणि दुसऱ्याची निंदा एकाच वेळी करायला सोयीचे असतात म्हणून प्रा. इनामदारांनी ते वापरले असावेत.

## मंथन आणि वर्तमानपत्री चर्चा

संघाच्या स्थापनेला अर्धशतकाहून अधिक काळ लोटला आहे. एवढ्या प्रदीर्घ कालखंडांत राष्ट्रभक्ती आणि सर्वसमावेशक राष्ट्रवाद याच संघाच्या अंतःप्रेरणा राहिलेल्या असल्या तरी त्या प्रेरणांच्या बाह्य आविष्कारात अनेक प्रगतिशील बदल होत आहेत. तसले बदल झाले नसते तर संघ केव्हाच नामशेष झाला असता. संघांत वैचारिक मंथनही अखंड होत असते. अशा मंथनाविना संघासारखी जिवंत, स्पंदनशील, राष्ट्राचा सर्वांगीण विचार करणारी शक्ती कधीच निर्माण झाली नसती; पण हे सर्व जाणून घ्यायचे असेल तर संघाच्या वाटचालीचा मागोवा उघड्या मनाने घ्यावा लागेल.

वाजपेयींनी उपस्थित केलेल्या विषयांवर यापूर्वीही चर्चा झालेल्या आहेत. तशी चर्चा पुन्हांही होईल, पण त्यांचे विचार हा एक ' नवा हुंकार ' आहे असे मानायचे, त्यामुळे त्या विरोधात आता ' काही-तरी ' होणार अशी अपेक्षा ठेवायची आणि तसे काही झाले नाही, की त्याला ' संवेदनशून्यता ' म्हणायचे हा एक विकृत दृष्टिकोण आहे. उथळपणाने होणारा जाहीर वादविवाद म्हणजेच 'विचारमंथन' असे मानणाऱ्या विचारवंतांच्या पदरी त्यामुळे संघाकडून निराशाच पदरी पडते. परंतु अशा सवंग, उथळ आणि तात्पुरत्या चर्चेने फारसे काही साधत नाही असा अनेक जाणकारांचा अभिप्राय आहे. ज्यांना लक्षावधींची व्यापक संघटना चालवायची असते, मूळ प्रेरणास्रोत कणभरही कमी होऊ न देता नवी कालसापेक्ष प्रमेये मांडायची असतात, त्यांना केवळ वर्तमानपत्री चर्चा करता येत नाही. तशा चर्चेने लाभापेक्षा हानीच होण्याची शक्यता अधिक असते. प्रा. इनामदारां-सारख्या मित्रांनी संघकार्याच्या मर्यादा, परिमाण आणि तंत्र या गोष्टी समजावून घ्याव्यात अशी प्रेमाची विनंती करावीशी वाटते.

स्वर्गीय श्री. गुरुजी व पं. दीनदयाळ उपाध्याय, सर्वश्री सुंदरसिंग भंडारी, नानाजी देशमुख, लालकृष्ण अडवाणी, दत्तोपंत ठेंगडी, सरसंघचालक मा. बाळासाहेब देवरस व संघाचे अन्य अधिकारी यांच्यापासून संघपरिवारातील खालच्या श्रेणीच्या नेत्यांनी केलेली वैचारिक वाटचाल नीट अभ्यासिली तर वाजपेयी यांनी संघाला काही नवीन 'ऐकवले' आहे. असा निष्कर्ष काढता येणार नाही; पण कोणत्याही निमित्ताने संघनेतृत्व ' मध्थड बुद्धीचे ', ' जखडलेले ' आहे असे सिद्ध करण्याचा ज्यांचा प्रयत्न असतो त्यांच्याबाबत काय म्हणणार ? अशा प्रयत्नात ज्यांना आनंद लाभतो त्यांना वास्तविक वाजपेयींचेही प्रेम नसते. वा त्यांच्या विचारामागील प्रेरणांची यथार्थ जाणीवही नसते, असे खेदाने म्हणावे लागेल.

वाजपेयींनी काही नवीन विचार मांडल्यामुळे त्यांचा राजकीय बळी घेतला जाणार असल्याची चाहूलही प्रा. इनामदारांना लागली आहे. त्यांचे या संवेदनशीलतेचे मात्र सर्वांत अधिक कौतुक वाटते आणि कीवही येते. " वाजपेयींना राजकीय कोंडी जाणवली आहे. पण इतरांना मात्र वैचारिक बंदिस्तवादच बरा वाटतो आहे " अशी त्यांची विधाने वाचली की अटलजींचे निमित्त करून संघ-जनसंघावर चिखलफेक करण्यासाठीच त्यांनी या लेखाचा प्रपंच केला असावा ही शंका पक्की होऊ लागते. संघपरिवाराच्या निंदेच्या आनंदांत मग्न झाल्यामुळे प्रा. इनामदारांनी श्री. वाजपेयींच्या विचारांची मूलगामी चिकित्साही केलेली नाही वा त्यांच्या अंतःप्रेरणेचे स्पंदनही टिपलेले नाही. वाजपेयींच्या चिंतनाच्या आणि प्रतिभेच्या याहून उत्तुंग भराऱ्यांशी त्यांचे सहकारी वेळोवेळी एकरूप झालेले आहेत. त्यामुळे वाजपेयींच्या त्या ' प्रकट चिंतना 'चे मूल्य त्यांना निश्चितपणे कळते, पण प्रा. मुकुंद इनामदारांनी अशी उथळ, पलायनवादी भूमिका घेऊन, शाब्दिक बुद्धिचापल्य दाखविण्याऐवजी प्रगल्भतेने, साकल्याने, एकात्मतेने आणि अधिक व्यापक जाणिवेने चिंतन केले तर त्यांचा व आजच्या सारख्यांचाही फायदा होईल एवढेच प्रेमाने सुचवावेसे वाटते. □

कथा

# अग्निहोत्र

## अविनाश धर्माधिकारी

पहाटेचे बरोबर तीन. पलंगावर पडल्या-पडल्या खिडकीतून नजर थेट आकाशात टाकतो. तीन तारे सरळ रेषेत. चंद्राचा स्वच्छ प्रकाश आणि झोपी गेलेलं जग. दिवसभर उनाडक्या करून दमून भागून शांत झोपणाऱ्या अवखळ, निरागस बालकासारखं. गढूळ पाणी शांत झाल्यावर त्यातला गढूळ अंश खाली बसतो आणि नितळ स्वच्छ भाग वर रहातो तशी माणसांची धावपळ गडबड सध्या थंडावली होती. यावेळेला घडते ते जगाचं खरं दर्शन. झोपलेलं......शांत...... जग.

मग एकदा ते जागं झालं की ? गडबड कोलाहल घाईगर्दी......कोणी पत्त्याचे बंगले बांधणार......कोणी हवेत मनोरे रचणार ......कोणी प्रमोशनसाठी धडपडणार...... कोणी राजीनामे खरडणार ......पण सगळे मिळून भेसूर जीवनाच्या पिळून काढणाऱ्या चरकातून जाणार ...... निराश होणार ...... जिद्दीने झगडणारे दुर्मिळ. अशा हाडांचा कीस काढणाऱ्या प्रचंड रगाड्यातून जाण्यापेक्षा झोपणेच जास्ती चांगले.

गेले कित्येक तास मी तोच प्रयत्न करत होतो. माझ्या जागेपणी मी हळूहळू शांत होत गेलेलं जग पाहिलं......गडबड थंडावली. सारं कसं शांत......आणि शहराच्या कोपऱ्यातल्या टुमदार उपनगरात चन्द्रप्रकाशात अभ्यंगस्नान करणाऱ्या बंगल्याच्या खोलीत डोळे सताड उघडे ठेवून मी. सगळा कोलाहल थंडावला असल्यामुळे एरवी कधी ऐकू न येणारे दूरवरचे आवाज ऐकू येतात. स्टेशनातून धडधडत शिट्टी देत जाणारी आगगाडी ......कारखान्यातून येणारा यंत्रांचा सतत खडखडाट......टेकडी पलीकडच्या कारखान्यात पडणारे रामपाळीचे टोल आणि क्वचित वटवाघूळाचा फडफडाट.

पण त्याहीपेक्षा एरवी कधी ऐकू न येणारा आवाज......स्वरनाद......स्वतःचा आवाज ऐकायला हीच वेळ योग्य असते. पण त्या वेळेला आम्ही सगळे डोळ्यावर कातडं ओढून झोपलेले. आणि झोप येत नसेल तर कसोशीने निद्रादेवीची आराधना करणार.

या कुशीवरून त्या कुशीवर असं अनंत वेळा करून पलंगपोस, पायजमा आणि पांघरूण पार चुरगाळून गेले. खिडकीतून दिसणारे तारे पाठ झाले. शांतता ऐकून कानात दडे बसले.

काल संध्याकाळपासून जरासा अस्वस्थच होतो. कधी न ऐकलेला कुठला तरी मधुर आवाज दूरवरून अस्पष्ट कानावर येत होता. पण गोंधळात तो विरून जायचा. पुन्हा अंधुक अंधुकसा कानावर यायचा, हुरहूर लावून जायचा. आनंद देणारी हुरहूर हळवी सुखद मुलायम हुरहूर......रखरखीत वाळवंटात दुरून पाण्याचा वास जरी आला तरी प्रवासी जसा अस्वस्थ होईल ना, तशी अस्वस्थता. झोप तर पार उडून गेली. पाण्यात खडा टाकल्यावर खडा तळाशी जातो आणि पाण्यावर तरंग पसरतात तशी गडबड तळाशी जाऊन शांतता सर्व दूर पसरली ...... झिरपली ...... तसतसा तो आवाज अधिक अधिक स्पष्ट होत गेला.

मधुर जीवाचे केले तरी साठवायला अपुरे पडले हे पार्थिव कान. ओंकारध्वनी ...... जगभर आनंदलहरी निर्माण करीत पसरत जाणारा ओंकारध्वनी. दुसऱ्या दिवशी नव्या दमानं जीवन कलहात झगडण्यासाठी माणसाला दुर्दम्य शक्ती देणारा प्रणव......माणसाच्याही नकळत त्याच्या हृदयात साहून भरारी घेणाऱ्या गरुडाच्या पंखातली ताकद ......भक्ष्याचा अचूक भेद करणाऱ्या चित्त्याच्या पोलादी पायातली ताकद देणारा उच्चार......

अर्थात......आमची इच्छा असेल तर !

आणि आम्ही त्यावेळेला झोपलेले !!

पहाटेचे तीन. मी त्या मधुर झंकारात पार विरघळून गेलो. रंध्रारंध्रातून तो झंकार प्रवेशला. मला त्याने वेढून टाकले......तो ओंकार मला बोलावत होता......पण कुठे? का ? आणि मलाच का म्हणून ?

उत्तर नाही. तरीही मी उठलो. कदाचित इच्छेविरुद्ध अंगावरची चादर हळूच बाजूला सारली. पलंगावरून सावकाश पाय जमिनीवर ठेवले. एकदम एक थंड शिरशिरी पायापासून मस्तकापर्यंत दौडत गेली. मांजराच्या पावलानं आवाज न करता दारापर्यंत गेलो. कडी उघडली, बाहेर पाऊल टाकलं आणि दार लोटून घेतले...

स्पष्ट शांतता... बोचरी थंडी... सगळ्या बाजूंनी भाले खचाखचा अंगात घुसत आहेत असं वाटलं... मला पुढे पाऊल टाकायला बंदी करत होते... पण तो आवाज... माझ्या आत्म्याला साद घालणारी ती हाक छे ! थांबणं शक्यच नव्हतं. अंगावर शाल घ्यावीशी वाटली. घेतली नाही. पायात काही तरी घालावंसं वाटलं; पण वेळच नव्हता.

वेड्यासारखा निघालो... मिळेल त्या रस्त्याने... त्या आवाजाकडे... रस्ता लांबवरून आलेला. घरावरून पुन्हा लांबवर एका बिंदूत मिळालेला. वाटतं, जणू तिथून पुढे रस्ता बंद आहे; पण तिथे गेल्यावर कळतं... रस्ता अजून किती तरी पुढे आहे... तू जाशील तितका... काळाकुळकुळीत... रात्रीच्या वेळी तो सुद्धा स्वच्छ झाला होता. रस्त्याच्या दोन्ही बाजूला शेतं पसरलेली... तीही पहाटवाऱ्यात डोलत होती. रस्त्यावर दव साठलेले. पाय ठेवले आणि पाय ओलसर झाले... रस्त्यावरचं दंव तुडवत शेतातल्या रोपांच्या टोकावर विराजमान झालेले... चंद्रप्रकाशात तेजबिंदूसारखं चकाकणारं दव निरखत निघालो... ते रत्नबिंदु उचलून घ्यावेत आणि रेशमी दोऱ्यात ओवून सुंदर माळ करावीशी वाटली... पण हातात येण्यापूर्वीच विरून गेले ते... दंव बिंदूच... शेताच्या कडेला वृक्षाखाली बसून झुंजूरवेली गार ऊस दातांनी तोडून खावासा वाटला... कदाचित ते आनंददायी झालंही असतं... पण मला तो झंकार जास्त आनंददायी वाटत

होता. मी तिकडेच खेचला गेलो.

रस्त्याच्या कडेला समान अंतरावर ट्यूब-लाईटस् स्वच्छ रस्त्याच्या आरशात मान वाकवून स्वतःला पहात होत्या. रात्रभर बहुदा त्या दु:खी असाव्यात, आपल्या प्रकाशातून पुढे जाण्यासाठी कोणी नाही म्हणून. रस्त्यावरचं दव म्हणजे त्याचे गोडे अश्रू.

पाचदहा मिनिटातच शहरातला रस्ता मागे पडला. मग एका शेतातून सळसळत जाणारी पायवाट... पायाखाली ओलसर तांबडी माती आणि डोक्यावर रिमझिम बरसणारा शीतल चंद्रप्रकाश... नादब्रह्म आता अधिक अधिक स्पष्टतर होत चाललं होतं... आणि जसजसा स्पष्ट आवाज कानावर येईल तसतशी पायातली ताकद आणि मनातला उल्हास वाढत होता...

एका पर्वतापाशी येऊन ठेपलो... उंचच्या उंच पहाड...ठिकठिकाणाहून ताशीव कडे... बोट फिरवलं तर सर्रकन रक्ताची धार येईल... फूटभर असेल नसेल चिंचोळी वाट... नव्हतीच ती... कुणी चाललं तर वाट तयार होते... इथे तर कुणाच्या पुसल्या गेलेल्या पावलांची सुद्धा चिन्हं दिसत नव्हती... एका बाजूला खोल दरी... पाताळ... दुसऱ्या बाजूला सरळ आकाशाकडे झेपावणारा उंच कडा... वाटेवर अनंत खडे आणि काटे दबा धरून बसले होते... पाऊल ठेवलं मात्र... कच्चकन् पायात एक दगड घसला... रक्ताची धार लागली... पायात काही तरी घालायला हवं होतं असं वाटलं... पण आता इलाज नव्हता... तसाच कड्यावरून तोल सावरत निघालो... आणि मग पायात काही नाही या वेदनेपेक्षा अंगावर शालीचं लोढणं नाही याचं सुख जास्त वाटलं... थंडी तर कधीच पळाली होती थंडी वाजवून घेणाऱ्यांकडे... माझ्या अंगात एक प्रकारची आल्हाददायक उष्णता भरून राहिली होती... पायात खडे बोचत होते... एखादा खट्याळ कातडं भेदून जायचं धाडस करायचा...

पायातून रक्त वाहायला लागलं... मी तसाच पुढे. मागे माझ्या उष्ण रक्ताचे ठिपके सोडत... पायाला त्रास तर होत होता.

नाही कसा? पण तो ओंकार खेचत होता.

खूप वेळ झाला. चंद्रही आता विझू लागला. पहाटे पूर्वीचा एक तास... घनदाट अंधार त्या पर्वताच्या अल्याडपल्याड... एक प्रकारचा अनिश्चित; पण दीर्घकाळ टिकणार असं वाटावं असा गुडुप्प अंधार... मला थांबवण्यात पंचमहाभूतं अपुरी पडल्यावर त्याला पाठविलं होतं की काय कुणास ठाऊक! डोळ्यात घालायला तेलही नव्हतं... रात्रभर पहारा करणारा निशाकांतही चालला... गेला. वटवाघूळांची फडफड वाढली. हजार जिव्हांनी अंधार वळवळायला लागला. विंचू, साप सरपटायला लागले विषारी फुत्कार सोडत... भीतीच वाटायला लागली...

पण तो आवाज... !

मग डोळ्यांतच ज्योती पेटविल्या... ठेचकाळत धडपडत एक वळण घेतलं... आणि अचानक त्या अंधारातच एक चित्रवत् दृश्य माझ्या डोळ्यातल्या ज्योतींनी मला दाखवलं.

निळंशार, निरभ्र, प्रकाशमय. उजळ आकाश. त्याच्या छायेत हिरवीगार मखमल पांघरलेलं पहुडलेलं माळरान. त्याच्याच मध्य भागातून त्या लहरी उठत होत्या आणि तरंगासारख्या पसरत आनंदाची कंपने निर्माण करीत होत्या. आता स्पष्ट कंपन. कानाला स्पर्श करीत होती. पायात असेल नसेल तेवढी ताकद एकवटली आणि पळत सुटलो. मध्यभागी आलो आणि पाय जागीच खिळले.

एक मोठं आळं तयार केलं होतं. हाडामांसाचा बांध घालून. त्यात रक्ताचं तळं साठलेलं होतं. मधे कोमल गुलाबाची काडी रोवली होती तिरका छेद घेऊन. निळं आकाश. हिरवी मखमल. रक्तवर्ण आळं आणि मधे गुलाबाची काडी. आळ्याच्या कडेला एक माणूस उभा होता. तोंडातून सावकाश रक्ताचा एक एक थेंब तळ्यात टाकत होता. अभिषेक!

तो होता हडकुळाच. उंचसा. अंगातलं रक्त गेल्याने पांढरट दिसत होता; पण चेहरा विलक्षण तेजस्वी होता. कोणालाही दिपवून टाकण्याइतका. डोळ्यात तर साक्षात दोन सूर्य जळत होते– प्रखर. बहुधा त्या तेजाच्या आधारावरच तो रात्रभर त्या गुलाबाच्या काडीपाशी रक्ताचा अभिषेक करत होता.

या अपेक्षेने, की कधी काळी त्याला पानं येतील, फांद्या फुटतील, हिरव्या हिरव्या पानांच्या सान्निध्यात रंगीबेरंगी गुलाब फुलतील. सुख देणारे आणि त्या गुलाबांची जपणूक करण्यात सारं जग वेडं होईल. हरवून जाईल. हेवेदावे विसरेल! वेडा!

त्या रक्ताचा थेंब तळ्यात पडला की रक्ततरंग उठायचे. तिथूनच तो मधुर, स्वर्गीय, झपाटून टाकणारा, वेढून टाकणारा ओंकारध्वनी प्रसृत होत होता आणि त्याच आदि शब्दाचा शोध घेत मी इथपर्यंत येऊन पोचलो. हा स्वर अनंतकाळपर्यंत ऐकत रहावा असं वाटत होतं; पण त्यासाठी अभिषेक चालू रहायला हवा आणि या उमद्या माणसाचं रक्त चाललं आहे हे पहावत नव्हतं. तिरीमिरीसरशी गेलो त्यांच्या पायापाशी. दोन्ही हातांनी पाय घट्ट पकडले. त्यानं एक क्षणभर माझ्याकडे पाहिले. एक आगीची ज्वाला फर्रकन् अंगाला स्पर्शून गेली आणि मग मला ढकलून दिलं. मी धडपडत दूर जाऊन पडलो. त्या कृश हातात एवढी ताकद? पुन्हा रक्ताचा अभिषेक सुरू. त्याच्या कपाळावर रक्ताचा लालभडक मोठा टिळा होता...

... ... ...

ओंकारध्वनी वाढत गेला. पसरत गेला. डोंगरदऱ्यात...दऱ्याखोऱ्यात... वाटेवाटेवर. घराघरात त्याचा आपटून प्रतिध्वनी होत तो प्रचंड झाला. गृहगोलाच्या टक्करीतल्याहून प्रचंड आणि गंभीर नादब्रह्म प्रत्येकाच्या कानावर आदळले. तापल्या शिशासारखं जळजळत जाऊन हृदयाला ग्रासलं. आलीशान बंगल्यात... झोपडपट्टीत...फूटपाथवर. राजवाड्यात झोपलेले सगळे जागे झाले... वादळवाऱ्यात घोंघावत रोरावत खळाळत पिसाटासारख्या उसळणाऱ्या तुफानी लाटेप्रमाणे तो ध्वनी त्यांच्या कानातून पोलादी आघात करीत मेंदूपर्यंत जाऊन पोचला.

आणि मग...

सगळेच संतापले, कोण हा गोंधळ? एवढ्या लवकर कोणी उठविले? आमची झोप कोणी मोडली! सैतानासारखे संतापले...इंगळ्यासारखे डोळे लाल लाल करून. हाताला काय सापडेल ते घेऊन... बंदूक, पिस्तुल, लाठीकाठी, कुऱ्हाड, गज, सळया... निघाले.

रस्त्यारस्त्यावरनं गर्दीचे ओघ त्या शिखराकडे लागले. सगळेच एका गोष्टीनं झपाटलेले... त्या गदारोळात ते आपले भेद विसरले. गरीब-श्रीमंत...स्त्री-पुरुष...उच्च–

नीच... मालक–मजूर... ऑफिसर–क्लार्क सरारा निघाले, त्या उन्मत्त अमानवी आवाजाला ठेचायला संतापाच्या भरात झपाट्याने सगळेजण ते शिखर... मीच सोडलेल्या रक्ताच्या ठिपक्यांचा मागोवा घेत चढून आले. जे शिखर चढायला मला अतिशय त्रास झाला होता. ते शिखर... जे शिखर चढायला मला सगळी शक्ती एकवटावी लागली होती ते शिखर... ते अक्षरशः वायुवेगाने चढून आले.

समोरचं दृश्य पाहिलं मात्र... हातातली सगळी ताकद एकवटून सगळ्या वस्तू फेकून मारल्या. सगळ्या लांबवरच पडल्या. फक्त दोन दगड पोहोचले. एक थेट त्या उमद्या–त्यागी–तेजस्वी पुरुषाच्या डोक्यात बसला फटकन् कवटी फुटली आणि धाडकन् तो खाली कोसळला... स्मित करीत एखाद्या आसनस्थ योग्यासारखा. त्याच्या डोक्यातून विद्युल्लतेचा लोळ निघाला आणि सळसळत माझ्या डोळ्यात शिरला... माझ्या डोळ्यात सूर्य धगधगू लागले.

दुसरा त्या रक्ताच्या तळ्यात पडला... एक थेंब सरळ उंच झेपावला अन् माझ्या कपाळावर विसावला. माझ्या कपाळावर रक्ताचा लालभडक मोठा टिळा उमटला.

आणि डोंगरमाथ्याआडून लालभडक सूर्याचा गोळा प्रकाशाची उधळण करत... रंगांची खैरात करत तेजाची बरसात करत वर आला. माझं त्या गुलाबाच्या काडीकडे लक्ष गेले. त्याला दोन बारीक चुटुकदार पानं फुटली होती.

माळरानाच्या कडेला हातात भाले-बंदुकी कुऱ्हाडी घेऊन टपलेला माणसांचा कळप माझ्याजवळ पडलेला तो विनम्रमस्तक सत्पुरुष... गुलाबाच्या काडीला फुटलेली दोन कोवळी पानं...

मलाच...आता पुढलं काम मलाच करायला हवं. काल त्यानं आपल्या डोळ्यातलं तेज सूर्याला अर्पण करून अग्निहोत्र चालू ठेवलं: सूर्य त्याच्या रक्ताची ओळख घेत प्रखर झाला. फुटलेल्या दोन पानांना आता मीच रक्ताचा अभिषेक करायला हवा... तरंग उठतील. ओंकारध्वनी पसरेल. पुन्हा आज रात्री कोणी तरी येईल अग्निहोत्र चालू ठेवायला. उद्याच्या पहिल्या सूर्यकिरणापर्यंत माझं आयुष्य... बस्स... उद्याच्या सूर्यकिरणाकरिता माझं आयुष्य.

आज दिवसभर लोक धांदलीत असतील. माणसाला विसरलेली असतील. तेव्हा मी शांतपणे आवाज न करता जळीन. रक्ताचा अभिषेक करीन. कधीकाळी त्याला फांद्या येतील. नेत्रांना सुख देणारे रंगीबेरंगी गुलाब फुलतील आणि त्या गुलाबांची जपणूक करण्यात सगळं जग हरपून जाईल. हरखून जाईल. हेवेदावे विसरेल. रक्तलहरीतून उठणारं नादब्रह्म प्रत्येकाला झपाटून टाकेल.


पण...

पण तोवर तरी रक्ताचा अभिषेक मी चालू ठेवायला हवा. उद्याच्या सूर्याला उगविण्याची ताकद आणि तेज येण्यासाठी आज आत्ता मी रक्त आटवायला हवं. सगळं जग झोपलेलं असताना अग्निहोत्र मी चालू ठेवायला हवं. उद्याच्या दिनकराच्या पहिल्या पावलापर्यंत...

...अग्निहोत्र !

□


**सांगत्ये ऐका**



रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र

तिसरी आवृत्ती
किंमत बारा रुपये
लवकरच प्रसिद्धी

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

अफगाणिस्थान

लेखांक चवथा

प्रतिभा रानडे

काबूल

# बॉम्बिंग एवढे काटेकोर होते, की सगळे लोक म्हणत होते 'हे काम रशियन्सचे.'

## अफगाण क्रांतीची वाटचाल

अफगाणिस्थानचे प्रेसिडेंट नूरमहंमद तराकी यांना १४ जुलैला ६२ वर्ष पूर्ण झाली. राष्ट्रीय सण म्हणून त्यांचा वाढदिवस साजरा केला गेला. रोज रात्री ११ वाजता सुरू होणारा कर्फ्यू त्या दिवशी शिथिल करून १२ वाजेपर्यंत लोकांना हिंडायफिरायला मुभा दिली होती. तराकी यांचा चेहरा अतिशय सौम्य, शांत आहे. गेल्या २-४ महिन्यांपासून मात्र थकलेला, त्रासलेला दिसू लागलाय. दोन-दोन तास भाषणं देऊनही हळू आवाजात, संथपणानं आणि तरीही ठामपणानं बोलतात. आवेश, संताप, वरच्या पट्टीचं बोलणं कधी नसतं. एखादी गोष्ट लहान मुलाला समजावून सांगावी तसं, मोठेपणाचं, प्रौढपणाचं बोलणं आहे त्यांचं. घरातल्या म्हाताऱ्या आजोबासारखं व्यक्तित्व.

त्याउलट प्राइममिनिस्टर हफीजउल्ला अमीन यांचं व्यक्तित्व आहे. उग्र, रागीट चेहरा, आवेशानं चिडून, आग्रही बोलणं. हा माणूस काय वाटेल ते करू शकेल असं वाटावं, कुणालाही. मी असं एक-दोघा अफगाण लोकांच्याजवळ बोलले तेव्हा, ते म्हणाले, ते दोघं दिसतात तसे पण वागणं अगदी दिसण्याच्या विरुद्ध. अमीन सरधोपट माणूस आहे. तराकी मात्र कावेबाज आहे. या दोघांच्याही निस्पृहपणाबद्दल मात्र कुणाच्याच मनात संशय नाही. त्या दोघांना सत्तेवर येऊन दीड वर्ष झालं; पण अजूनही त्यांच्या नातेवाइकांना अधिकाराच्या जागा मिळाल्या नाहीत की त्यांना स्वतःला श्रीमंती आलेली नाही. अमीन तर अजूनही आपल्या जुन्या घरातच राहतो. तराकी मात्र खल्क पॅलेसमध्ये राहतात, ते सुरक्षिततेच्या दृष्टीने सोयीचं म्हणून असावं. पूर्वीच्या सगळ्या पार्टीवर्कर्सना मात्र साहजिकपणेच आता अतिशयच महत्त्व आलं आहे. ज्या पार्टीवर्कर्सना अधिकाराच्या जागा मिळालेल्या नाहीत ते म्हणतात, सगळ्यांनाच कशा अधिकाराच्या जागा मिळणार? पार्टीचं काम करायला मिळालं की पुरे. आम्हाला त्याच्याशीच कर्तव्य आहे, आम्हाला लोकांची सेवा करायची आहे... वगैरे वगैरे...

राज्यक्रांती झाली आणि तराकी हे कोणत्या टोळीचे याची चर्चा सुरू झाली. महमदझाई, अचकझाई, युसूफझाई, हजारा की ताणिक? पण याचं नक्की उत्तर कुणालाच माहीत नाही. फक्त गझनीचे राहणारे आहेत एवढंच माहीत होतं लोकांना. म्हणजे कदाचित 'कूची' ही असतील. शेकडो वर्षांपासून आपापली मेंढरं, उंट घेऊन थंडी, उन्हाळा या सीझनप्रमाणे कुरणांच्या शोधात भटकणारी ही भटकी जमात. अफगाणिस्तानातल्या राज्यकर्त्यांनी यांना जमिनीसुद्धा देऊन स्थायिक करण्याबाबत यांच्यापुढे हात टेकलेली अशी ही सगळ्यात कंडेम झालेली जमात. अफगाणिस्तानातल्या राजकारणात कोण कुठल्या टोळीचा, जमातीचा याला फार महत्त्व आहे.

वयाच्या पाचव्या वर्षापासूनच मोलमजुरीचं काम करावं लागलेल्या तराकींना ज्ञानाची हाव लहानपणापासूनच होती. कमालीच्या गरिबीत जमेल तेवढं शिक्षण घेत होते. चौदा-पंधरा वर्षांचे असताना सुकामेवा, फळांचा व्यापार करणाऱ्या एका व्यापाऱ्याबरोबर थेट मुंबईला गेले. तिथं १३ वर्षं होते. तिथल्या क्रॉफर्ड मार्केटची अजूनही त्यांना आठवण आहे असं त्यांनी एकदा सांगितलं होतं. नोकरी करता करता त्यांनी मॅट्रिकचा अभ्यास केला आणि मुंबईची मॅट्रिकची परीक्षा पास केली. इंग्रजी शिकले, भरपूर वाचन केलं. हिंदुस्थानातून परत आले तेव्हा इथे हुशार, चुणचुणीत, इंग्रजी येणाऱ्यांची कमतरताच होती. म्हणून आल्यावर त्यांना अमेरिकेतल्या अफगाण चॅन्सेरीमध्ये भाषांतरकाराची, प्रेस अटॅची म्हणून नोकरी लागली. एकदा जाहीरशहाच्या विरुद्ध, त्या वेळच्या इथल्या सर्वसामान्य अफगाण माणसाच्या हलाखीच्या जीवनाबद्दल, तराकी काही तरी बोलले. अर्थातच त्यांना पुन्हा परत बोलावून घेतले गेले. त्यांच्या अपेक्षेप्रमाणे त्यांना तुरुंगात मात्र जावं लागलं नाही. त्यानंतर त्यांनी काही वर्षं मास्तरकी केली आणि मग अमेरिकन एम्बसीमध्ये भाषांतरकाराचं काम केलं आणि ही सगळी वर्षे कम्युनिझमचा अभ्यास करण्यात, विचार करण्यात, मित्रांबरोबर चर्चा करण्यात गेली होती. १९६५ साली अफगाणस्थानातल्या कम्युनिस्ट पार्टीची—खल्क-पार्टीची—(खल्क म्हणजे जनता) स्थापना झाली. हफीजउल्ला

अमीन, कादर, बबरक वगैरे स्थापना करणाऱ्यांपैकीच होते; परंतु कादर, बबरक वगैरे कम्युनिस्ट असले तरी रशियाधार्जिणे नाहीत. त्यांचं आणि तराकी–अमीन यांचं पटलं नाही आणि एका वर्षातच कादर, बबरक यांनी परचमपार्टी–झेंडा पार्टी–काढली. हीसुद्धा कम्युनिझमची तत्त्वे मान्य असलेली; पण जराशी उजव्या बाजूला झुकणारी, रशियाचं वर्चस्व न मानणारी–नॅशनॅलिस्ट पार्टी.

कादरचा बाप-भाऊ वगैरे जाहीरशहाच्या कारकीर्दीमध्ये कशामुळे तरी मारले गेल्यामुळे कादर लहानपणीच अनाथ झाला होता. जाहीरशहाच्या जमान्यात दाऊदखान बरीच वर्षं प्राइममिनिस्टर होता. एकदा मध्ये फक्त ४-५ वर्षं सोडून. त्या दाऊदखानने मग कादरला स्वतःच्या मुलांबरोबर वाढवले, शिकवले. कादर अफगाणिस्थानच्या एअरफोर्समध्ये वरच्या हुद्द्यावर होता. दाऊदने जाहीरशहाला काढून सर्वसत्ता स्वतःकडे घेतली त्या वेळी कादरने त्याला मदत केली होती. नव्या विचाराने भारलेल्या कादरच्या लक्षात हळूहळू यायला लागले की, भलीमोठी आश्वासने देणारा दाऊदखानही मळलेल्या वाटेनेच जात आहे. लाचलुचपत, स्वतःच्या भाऊबंदांना अधिकाराच्या जागा देणं, गैरव्यवहार हे प्रकार वाढलेच होते. त्यामुळे दाऊदखानचे आणि कादर वगैरे लोकांचे पटेनासे झाले होते. सैन्याला मिळणाऱ्या अत्यंत अपुऱ्या पगारामुळे (महिन्याला भारतीय ६ रु. जेवूनखाऊन) सैन्यामध्ये असंतोष माजला होता. कादर आणि बबरकने सैन्यामध्ये आपल्याला खूप अनुयायी मिळवले. जवळजवळ ४० टक्के सैन्य कम्युनिझमबद्दल सहानुभूती बाळगून होते असं माहीतगारांचं मत आहे. तरीही कम्युनिस्टांच्या या दोन पार्टीज् कमकुवतच होत्या. म्हणून दोनच वर्षांपूर्वी खल्क आणि परचम या पार्टीज् एक झाल्या.

## घटनांची मालिका

७८ सालच्या सुरुवातीला दाऊदखानचा प्लॅनिंग मिनिस्टर सकाळी ११–११॥ च्या सुमारास पश्तुनीस्तान चौकासारख्या अतिशय गजबजलेल्या भागात, एका सिनेमा थिएटर समोर, त्याच्या ऑफिस बिल्डिंगच्या आवारातच मारला गेला. काही जपानी लोकांच्या बरोबर तो मिनिस्टर मीटिंगमध्ये होता, तेव्हा त्या खोलीत दंडेलीने शिरून काही लोकांनी त्या प्लॅनिंग मिनिस्टरला बाहेर बोलावले. बाहेर आल्यावर जिना उतरून खाली फूटपाथवर येऊन त्याला गोळ्या घातल्या. त्याला मारणारे कधीच सापडले नाहीत. पण त्या निमित्ताने दाऊदखानने ५०० – ६०० लोकांना तुरुंगात टाकले, काहींना मारूनही टाकले. पण शेवटपर्यंत मिनिस्टरचा खून कोणी केला, का केला, ते बाहेर आलेच नाही. कोणी म्हणत बाईची भानगड होती. कोणी म्हणाले, पैसा खाल्लेला पचला नाही. अशा ऐकीव बातम्यांमध्ये एक मात्र अगदी वेगळी गोष्ट ऐकायला मिळाली होती. काही लोकांनी त्या मिनिस्टरच्या गाडीतून, त्याच्या बरोबरच दाऊदखानच्या निवासस्थानी जाऊन, त्याला ठार मारण्याचा घाट घातला होता. पण आयत्यावेळी त्या मिनिस्टरने नकार दिला होता. पण त्याला मात्र सगळ्या लोकांची नावं, त्यांच्या हालचाली वगैरे माहीत झाल्या होत्या म्हणून त्या मिनिस्टरलाच मारून टाकण्यात आलं होतं.

त्यानंतर अफगाण एअरलाईन्समध्ये, एअरफोर्समध्ये गडबड चालली होती. सगळ्या पायलटस्नी पगारवाढ मागितली होती. त्याबद्दलची तणातणी चालूच होती. त्यांनी युनियन स्थापन केले होते. ते दाऊदखानने बेकायदेशीर ठरवून टाकले. आपल्याला आता धोका आहे असं वाटल्यावरून युनियनचा प्रेसिडेंट, एकदा विमान मास्कोला घेऊन गेला तो परत आलाच नाही. त्याने रशियामध्येच राजकीय आश्रय घेतला. त्यानंतर दडपादडपी खूपच वाढली. आणि एक दिवस पायलटस् युनियनच्या सेक्रेटरीचा संध्याकाळी त्याच्या घराच्या व्हरांड्यातच खून झाला. सरकारच्या हस्तकांनीच त्याला मारलं ही सर्वसाधारण लोकांची समजूत होती.

त्यानंतरची अत्यंत महत्वाची घटना, ज्यामुळे राज्यक्रांती झाली ती म्हणजे २७ एप्रिल ७८ च्या अगोदर १० – १२ दिवस खैबरी नावाचा कम्युनिस्ट पार्टीचा एक लोकप्रिय पुढारी दिवसाढवळ्या मारला गेला! याचा खूनही सरकारच्या हस्तकानेच केला अशी दाट अफवा होती. दुसऱ्या दिवशी त्याचा जनाजा– प्रेतयात्रा निघाली तेव्हा एकदीड लाख लोकांनी त्यात भाग घेतला होता. अफगाणिस्थानच्या इतिहासात एवढी गर्दी कधीच कुणाच्याच जनाज्याला जमली नव्हती असं जुने लोक सांगत होते. त्यावेळी तिथे तराकी, अमीन वगैरेंनी भाषणं केली, की सरकार लोकांच्या मागण्या, भावना दडपून टाकत आहे. पण सरकारची ही हुकुमशाही, जुलूम जबरदस्ती आता आम्ही सहन करणार नाही. आमचा लढा सुरू झाला आहे, आता आम्ही दबून राहणार नाही.

त्यानंतर दाऊदखानने तराकी वगैरेंना २६ एप्रिलला पहाटे पकडून तुरुंगात टाकले. म्हणून २७ एप्रिलला दुपारी खूप मोठा मोर्चा काढून अर्गपॅलेसवर जाण्याचं कम्युनिस्टांनी ठरवलं आणि तशी धमकीसुद्धा दिली होती. खरं म्हणजे नेहमीच्या रिवाजाप्रमाणे दाऊदखानाने त्या लोकांना तावडतोब मारूनच टाकले असते तर त्यात काही नवल नव्हते. पण एक दिवसासाठी दाऊदखान घोळ घालत बसला. आणि त्याचा कायदा कम्युनिस्टांनी घेतला. दाऊदखान त्या दिवशी असा का वागला असेल त्याबद्दल आम्ही एकदा आपापसातच चर्चा करत होतो. तेव्हा मुकुंदा म्हणाला, 'दाऊदखान एका दिवसासाठी हिंदू माणसांप्रमाणे वागला किंवा त्याच्यावर रशियाचे दडपण आले असावे.' (मुकुंदा– मि. रानडे) या म्हणण्यातला पहिला भाग विनोद म्हणून सोडून दिला तरी दुसरा भाग खरा असण्याची फार शक्यता आहे. कारण रशियाधार्जिण्या कम्युनिस्टांच्या कारवाया जाहीरशहाच्या वेळेपासूनच सुरू होत्या. विशेषतः काबूल युनिव्हर्सिटीमध्ये तर जाहीरशहा विरुद्ध, दाऊदखान विरुद्ध उघडपणाने भाषणं, चर्चा, टिंगलटवाळी व्हायची. दाऊदखान स्वतः थोडासा मार्क्सिस्ट विचारसरणीकडे झुकणारा, रशियाच्या सहानुभूतीनेच अधिकारावर आलेला होता. असं असताना अमीन, तराकी सारख्या त्याला गोत्यात आणू शकणाऱ्या लोकांना त्याने जिवंत कसे ठेवले हा प्रश्न पडतो. म्हणूनच अमीन, तराकी सारख्या आपल्या हातातल्या हुकमी पानांना धक्का लागू नये म्हणून रशियाने खबरदारी घेतली असण्याची दाट शक्यता आहे. म्हणूनच २६ एप्रिलला तराकीला पकडूनही दाऊदखान घोळ घालत बसला.

२७ एप्रिलला सकाळीच आर्मीचे काही जनरल्स दाऊदखानला

भटले आणि त्यांनी दाऊदखानला सांगितलं की, तराकीला पकडल्यामुळे लोक फार चिडले आहेत. २–४ लाख लोक अर्गपॅलेसवर मोर्चा घेऊन येणार आहेत. उगाच अनवस्था प्रसंग यायला नको म्हणून, दाऊदखानच्या, त्याच्या कुटुंबियांच्या संरक्षणासाठी काही मिलिटरी टॅन्क्स अर्ग पॅलेसच्या भोवतीनं उभे करावेत. दाऊदखानने त्या त्या वेताला परवानगी दिली आणि स्वतःच्याच death warant वर सही केली. दाऊदखानच्या संरक्षणासाठी म्हणून २७ एप्रिलला सकाळी १० वाजता अर्ग पॅलेस भोवतीनं मिलिटरी टॅन्क्स उभे राहिले आणि १०॥ ते ११ च्या सुमारास त्यांनीच अर्ग पॅलेसवर मशिनगन फायरिंग सुरू केले, त्यावेळी दाऊदखान अर्ग पॅलेसमधेच आपल्या सल्लागारांशी – मंत्र्यांशी – सल्लामसलत करीत होता. त्याचा बेत होता की, तराकी वगैरे लोकांना पश्तुनिस्तान चौकात भरदुपारी १२ वाजता फाशी द्यायचे आणि त्यांची प्रेतं २४ तास तशीच लटकत ठेवायची म्हणजे लोकांच्या मनात दशहत निर्माण होईल.

खैबरीच्या खुनानंतर दाऊदखानचे सरकार उलथून टाकण्याची कम्युनिस्टांची तयारी सुरू झाली होती, खरं म्हणजे तयारी केव्हाचीच होती पण वेळ येत नव्हती. वेगवेगळे बेत ठरत होते. तेवढ्यात तराकी वगैरे पकडले गेले. अमीन, कादर, ववरक यांनी ओळखले, की जर आत्ताच काही हालचाल केली नाही तर इतक्या वर्षांची तयारी फुकट जाणार, आत्तापर्यंतचे २–४ प्रयत्नही असेच फुकट गेले होते. आत्ता काही जोरदार हालचाल केली नाही तर आपण सगळेच्या सगळेच मारले जाऊ. सैन्याच्या आणि वायुसेनेच्या हालचाली भराभरा केल्या गेल्या. आणि १०॥ ते ११ च्या दरम्यान अर्गपॅलेस, दारूलअमान आणि कारघा या सैन्याच्या तळांवरती एकाच वेळी हल्ला चढवला गेला आणि लढाईला सुरुवात झाली, दाऊदखान गाफील राहिला होता म्हणून आणि दारूलअमान, कारघा आणि अर्गपॅलेस यांचा संपर्कच तुटला होता म्हणूनच संध्याकाळी ७ वाजता लढाई संपून कादर विजयी झाला. दाऊदखानच्या बाजूचे सैन्यही बरेच होते, संध्याकाळी ४–४॥ वाजता दारूल अमानचे सैन्य पुढे सरकत सरकत अर्गपॅलेसपासून २–२॥ मैलांवर आले होते. कादरला भीती पडली. की जर हे सैन्य असेच पुढे सरकू लागले तर आपण अर्गपॅलेसचे सैन्य आणि दारूल अमानचे सैन्य यांच्या कचाट्यात सापडू आणि मग शेवट अटळ होता. संध्याकाळी ५ वाजता कादरने विमानातून बॉम्बिंग सुरू केले आणि दोन तासात लढाईचा रंग पालटला. ५ ते ७ दोन तास भयंकर बॉम्बिंग झालं तरी गावातल्या लोकवस्तीच्या भागावर क्वचितच बॉम्ब पडले. अर्गपॅलेस, प्राईम मिनिस्टरी, मिनिस्ट्री ऑफ इंटिरिअर, कारघा आणि दाऊल अमान या ठिकाणी पिनपॉइंट केल्यासारखे बॉम्बस् पडले. मिनिस्ट्री ऑफ इंटिरिअर आमच्या घराच्या जवळच असल्याकारणाने बॉम्ब मिनिस्ट्री बिल्डिंगवर पडला पण ७–८ शेल्स मात्र आमच्या घरावर पडले! छपराला भोकं वगैरे पडली. जर तो बॉम्ब थोडासा आगे मागे पडला असता तर? पण तसे होणारच नव्हते, कारण बॉम्बिंग एवढे काटेकोर होते. की सगळे लोक म्हणत होते बॉम्बिंग करणारे नक्कीच रशियन्स होते! त्याशिवाय एवढे नेमके बॉम्बिंग झाले नसते!!

संध्याकाळी ७ वाजता कादरने पाठवलेला माणूस दाऊदखानकडे जाऊन शरणागतीच्या कागदावर सही मागू लागला तेव्हा दाऊदखानने त्यालाच मारायचा प्रयत्न केल्यावर त्या माणसाने मशीनगनच्या फैरी झाडून दाऊदखान आणि त्याचे सल्लागार मंत्री यांना मारून टाकले. राजवाड्यातले नोकरचाकरसुद्धा फितूर झालेले असल्यामुळे काहीही प्रतिकार न होता क्रांतिकारी सैन्य आत घुसले आणि दाऊदखानाच्या सगळ्या कुटुंबियांना–बायको, मुली, जावई, मुलं, सुना, दीड दोन वर्षांची नातवंडे सुद्धा मारून टाकण्यात आली. संध्याकाळी सात वाजता रेडिओ काबूलने बातमी दिली की, सरंजामशाहीच्या दाऊदखानाचा सफाया करून, रेव्होल्यूशनरी कौन्सिलने सर्वसत्ता स्वतःच्या हातात घेऊन, नादीरशाहीचा नायनाट केला आहे. अशा तऱ्हेने फक्त ९ तासात हजारो माणसं मेली आणि ही रक्तरंजित–क्रांती यशस्वी झाली. त्यानंतर तिसऱ्या दिवशी नवीन सरकारने अर्गपॅलेस प्रथमच लोकांना पहाण्यासाठी उघडला आणि अक्षरशः लाखो लोक तो अर्गपॅलेस पाहून गेले. आमच्यासारखे परदेशी लोक फोटो घेत होते तेव्हा तिथले पहाऱ्यावरचे शिपाई अगदी पोझेस घेऊन उभे रहात होते. पण दुसऱ्या दिवशीपासून त्यांनी फोटो काढायला बंदी घातली. आम्ही पहिल्याच दिवशी पहायला गेल्यामुळे खूप फोटो काढता आले. आम्ही गेलो त्यादिवशी दाऊदखानच्या कुटुंबियांनाच्या रक्ताने भिजलेल्या कार्पेटस बाहेर उन्हात वाळत टाकल्या होत्या, धुण्याचं काम सुरू होतं. आणि बॉम्बिंगमध्ये ढासळलेल्या, मोठाल्या काचांचा खच पडलेल्या मोडक्या मोडक्या विस्कटलेल्या फर्निचरच्या मोठाल्या खोल्यांतून कुजलेल्या मांसाचा भयंकर वास येत होता.

## न संपणारे शुद्धीकरण

नवीन सरकारने 'इस्लामी रिपब्लिक दा अफगाणिस्थान' जाहीर करून आपल्या कारवायांना सुरुवात केली. दाऊदखानच्या पाठोपाठच त्याचे भाऊ, वहिणी, काके, मामे वगैरे नातेवाइकांना, त्याच्या मंत्र्यांना आणि इतर संबंधितांना भराभर मारून टाकायला, तुरुंगात टाकायला सुरुवात केली. त्यांची घरंदारं, इस्टेटी सरकार जमा झाल्या. कादर आणि ववरक यांना एवढ्या रक्तपाताची जरूर भासत नव्हती. त्यांनी विरोधही दर्शविला पण तराकी–अमीन यांच्यापुढे त्यांचे काही चालले नाही. नवीन राजवटीमध्ये प्रेसिडेंट कोणी व्हावे यावरून चार दिवसांच्या टेन्शननंतर 'डेमोक्रॅटिक रिपब्लिक दा अफगाणिस्थान'च्या सरकारची कायदेशीर स्थापना झाली. आता 'इस्लामी' हा शब्द निघून गेला होता. नूर महमद तराकी हे प्रेसिडेंट आणि प्राईममिनिस्टर, हफीजउल्ला अमीन हे डेप्युटी प्राईममिनिस्टर, कादर हा डिफेन्स मिनिस्टर आणि ववरक हा फॉरेन मिनिस्टर झाले. लोकांची अपेक्षा, इच्छा होती, की कादर हा प्रेसिडेंट निदान प्राईममिनिस्टर तरी होईल, व्हावा. कारण कादर आणि ववरक हे लोकांमध्ये खूपच प्रिय होते–लोकांचे हीरो होते. त्यामानाने तराकी आणि अमीन ही दोघं पार्टीची माणसं म्हणूनच माहीत होती.

मंत्री मंडळाची स्थापना झाल्यानंतर जसजसा नव्या सरकारच्या योजना, धोरणं ठरू लागली तसतशी कादर–ववरक आणि तराकी–

अमीन यांच्यामधले तणाव वाढता वाढता विकोपाला गेले आणि शेवटी, नव्या सरकारच्या स्थापनेनंतर फक्त चारच महिन्यांनी कादरला तुरुंगातच टाकले आणि बबरक आणि त्यांची अनुयायी डॉ. अनाहिता रेतेज्झाद ( ही बाई सोशलवेल्फेअरची पहिली स्त्री मिनिस्टर होती. ) यांना दोघांना युगोस्लाव्हियामध्ये पळून जाण्यात यश मिळाले. कादर बबरक यांना रशियाच्या आधीन होत जाणारी तराकी अमीन यांची धोरणं पसंत नव्हती. म्हणूनच त्यांचा काटा काढून टाकण्यात आला होता. त्यामुळे सुरुवातीला नव्या आशा आकांक्षा घेऊन आलेलं, लाचलुचपत, पैसेखाऊपणा पासून दूर राहिलेलं, हे लोकप्रिय सरकार हळूहळू लोकांच्या मनात संशय निर्माण करू लागलं. कादर वगैरेंना तुरुंगात टाकलेलं जसं लोकांना आवडलं नाही, जुना झेंडा बदलून नवीन लाल झेंडा आणलेला आवडला नाही तशीच नव्या सरकारची रशियाशी वाढती दोस्तीही लोकांना पसंत नव्हती, इस्लाम विरोधी चाललेली हालचाल पसंत नव्हती. निखळ मार्क्सिझमला या लोकांचा जेवढा विरोध नाही तेवढा रशियन domination ला आणि इस्लाम विरोधी कारवायांना आहे. सध्या फक्त तराकीचे पर्सनल गार्डस तेवढे रशियन आहेत, अफगाण नाहीत. तसेच गार्डस संपूर्ण अफ़गाणिस्थानावर केव्हाही बसतील याची खात्री आणि भीती या लोकांना वाटते आहे.

एखाद्या देशात कम्युनिस्टांचं राज्य सुरू झालं, की ज्या विशिष्ट तऱ्हेने वाटचाल सुरू होते, त्या खास तऱ्हेने नव्या अफगाण सरकारने आपली पावलं टाकायला सुरुवात केली. सत्तेवर आल्या आल्या दाऊदखान आणि त्याचे कुटुंबीय यांचा सफाया करून टाकण्यात आल्यावर त्यांच्या इस्टेटीच काय पण त्यांची रहाती घरं, घरचं सामान-देखील सरकारजमा करण्यात आलं. तेव्हा पासूनच दोन तट पडू लागले होते. दाऊदखान आणि त्याच्या जवळच्या नातेवाइकांच्या घरातल्या सगळ्या सामानचं एक प्रचंड मोठं प्रदर्शन सरकारनं भरवलं, त्या सगळ्या वस्तू विकायला काढल्या, अगदी त्यांच्या कपड्यालत्त्यांपासून स्वैंपाकाच्या भांड्यांपर्यंत सर्व वस्तूंचं प्रदर्शन मांडलं. " हे ' इंपिरिअॅलिस्ट, फ्यूडॅलिस्ट ' लोक केवढी चैनबाजी करीत होते, कसे ऐषारामी आयुष्य जगत होते ते पहा," अशी भलीमोठी जाहिरातही केली. पण ही गोष्ट सर्वसामान्य लोकांना मुळीच आवडली नाही. सुरुवातीला तर या प्रदर्शनाकडे अफगाण लोक फिरकतही नव्हते. आमच्यासारख्या परकीयांचीच गर्दी व्हायची. मग वस्तूंच्या किमती कमी केल्यावर हळूहळू लोक तिथं जाऊ लागले. आणि त्यांना आश्चर्याचा धक्काच बसला. कारण ते ' इंपिरिअॅलिस्ट फ्युडॅलिस्ट ' लोक सर्वसाधारण बऱ्यापैकी श्रीमंत माणूस रहातो तसेच रहात होते असं आढळून आलं राज्यकर्त्यांची राजेशाही श्रीमंती तिथं आढळलीच नाही.

चार महिन्यांपूर्वी, क्रांतीपूर्वी तराकी ज्या घरात रहात होता ते घर राष्ट्रीय स्मारक म्हणून समारंभाने देशाला अर्पण केलं. ते पहायलाही फारच थोडे अफगाण लोक जातात, परदेशी लोक जास्त.

दाऊदखानच्या कुटुंबियांचा नायनाट केल्यावर त्याचे मिनिस्टर्स आर्मी जनरल्स आणि ऑफिसर्स, मोठमोठे दुकानदार, जमीनदार यांना तुरुंगात टाकायला सुरुवात झाली. कादर, बबरक यांना तुरुंगात टाकल्या नंतर इतर परचमीवाल्यांना तुरुंगात टाकायला सुरुवात झाली. वाईट लोकांना तुरुंगात टाकून संपूर्ण देश ' शुद्ध ' करण्याचं पवित्र काम सुरू झालं आणि ते अजूनही चालूच आहे. कारण कम्युनिस्ट राष्ट्रातलं pargiy ही कधीही न संपणारी गोष्ट आहे. पार्टी वर्कर्सचं महत्त्व एवढं वाढलं, की वेगवेगळ्या ऑफिसेस मधलं दैनंदिन काम सुरळीतपणानं होईनासं झालं.

मुकुंदाच्या ऑफिसात गेल्याच महिन्यात एक व्यवस्थित कपडे केलेला माणूस एक दिवस आला आणि म्हणाला, ' मी पार्टी वर्कर आहे, आज पासून प्रेसिडेंट म्हणून माझी इथे बदली झाली आहे.' प्रत्येक ऑफिसमध्ये अॅडमिनिस्ट्रेशनचं काम पहाणारे सीनिअर ऑफिसर्स असतात त्यांना प्रेसिडेंट म्हणतात. इथं अशा बदल्या, बदल्यांच्या ऑफिशियल ऑर्डर्स वगैरे न काढताही, केव्हाही व्हायला लागल्या आहेत म्हणून मुकुंदाच्या ऑफिसच्या लोकांना त्या माणसाचे म्हणणे खरे वाटले. मोठ्या इतमामाने त्याला त्याची खोली दाखवली, पी. ए., टायपिस्ट, स्टेनो वगैरे सगळे भेटून गेले. मग अफगाण इंजिनिअर्स, आर्किटेक्टस् भेटायला गेले; त्याला ऑफिसच्या कामाची माहिती दिली, कोणची कामं सुरू आहेत, पुढे काय करायचं वगैरे त्याला सांगितलं. रशियन आणि इंडियन्स अॅडव्हायझर्सची मिटिंग घेणार का म्हणून विचारलं, तेव्हा त्यांच्या लक्षात आलं, की या प्रेसिडेंटला काहीच माहिती नाही, काहीतरी असंबद्ध बोलतोय हा. तेव्हा मग एकाने मेयरला फोन केला आणि सांगितलं की अमुकअमुक नावाचा नवा प्रेसिडेंट आला आहे.

मेयर बुचकळ्यातच पडला. तो म्हणाला, ' हा कोणता नवा प्रेसिडेंट ? आपला प्रेसिडेंट तर इथं माझ्यासमोरच बसला आहे, आमची बोलणी सुरू आहेत. नव्या प्रेसिडेंटची ऑर्डर मी काढलीच नाही तर येईल कुठून नवा प्रेसिडेंट ?'

तेव्हा मग सगळ्यांच्या डोक्यात प्रकाश पडला की, हा कोणी बनावट प्रेसिडेंट आहे. मग सगळ्यांनी मिळून त्या माणसाला बदडून काढलं आणि हाकलून दिलं. ही गोष्ट जेवढी विनोदी आहे तेवढीच विदारक आहे. लोक पार्टी वर्कर्सना कसे घाबरून आहेत, कितीही मोठ्या अधिकारावरच्या लोकांना किती सहजपणानं नोकरीवरून काढलं जातं– बदल्या होतात– याचं हे उदाहरण आहे. म्हणूनच अत्यंत संशयाचं वातावरण आहे. कोणचा माणूस कधी आणि कशा-साठी तुरुंगात जाईल, मारला जाईल याचा कसलाही भरवसा राहिला नाही. निरनिराळ्या ऑफिसेसमधून कामं काही होतच नाहीत. जी काही होतात ती पार्टी ऑर्गनायझेनसंबंधीच असतात.

## नवे कायदे, नवी शिक्षणपद्धती

नव्या सरकारने जुने इस्लामी कायदे बदलून नवे सिव्हिलियन कायदे चालू केले. त्यामुळे मुल्ला मौलवींना काहीही महत्त्व राहिलं नाही. जुनी Hierarchy डळमळीत झाली. हेतू तोच होता; पण त्यामुळे मुल्लामौलवी जसे नाराज झाले तसाच सर्वसामान्य माणूसही नाराज झाला. त्याच्या श्रद्धांना धक्का बसला. मुलीच्या बापाला भरमसाट पैसे दिले तरच इथे लग्ने होत असत. त्यामुळे श्रीमंत असतील त्यांची चार चार लग्ने व्हायची तर गरीब–मध्यमवर्गीयां-मधल्या मुलामुलींना मध्यमवय उलटून गेलं तरी लग्नाशिवाय रहावं लागतं. ती पद्धत कायद्याने बंद करून २९ अफगाणी रुपयांच्या वर

( भारतीय ६ रु. ) पैसे देण्यास बंदी घालण्यात आली. त्यामुळे रूढीप्रिय म्हातारी माणसं नाराज झाली एक तर आर्थिक तोटा तर झालाच; पण खानदानाच्या इभ्रतीचाही प्रश्न होताच. लाख दीड-लाख रुपये देणाऱ्याच्या-घेणाऱ्याच्या इज्जतीचा असा निकाल लावलेला जुन्या लोकांना आवडला नाही. आता २९ रुपये 'शीरबहा' म्हणून घेतले तरी 'नामजाद' (साखरपुडा) आणि 'अर्सी' (बायकोला घरी आणणं- लग्न) यावेळी मुलाला खूपच मोठा समारंभ करावा लागतो, जेवणावळी घालाव्या लागतात- त्याही Hotel Inter Continental सारख्या महागड्या हॉटेल्समधून. अर्थातच हुंडाबंदीचा हेतू साध्य झाला नाहीच. तरुण मुलं-मुली, म्हातारे आईबाप नाराज झालेच; पण या गोष्टी त्यामानाने क्षुल्लकच.

महत्त्वाची गोष्ट म्हणजे नव्या सरकारने नवी शिक्षणपद्धती अमलात आणली. या पद्धतीनुसार प्राथमिक शाळेपासून युनिव्हर्सिटी लेव्हलपर्यंतच्या सर्व विद्यार्थ्यांचा जुना कोर्स बदलून अगदी नवा कोर्स सुरू केला. सगळी पुस्तकं विशेषतः इतिहास, अर्थशास्त्र, वाङमय या सेन्सेटिव्ह विषयांवरची पुस्तकं बदलली. रशियन शिक्षण तज्ज्ञांनी शिफारस केल्याप्रमाणे नवीन कोर्स आखला गेला. रशियन भाषेला प्राधान्य मिळाले. रशियन माध्यमातून शिकवल्या जाणाऱ्या शाळा वाढल्या. प्राथमिक शाळेपासूनच रशियन भाषा शिकवण्याचा त्यांचा बेत होता; पण एवढा स्ट्रॉंग डोस कदाचित पचायचा नाही. म्हणून सध्यातरी तो बेत बारगळला आहे; पण आज नाही उद्या तो बेत अमलात येणार हे निश्चित. कळत न कळत प्राथमिक वर्गापासूनच कम्युनिझमची तत्त्वे मुलांना शिकवली जाऊ लागली आहेत आणि याबाबतीत आपला प्रामाणिकपणा सिद्ध करण्याची हिरीरी अफगाण लोकांनाच जास्त आहे.

याचं एक उदाहरण म्हणजे इंग्लिश लिटरेचरच्या मुलांसाठी अगदी सुरुवातीला, अक्षरओळख करून देणारी चित्रांची पुस्तकं असतात, त्यांची आखणी सुरू होती. त्या कमिटीवर एक भारतीय प्रोफेसर होते, एक रशियन प्रोफेसर बाई होती. इंग्रजीमधला Q हा शब्द आल्यावर सगळे अडले. कारण Q या अक्षरापासून सुरू होणारा, चित्रामध्ये दाखवता येईल आणि विद्यार्थ्याला बघितल्यावर चटकन् समजेल असा Queen या शब्दाखेरीज दुसरा शब्द कुणाला आठवेना आणि अफगाण प्रोफेसर्सना Queen हा शब्द घालायचा नव्हता. कारण Queen म्हणजे राणी हे सरंजामशाहीचं प्रतीक ते कसं दाखवायचं ? खूप वेळ चर्चा झाल्यावर ती रशियन प्रोफेसर म्हणाली, तुम्ही एवढा घोळ कशाला घालता आहात ? Queen हा शब्द द्यायला काय हरकत आहे ? मुलांना चटकन् समजल्याशी कारण. तेव्हा कुठे Queen हा शब्द घातला गेला.

इथे भारतीय प्रोफेसर्स, शिक्षक खूपच लोकप्रिय आहेत; पण आता जे लोक आपली टर्म संपल्यावर परत जात आहेत त्यांच्या ऐवजी दुसरे भारतीय शिक्षक, प्रोफेसर्स आणण्याऐवजी रशियन शिक्षक, प्रोफेसर्स आम्ही आणू, असं काबूल युनिव्हर्सिटीचा एक प्रेसिडेंटच म्हणत होता. मुलांचंच काय पण मुलींचं शिक्षणही सक्तीचं केलं आहे. सहा वर्षांचं मूल झालं की, त्यानं शाळेत गेलंच पाहिजे हा कायदा. मुलींना शाळेत घातलं नाही तर बापाला शिक्षा. आपल्या मुलींना रशियन पुरुष-मास्तर शिकवणार म्हणून लोक घाबरले. खेड्यापाड्यात जिथं शाळा नाहीत तिथल्या मुलींना जबरदस्तीनं काबूलला आणून शिकवणार म्हणूनही लोक घाबरले. खरं म्हणजे ही सगळी अफवा मुद्दामहून पसरवली गेली होती; पण त्यावर लोकांचा विश्वास चटकन् बसला. प्रत्येक विद्यार्थ्याला शाळेत, कॉलेजात प्रवेश दिलाच जातो. जर सगळ्या मुलांची बसण्याची सोय नसेल तर जी मुलं त्या दिवशी उशिरा येतील त्यांनी उभं राहून शिकावं; पण शिकलं पाहिजे हा दंडक. त्याशिवाय जाहीरशहाच्या वेळेपासून सुरू असलेलं फुकटचं शिक्षण, रहाणं, जेवणखाणे, त्याशिवाय बिडीकाडीसाठी काही पॉकेटमनी एवढ्या सोयी असलेलं हे शिक्षण सगळ्यांना आता अगदी नकोसं झालं आहे. विशेषतः सर्वांत जास्त ज्यांना जरूर आहे त्या अशिक्षित, अर्धशिक्षित लोकांना. कारण असल्या परधार्जिण्या शिक्षणामुळे आपला इस्लाम धोक्यात येतो आहे अशी त्यांची दृढ भावना झाली आहे.

शाळा कॉलेजच्या शिक्षणावरोबरच राजकीय शिक्षणाचा कार्यक्रमही सरकारने हातात घेतला आहे. ऑफिसमध्ये झाडू मारणाऱ्यापासून प्रेसिडेंटपर्यंतच्या सर्वांना हे शिक्षण सक्तीचे आहे. ज्यांना लिहिता वाचता येत नाही त्यांना अगोदर लिहायला वाचायला शिकविले जाते आणि नंतर सरळ मार्क्सिझमचे धडे द्यायला सुरुवात होते. बायकांसाठी आठवड्यातून एकदा हे वर्ग असतात. पुरुषांना मात्र रोज वर्ग असतात. ऑफिसच्या परीक्षांपेक्षा या परीक्षांचं महत्त्व जास्त आहे हे सगळ्यांना कळून चुकलंय. ब्रेन वॉशिंगचं हे काम पद्धतशीरपणानं सुरू आहे. आपला ब्रेन वॉश होऊ द्यायचा की नाही हे स्वातंत्र्य त्यांना नाही. कारण ब्रेन वॉश होऊ दिला नाही तर आपली नोकरीच काय पण जीवही जाईल ही खात्री प्रत्येकाला पटलेली आहे. आणि त्याहीपेक्षा, आज प्राथमिक शाळेत जाणारी आपली मुलगी-मुलगा आणखी १२ वर्षांनी कम्युनिस्ट होणार आहे, इस्लामवर अविश्वास दाखविणार आहे, आपल्या संस्कृतीपासून तोडून काढलेली, संपूर्णपणानं वेगळीच अशी एक व्यक्ती घडणार आहे हा विचार इथल्या लोकांना अतिशय भयावह वाटतो आहे.

या सगळ्या कारणामुळे सरकार विरुद्ध मत वाढत जाऊन, बंडखोरांच्या कारवाया अतिशय धीटपणाने सुरू आहेत. इथे सध्या जमियत-ए-इस्लामी, हेजिब-ए-इस्लामी आणि शोला-ए-जावेद हे तीन पक्ष सरकार विरुद्ध लढत आहेत, त्यापैकी-पहिले दोन पक्ष इस्लाममध्ये गाढ विश्वास असणारे आहेत तर शोला-ए-जावेद ही पार्टी माओवादी आहे. अलीकडे इराण, पाकिस्तान, अमेरिकेच्या बरोबरीने चीनही अफगाण सरकार विरुद्ध कारवायांना खूप मदत करतो आहे. असा आरोप तराकीने सुरू केला आहे. अफगाणिस्थानातली महत्त्वाची ४-५ शहरं-काबूल सोडून-ती सुद्धा अधून मधून ४-८ दिवसासाठी बंडखोरांच्या हातात जातात-वगळता बाकी सगळीकडे सरकारपेक्षा बंडखोरांचीच सत्ता चालते आहे. या ना त्या कारणामुळे सर्व थरातील लोक सरकारने दुखावून ठेवल्यामुळे त्यांचाही बंडखोरांना कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्ष पाठिंबा आहे. बंडखोरांनी पाकिस्तानात 'क्वेट्टा' इथून आणि इराणमध्ये 'मशद या गावामधून जून अखेरीपासून दोन रेडिओ स्टेशन्स सुरू केली आहेत. तेव्हापासून बंडखोरांचा आवाज घराघरातून गेला आहे.

ललकाऱ्या...... नव्या

या सगळ्यांचा परिणाम म्हणूनच की काय, प्रेसिडेंट नूर महंमद तराकी यांनी १९ जुलैला, त्यांना भेटायला आलेल्या मुल्लामौलवी-समोर भाषण करताना सांगितलं की—" आमचा इस्लामला सर्व तऱ्हेनं, संपूर्णपणानं पाठिंबा आहे ! " तराकी यांना भेटायला रोज कुठल्या ना कुठल्या प्रांताचे लोक येत असतात—खरं म्हणजे हे लोक आणवले जातात—इमरजन्सीमध्ये इंदिरा गांधींना भेटायला जसे लोक यायचे—आणवले जायचे तसेच. आणि इंदिरा गांधीप्रमाणेच तराकी-सुद्धा त्या लोकांसमोर भाषण करतात. फरक एवढाच, की इंदिरा गांधी खरोखरच लोकांसमोर उभ्या राहून भाषण द्यायच्या तर तराकी आपल्या खोलीत बसून भाषण देतात आणि भेटायला आलेले लोक बाहेर कुठेतरी असतात. आणि टी. व्ही. वर हा कार्यक्रम दाखविताना समोरासमोर असल्याचा आभास निर्माण केला जातो. तराकी किंवा अमीन यांची अशी भाषणं टी. व्ही. रेडिओवर दीड-दोन तास सतत सुरू असतात आणि थांबून थांबून पुन्हा पुन्हा. दर-वेळी कुठल्याही भाषणात तराकी—अमीन यांचं नाव आलं, की—प्रचंड टाळ्या वाजवल्या जातात आणि दरवेळी तराकी यांचा उल्लेख आला, की त्यांच्या नावामागे, पूर्वी बादशहाच्या जाण्यायेण्याच्या वेळी जशा ललकाऱ्या व्हायच्या, त्याप्रमाणे तराकींची सगळी माहिती दिली जाते. ते वाक्य असं " मुन्शी, ओमोमी, कमिटी ए मरकझी अझ्बे डेमोक्रॅटिक खल्क, वा रईस ए शोरोए इन्किलाबीं वा—रईस—ए शोरोए अली दफा ए वतनदर जमूरी डेमोक्रॅटिक दा अफगाणिस्तान."

याचा अर्थ असा—" खल्क डेमोक्रॅटिक सेंट्रल पार्टीचे जनरल सेक्रे-टरी आणि लोकांच्या क्रांतीचे अध्यक्ष आणि राष्ट्राचे संरक्षण कर-णाऱ्या मोठ्या कमिटीचा मुख्य आणि डेमोक्रॅटिक रिपब्लिक या अफ-गाणिस्तानचा प्रेसिडेंट......

एवढं सगळं मोठंच्या मोठं वाक्य दरवेळी तराकी यांच्या नावामागे लावलं जातं !

मार्क्सिझम ही इस्लाम सारखीच एक closed system आहे. ' प्रश्न विचारायचे नाहीत. ' ' आमच्याकडे सर्व प्रश्नांना उत्तरं आहेत. ' या दोन तत्त्वांवर मार्क्सिझम आणि इस्लाम उभा आहे. मार्क्सिझमला प्रश्न विचारणारे ' बूर्झ्वा ' ठरतात आणि इस्लामला प्रश्न विचारणारे ' काफर ' ठरतात. बदलत्या जगाचे संदर्भ मार्क्सि-झम आणि इस्लाम लक्षातच घेत नाही. उलट ते संदर्भच चुकीचे असल्याचे त्यांच्या त्यांच्या पद्धतीप्रमाणे सिद्ध करून दाखवले जाते. पाणी वाहत राहिलं नाही तर त्याचं डबकं होतं, त्यावर शेवाळ जमतं त्याप्रमाणे मुळातल्या तत्त्वांना बदलत्या परिस्थितीनुरूप वळण न दिल्यामुळे, मूळच्याच तत्त्वांना चिकटून राहिल्यामुळे कोणालाही धर्माला काय किंवा ईझमला काय, स्टॅग्नेशन येतंच. बंदुकीच्या जोरा-वर किंवा धार्मिक मूल्यांच्या जोरावर किती दिवस तग धरून रहाणं शक्य आहे ? या संघर्षातून आता कोणता नवा दिवस जन्माला येतो ते पहायचं.

इस्लाम आणि मार्क्सिझममध्ये एवढं साम्य आहे म्हणूनच दोघांचं कधी पटणंही शक्यच नाही. तरीसुद्धा इस्लामविरोधी आणि लोकांना नको असलेल्या सध्याच्या राज्यकर्त्यांना काढून, उद्या इथं इस्लामकडे मायाळू दृष्टीनं पहाणारे दुसरे मार्क्सिस्टच इथं येण्याची शक्यता आहे. ही किमया करून दाखवण्याच्या खटपटीतच सध्या रशिया गुंतला आहे. कारण इथल्या मुसलमानांना दुखवलं तर त्याचे परिणाम रशियाव्याप्त मुसलमानांवर होतात—उजबेकिस्तान, ताजिकिस्तान वगैरे ठिकाणी—आणि ते आपल्याला फारच महाग पडेल याची जाणीव रशियाला आहे. इराणमध्ये आणि इराण—रशिया सरहद्दी-वरच्या कुर्दीस्तानमध्ये असा संघर्ष निर्माण झालाच आहे. हा धोका अफगाणिस्तानात पत्करायची रशियाची मुळीच इच्छा नाही.

आणि याची शंका रशियाला पूर्वीपासूनच होती. म्हणूनच रशियाने जेव्हा काबूलमध्ये १०—१५ वर्षांपूर्वी पॉलिटेक्निक इन्स्टि-ट्यूट बांधून अफगाणिस्तानला बक्षीस दिली तेव्हा तिथं शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक लहानशी मशीदही बांधून दिली ! पॉलि-टेक्निकच्या विद्यार्थ्यांना रशियन माध्यमातूनच शिक्षण दिले जाते आणि बाहेर पडणारा विद्यार्थी मार्क्सिस्ट तत्त्वे डोक्यात घेऊनच बाहेर पडतो ही गोष्ट निराळी; पण मशीद बांधून दिलीच. रशियाची दृष्टी फार दूरवर पोचते हेच खरं... ◘

# मिस्टर सिराज

पन्नास, पंचावन्न वर्षांचे मिस्टर सिराज हे दाऊदखानाचे चुलतचुलत भाऊ, अमीर अमानुल्लाचे पुतणे आणि सरय्याराणीच्या मोठ्या बहिणीचे चिरंजीव. अमेरिकेत आठ—दहा वर्षं राहून आर्किटेक्चरची पदवी मिळवली. दाऊदखानच्या राजवटीत आणि त्याहीपूर्वी जाहीर-शहाच्या वेळी, इमारती बांधण्यासाठी कर्जे देणाऱ्या बँकेचे ते चेअर-मन होते. त्याशिवाय आणखी कोणत्या कोणत्या बोर्डावरचे डायरेक्टर वगैरे. त्यांचा एक मोठा भाऊ राज्यक्रांतीपूर्वी भारतामध्ये अफगाणि-स्तानचा राजदूत होता, दुसरा भाऊ युरोपमधल्या एका देशामध्ये राजदूत होता. राज्यक्रांतीनंतर त्या दोघांना नवीन सरकारने परत बोलावलं; पण इथं आल्यावर काय होणार त्याची कल्पना असल्या-मुळे दोघंही भाऊ परत आले नाहीत. सध्या ते कुठं आहेत कुणालाच माहीत नाही. अमानुल्ला अफगाणिस्तान सोडून निघून गेल्यावर मि. सिराज यांचे वडील ८—१० दिवसांसाठी अफगाणिस्तानचे अमीर होते.

नवीन सरकारची हुकमत सुरू झाल्यावर सिराज यांना नोकरी-वरून काढून टाकण्यात आलं. त्यांच्या गाड्या काढून घेतल्या, फोन बंद झाला. घरावर पहारे बसले. कुणालाही त्यांना भेटायला बंदी. सहा महिन्यांनंतर म्युनिसिपालिटीमध्ये साधा ड्राफ्टस्‌मन म्हणून रुजू व्हावे अशी ऑर्डर निघाली. ' नाही ' म्हणायचीही सोय नाही. जिवंत ठेवलं हेच आश्चर्य.

एकदा काबूलमधील अमेरिकन लायब्ररीत एका अमेरिकन आर्कि-टेक्टच्या भाषणाला गेलो होतो तेव्हा मि. सिराज तिथं भेटले होते. मी तर त्यांना ओळखलंच नाही. एकेकाळच्या त्यांच्या भल्या मोठ्या आडव्या शरीरावर आज, एखाद्या बुजगावण्यावर घालावा तसा

त्यांचा सूट लोंवकळत होता. अत्यंत ओढलेला, भकास चेहरा; पण डोळे म्हणजे पेटते पलिते होते. आपलं सावज कधी कबजात येईल त्याची वाट पहात बसलेल्या वाघासारखी त्यांची नजर होती.

'तुम्हाला भेटून आनंद झाला.' वगैरे औपचारिक बोलणं झाल्यावर ते म्हणाले. 'आम्हा लोकांना जिवंत तरी कसं ठेवलं कुणास ठाऊक? ( त्याचं खरं कारण म्हणजे त्यांच्याएवढे शिकलेले आणि अनुभवी लोक अफगाणिस्थानात फारच थोडे आहेत. आणि अमानुल्लाच्या जवळच्या कुटुंबियांना नवीन सरकारला त्रास द्यायचा नाही. कारण अमानुल्ला ब्रिटिशांशी म्हणजेच इंपिरिलिस्ट लोकांशी लढला होता! )... पण काळ बदलतो आहे, आणखी बदलेल. उद्या काय होईल कुणास ठाऊक? नव्या सरकारने सगळ्या थरांतल्या लोकांना दुखावून ठेवले आहे ते मात्र त्यांना फार जड जाणार आहे.'

त्यांची आई म्हणजे सरय्याराणीची मोठी बहीण क्वाकाब. हिची चौकशी केली तेव्हा ते म्हणाले, 'आई आता नव्वद वर्षांची आहे. तिचे दोघं मुलगे कुठं आहेत कुणास ठाऊक? इथली परिस्थिती कशी आहे ते तुम्ही पहाताच आहात. तसं म्हटलं तर अशा तऱ्हेच्या Disturbed days ची तिला सवयच आहे. अमानुल्ला इथून निघून गेल्यावर १०–१५ दिवसांनी माझ्या आईवडिलांनाही, आम्हा मुलाबाळांसकट परागंदा व्हावं लागलं होतं. रोम, इराणमध्ये १०–१२ वर्षं निर्वासिताचं आयुष्य काढलं होतं. पण आता ती म्हातारी झाली आहे. तिला खूप वर्षांपूर्वी घडलेल्या काही गोष्टी आठवतात तर काहींचा अगदीच विसर पडला आहे.'

'त्यांना भेटायची इच्छा आहे' असं मी त्यांना म्हटलं. तेव्हा ते म्हणाले, 'तुमच्या भावना मी समजू शकतो पण काही दिवस थांबा. सध्याचे दिवस काही बरे नाहीत. अजूनही माझ्या घरावर पहारे आहेत. तुम्ही माझ्या घरी आलात तर उगाचच नको त्या कटकटी निर्माण होतील. तुम्हाला त्रास, मलाही त्रास. कारण माझ्या घरी कोण आलं गेलं त्याची सरकारात नोंद होते.'

नव्या राजवटीबद्दल ते म्हणाले, 'मार्क्सिझम ही अशी गोष्ट आहे, की मुद्दामहून आणू म्हणून ती आणता येणार नाही, की नको म्हणून थांबवता येणार नाही. It takes its own course. पण दुसऱ्या देशाला आपला देश विकायचा की नाही हे ठरवणं मात्र आपल्या हातात असतं. अफगाणिस्थान त्याबाबतीत काय ठरवतो ते पाहू या आता.'

दोन वर्षांपूर्वी म्हणजे दाऊदखानच्या वेळी वर्ल्डबँकेची एक टीम इथं आली होती. त्यामध्ये ३–४ व्हिएटनामी लोक होते. त्यांना आणि सिराज यांना घरी कॉकटेलसाठी बोलावलं होतं, तेव्हा मी त्यांना प्रथम पाहिलं. तोपर्यंत इतक्या टापटिपीनं आणि चोखंदळपणानं कपडे केलेला माणूस मी पाहिला नव्हता. मी तसं म्हटल्यावर मुकुंदा मला म्हणाला, 'तरी तू त्यांचं ऑफिस पाहिलं नाहीस. ऑफिसचं फर्निचरसुद्धा त्यांनी स्वतः डिझाईन केलं आहे आणि कार्पेटपासून पिनहोल्डरपर्यंत प्रत्येक वस्तू उत्कृष्ट आहे.'

गप्पा मारताना त्यांनी पक्ष्यांच्या शिकारीच्या गंमती सांगितल्या होत्या. जगातल्या कोणत्या देशात कोणत्या कलाकुसरीच्या वस्तू चांगल्या मिळतात, ते त्या वस्तूंच्या वर्णनासह, बारगेनिंग कसं करावं या सूचनांसह खुलवून सांगितलं होतं. जगातल्या मोठमोठ्या लोकांच्या गमती सांगितल्या होत्या. अँन्टी-रशिया जोक्स सांगितले होते. तेच ते राजघराण्यातले सिराज आता बसने ऑफिसला येतात आणि अगदी कमी दर्जाचं काम करतात. नव्या राजवटीबद्दल चिडलेले लोक सिराजबद्दल म्हणतात, 'सिराजसारख्या माणसांनी सरकार विरुद्ध उठलं पाहिजे, पण हे लोक तर सरकारने टाकलेल्या तुकड्यांवर मिंधेपणाचं आयुष्य जगत आहेत. मरून का जात नाहीत हे लोक?'

ऑफिसमधल्या रशियन Experts च्या ठोकळेबाज टाऊनप्लॅनिंग आणि भयंकर महागड्या बिल्डिंग्जविरुद्ध मुकुंदा नेहमीच भांडतो. एखादेवेळी कंटाळून निघून जायची धमकी देतो. अशाच एका भांडणानंतर सिराज मुकुंदाजवळ येऊन, त्याचे हात हातात घेऊन म्हणाले, 'प्लीज, रानडे, तुम्ही इथून जाऊ नका. तुम्ही आहात म्हणून रशियन डेव्हलपमेंट प्लॅनला काही तरी खिळ बसेल, निदान ते काम लांबणीवर तरी पडेल. नाहीतर हे लोक उद्यापासूनच काबूल शहरासारख्या लहानशा शहरात ८० फुटी रस्ते आणि दोन्ही बाजूंना १२।१२–१४।१४ मजली इमारती बांधतील, ५० हजार लोकांना पुरेल एवढाली स्टेडियम्स बांधतील आणि आमच्या सुंदर शहरामध्ये सिमेंटचं जंगल बांधून ठेवतील. हे रस्ते, अशा बिल्डिंग्ज आम्हाला परवडणाऱ्या नाहीत. आमच्या गरीब लोकांनी मग जायचं कुठे? कुठं रहायचं? आर्किटेक्ट म्हणून तुम्हाला हे सगळं किती असह्य होत असेल ते मी माझ्यावरून समजू शकतो. पण तरीं तुम्ही इथं रहा. शक्य असेल तेव्हा रशियन्सशी भांडा, कारण आज आमचे लोक भांडू शकत नाहीत, रशियाप्रेमानं आंधळेपण आलंय त्यांना. तुमच्यासारख्यानाच ते शक्य आहे. आज त्याचा काहीही उपयोग झाला नाही तरी कदाचित उद्या होईल... उद्याचं कोणी सांगितलंय?' □

**लेखांक पाचवा : पुढील अंकी**


# टॉलस्टॉय – एक माणूस

## लेखिका : सौ. सुमति देवस्थळे

आवृत्ती दुसरी । मूल्य पंचावन्न रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# फिनिक्स ग्रंथालय

## The Snow Leopard

By Peter Matthiessen

संपादक महाशयांची निवड ! अलीकडे 'Time' साप्ताहिकाच्या शेवटच्या पानावरील जी बेस्ट सेलर यादी येते त्याच्या माथ्यावर 'टाइम संपादकांची पुस्तकांची निवड' अशी एक यादी येते. संपादक हे काही फालतू प्रस्थ नव्हे हे सर्वांना माहीतच आहे. (मराठी संपादकांनीसुद्धा अशी सूची दिली तर फायद्याचे होईल.) संपादकाला माहिती मिळण्याची बरीच साधने असतात. त्यामुळे त्याच्या शब्दाला महत्त्व असते आणि म्हणूनच थोडया दिवसांनी याच संपादकांच्या यादीतील पुस्तके खालच्या बेस्टसेलर यादीत उतरतात.

काही काही संपादक हातात एखादे नियतकालिक असल्यामुळे वाटेल त्याचे चारित्र्यहनन करतात. He presides over his own tiny kingdom. अमुक करा नाहीतर तुमचे सारे चव्हाट्यावर आणू अशी भूमिका घेणारे संपादकही असतात. तर काही निव्वळ वेगळेपणाची (dissident) संपादकाची भूमिका घेतात; पण नियतकालिक एकदा परिपक्व झाले की सर्व सारासार विचार करूनच त्याचे संपादक मजकूर छापतात. Sober मजकूर यायला लागला की त्या नियतकालिकाला परिपक्वता आली असे समजायला हरकत नाही. या दृष्टीने हे 'टाइम' साप्ताहिक निश्चितच परिपक्व झाले आहे. पण त्याचा भारताविषयीचा आकस मात्र समजण्यापलीकडचा आहे. अशी snobbery ! हे साप्ताहिक भारत व अन्य गरीब देशांतील बाबी बऱ्याच वेळा Third or Fourth world tomfoolery म्हणून निकालात काढते !

संपादकांचा विषय निघाला म्हणून थोडेसे विषयांतर झाले. पीटर मेथियसेनचे वरील पुस्तक टाइमच्या संपादकांच्या यादीत होते.

पीटर मेथियसेन हा एका शक्कल लढविणाऱ्या हिमालयातील मांजराच्या शोधात तिबेट पर्वतात बराच हिंडला. येथे मांजर म्हणजे चित्ता. ( leopard ) तो कॅट फॅमिलीतला. (म्हणून कधी कधी सिंहालाही मांजर म्हटले जाते ! ) हिम चित्ता म्हणजे एक दुर्मिळ चीज होय. ती गवसता गवसता मेथियसेनला मेथियसेनसुद्धा गवसला, He discovered himself. त्याच्या दौऱ्यात त्याला इतरही कैक गोष्टी सापडल्या. त्या सर्व त्याने या पुस्तकात टिपून ठेवल्या आहेत. टिपूर चांदण्यातली शिखरे व दर्या, उन्हामधे घटकाभर चमकत असलेली व दुसऱ्याच क्षणी धुक्यात विलीन होणारी शिखरे, भरल नावाची निळी मेंढी. (ही धड मेंढीही नाही व धड शेळीही नाही ) हिमालयातील चित्त्यांचे ठसे, त्या प्रदेशातील प्रजा वगैरे गोष्टी त्याने आटोपशीर रीत्या दैनंदिनीमध्ये लिहून ठेवल्या होत्या. मेथियसेनला वाटले जेथे भरल विपुल, तेथे हिमालयीन चित्ता असणारच.

गेल्या पंचवीस वर्षात फक्त दोन पाश्चात्त्य माणसांनी हिम चित्ता पाहिला आहे. लेक नेस मधला नॅसी जसा सतत हातावर तुरी देऊन गायब होत असतो तसाच हा प्राणी आहे. जवळ जवळ तशीच ती एक आख्यायिका आहे.

हिमालय, तिबेट वगैरे शब्द वाचले म्हणून आठवते. तिबेटमध्ये कुणी अभ्यागत गेला की त्याच्यामागे ब्लडप्रेशर घेणारा सतत हिंडत असतो ! थोडासा आडवा पडला की घे ब्लडप्रेशर ! चालण्याचा, चढण्याचा थोडा व्यायाम जास्त झाला ? करा हात पुढे ! या पृथ्वीच्या छपरावर जाण्यापूर्वी जरूर विचार करा !

तेथील कुली मात्र ८०–८० पौंड वजन उचलून दिवसभर चालत, चढत असतात आणि दिवसाच्या शेवटी त्यांच्या पदरात ८–१० रु. जेमतेम पडतात. आपण इकडे स्वेटर विकणारे तिबेटी बघतो, तेव्हा हे लोक किती सोशीक आहेत ते कळते. फार उंच उंच राहून जणू ते विश्वातच विलीन झाले आहेत की काय असा भास होतो आणि त्यांचे ते उंचवटे आलेले high cheekbones. जणू हे सुद्धा तिथल्या उंच उंच पर्वतांमुळेच आले आहेत की काय असे क्षणभर आपल्याला वाटते.

मेथियसेन सप्टेंबरमध्ये वाराणसीला आले व त्यांनी तेथे बौद्ध गया व सारनाथचे दर्शन घेतले. सप्टेंबरचा उकाडाही मेथियसेनला असह्य झाला. १०१ किंवा १०२ टेंपरेचरमध्ये बरेच गोऱ्या कातडीचे लोक मरतात. थोडया वर्षांपूर्वी ब्रिटनमध्ये १०१–१०२ ची हीट वेव्ह आली होती तेव्हा कित्येक लोक मेले होते, या लोकांना जसा उकाडा जास्त होतो तसाच संसर्गही लवकर लागतो. भारतात आलेल्या पाश्चात्त्य लोकांना डिसेंट्री, कावीळ वगैरे रोग पुष्कळ प्रमाणात होतात. आपल्याला मात्र डास चावले नाही किंवा माश्या बसलेले पदार्थ मिळाले नाहीत तर चुकल्यासारखे वाटते ! भारतीय माणूस जगाच्या पाठीवर कुठेही गेला तर तो बहुतेक सर्व रोगांना इम्युन होईल.

स्नो–ब्लाईंडनेस अशी काही चीज असते हे मी प्रथम या पुस्तकातच वाचले. मेथियसेन बरोबर गेलेल्या कुलींना हा रोग झाला होता. त्याने डोळे फार झोंबतात. मला वाटले होते बर्फात राहून डोळ्यात गारवा वाटत असेल. या रोगावर काहीच इलाज नाही. फक्त कालांतराने तो बरा होतो, या रोगामुळे डोळ्यात कुणी रेती टाकली आहे असा भास होतो.

एक विक्षिप्त गोष्ट ही की थोड्याशा प्रयत्नाने टाळता येणाऱ्या या रोगाचा हिमालयातील रहिवाशांना फार त्रास होतो. स्नो गॉगल घातल्याने हा रोग होत नाही किंवा कपाळावर साध्या चिंध्या बांधल्या तरी हा रोग टाळता येतो. परंतु तेथील रहिवासी जणू कशाचीच पर्वा नाही असे वागतात. तिथल्या आसमंताशी, भोवतालच्या परिस्थितीशी त्यांनी समाधानकारक जुळवाजुळव केली नाही असे मेथियसेनला वाटते. मी आधी सांगितलेच आहे, की त्यांची चर्या म्हणजे मरण्यापूर्वीच अनंतात विलीन झाल्यासारखी वाटते. समजा खुद्द हिमालय जरी हवेत उडाला तरी त्यांच्या चर्येवरचे भाव बदलतील की नाही ही शंकाच आहे.

ज्याला आपण माकड माकड म्हणतो त्याच्या जाती तरी किती आहेत त्याचा आणखीन एक प्रत्यय आला. चिंपांझी, बबून, गोरीला, कोलोबस, ऱ्हेसस मंकी, मॅंड्रील अमेरिकेतील खारुताईसारखे मार्मोसेट वानर,

macaque वानर, दक्षिण अमेरिकेतील कॅप्युचीन वानर, लेंगूर वगैरे अनेक माकडांविषयी मी वाचले होते. परंतु हिमालयात लेंगूर वानर असतो हे याच पुस्तकात वाचले आणि हे थंडीतले हनुमानजी भलतेच सुंदर असतात! यांच्या चर्येवर सुद्धा ' I could not care less ' असाच भाव असतो ! इथले प्राणी पण उंचीमुळे अनंताशी एकजीव होतात की काय ? पण हा हनुमान एखाद्या टोळीचा म्होरक्या झाला की सर्व अर्भक वानरांचा नाश करतो, हे या जातीच्या वानराचे वैशिष्ट्य आहे असे मी ' In the Shadow of Man ' या पुस्तकाचा परिचय करून देताना सांगितले आहे. हे लेंगूर जातीचे माकड म्हणजे हनुमानाचाच आविष्कार असे आपण हिंदू धर्मात मानतो. या माकडाचे हिमालयातील ठसे हे ' abominable snowman ' ठसे आहेत असा काही लोकांनी समज करून घेतला आहे, असे मेथियसेनचे म्हणणे आहे.

हिमचित्ता हा अशा ठिकाणी लपून बसतो की त्याच्या कातडीचा रंग आणि भोवतालचा परिसर एकजीव होऊन जातो. याच कारणामुळे त्याच्या पासून आपण काही फुटांवरुन गेलो तरी तो आपल्याला दिसत नाही आणि मेथियेसन तर त्याच्या शोधात हजारो मैल लांबून आला होता.

हिमचित्ता हा दक्षिण चीन, मध्य आशियाच्या पर्वतावर, अफगणिस्थानमधील हिंदुकुश, हिमालय, उत्तर रशिया, मंगोलियाच्या सायबेरीयन बॉर्डर या प्रदेशात रहातो. त्याची रहाण्याची ठिकाणे जरी एवढी असली तरी त्याची विपुलता फारच कमी आहे. हिमचित्त्याचे डोळे धुक्यासारखे असतात व त्याची कातडी थोडोशी धुक्यासारखी असते. क्वचित त्याचे वजन १०० पौंडांपेक्षा जास्त असते, परंतु तो इतका चपळ असतो की ३०० पौंडांच्या प्राण्याची शिकार सहज करू शकतो. शेपटीसकट त्याची लांबी ६ फूट असते आणि शेपटी शेवटपर्यंत गोंडस व जाडजूड असते. ही शेपटी बॅलन्सिंगअॅक्टसाठी असते; हा चित्ता ' Lone Wolf ' असतो. अगदी एकाकी. त्याच्या कळपाविषयी कोणतीच माहिती उपलब्ध नाही. वाघासारखे एखादे सावज फाडण्यासाठी ते एकत्र येतात व परत एकटा जीव सदाशिव.

या पुस्तकात चिंतने भरपूर आहेत. लेखकाचे झेन विषयीचे विचार आहेत. ते म्हणतात की झेन तत्त्वज्ञान गूढ वगैरे काही मानीत नाही. अस्तित्ववादासारखा आत्ताचा क्षण ( The here and now ) हाच महत्त्वाचा असतो. प्रसिद्ध भटक्या तत्ववेत्ता बुर्डजिएफ याचेसुद्धा काहीसे असेच सिद्धान्त आहेत. पण मला वाटते, जीवन हे इतके गुंतागुंतीचे व व्यामिश्र आहे की एकाच स्कूल ऑफ फिलॉसॉफीने, झेन सारख्या एकाच तत्त्वज्ञानाने एकाच Sweeping विधानाने किंवा वाक्याने, एकाच इझमने, एकाच धर्माने ते निकालात काढता येणार नाही. पूर्वी मी टाइम्स ऑफ इंडियामध्ये ' थॉट फॉर टुडे ' या छोट्या सदरात जीवनाविषयी अशीच छोटीछोटी वाक्ये व विधाने वाचीत असे तेव्हा ते विधान करणारा किती बुद्धिमान असेल असे वाटत असे. फार तर असे विधान किंवा तत्त्वज्ञान जीवनाचा किंवा मानवी मनाचा एखादा छोटा मोठा पैलू दाखवू शकतो. एखाद्या लांबलचक भाषणांतून एखादेच विधान ' torn out of context ' किंवा distorted होते तसाच आविष्कार एखाद्या ism ने किंवा तत्त्वज्ञानाने होतो.

शेवटी मेथियसेन हिमचित्ता बघत नाही. त्याचे त्याला फारसे वाटतही नाही. त्याच्या मनात एक शंका येते. खरंच का तो हिमचित्ता बघायला एवढ्या लांब आला ? का हिमालयाचा परिसरच असा आहे की तो माणसाला अनंत चिंतने करायला लावतो ? आणि या चिंतनामुळे यशाचा कालिमा आपल्याला लागला नाही याचे त्याला हायसे वाटले.

–जे. एन्. पोंडा


## नवीन दाखल झालेली पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १) | **मुक्काम पोस्ट : देवाचे गोठणे**–(आत्मचरित्रात्मक लेखन) माधव कोंडविलकर | रु. २२।- |
| २) | **फिरस्ता** (लेख) – वसंत पोतदार | रु. १५।- |
| ३) | **विद्रोह** (कादंबरी) – व्यंकटेश महाजन | रु. १८।- |
| ४) | **बळी** (गुन्हेगारीवर कादंबरी) – श्रीकांत सिनकर | रु. २१।- |
| ५) | **आम्ही पाहिलेला चीन** (चीनचे प्रवासवर्णन) – कुसुम नारगोलकर | रु. २०।- |
| ६) | **बिलोरी** (कथासंग्रह) – शं. ना. नवरे | रु. १५।- |

ENGLISH

1) **Among The Elephants – (Author's Study of elephants in the Lake Manyara National Park, Tanzania)** Jain & Oria Douglas – Hamilton — Rs. 27.60

* It is time the Government realised that for a flourishing damocracy, people must be literate and fed constantly with information '
(Indian Express 2–9–1979)
We do our little bit to disseminate information with our Clipping Service ! !

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पेठ, पुणे ३०**

# रंगभूमी

मुकुंद संगोराम

# पुरुषोत्तम करंडक

## आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा

## दर्जाची अपेक्षा करावी काय ?

पुरुषोत्तम करंडक आंतर महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धाचे पंधरावे वर्ष नुकतेच पार पडले. महाराष्ट्रीय कलोपासकांनी सतत पंधरा वर्षे हा उपक्रम चालू ठेवून महाविद्यालयीन क्षेत्रात एक आगळे आणि वेगळे स्थान निर्माण केले आहे. या 'स्थाना' मुळेच या नाटचस्पर्धांबद्दल चिंता किंवा काळजी वाटते. यंदाच्या सर्व एकांकिका पाहून या स्पर्धेबद्दल एकूणातच पुनर्विचार व्हायला हवा असे वाटू लागले.

स्पर्धेचा दर्जा यावर्षी उंचावलेला नाही. उलट एवढ्या एकांकिका पाहायचं धाडस करणारांचे कलाकार ऋणीच राहतील. पण सादर करताना त्या कलाकृतीला काही दर्जा आहे किंवा नाही याची कुणीही पूर्वतपासणी करीत नाही आणि मग भरमसाट एकांकिका सादर केल्या जातात. त्यातल्या एकांकिका वेचून काढायच्या म्हटलं तरी त्रासच ! स्पर्धेच्या परीक्षणाची जबाबदारी श्री. कृ. द. दीक्षित, श्री. वसंत माने व सौ. लीलावती भागवत यांनी सांभाळली.

तर यंदाच्या वर्षी एकूण २५ एकांकिका सादर करण्यात आल्या. या सर्व एकांकिकांमध्ये करंडकाची एकांकिका अशी एकही एकांकिका आढळून आली नाही, पण त्याला कोणाचा काय इलाज ? या एकांकिकांबद्दल थोडक्यात.

पहिल्या दिवशी सलामी लॉ कॉलेजच्या 'द कॉन्स्टिटयूशन' या एकांकिकेने दिली. विद्यार्थी लेखक आणि दिग्दर्शक होते प्रकाश पटवर्धन. सद्यस्थितीवर आधारित असलेली ही एकांकिका टीम वर्कच्या अभावामुळे प्रेक्षकांपर्यंत पोहोचू शकली नाही. लिखाणातील आणि दिग्दर्शकातील सैलता प्रयोगभर पसरलेली होती. एकांकिकेच्या विषयाबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन करायला हवे. भली मोठी टीम असूनही लक्षात रहाण्यासारखी भूमिका कॉन्स्टिटयूशनमध्ये कुणीही करू शकले नाही,

बी. जे. मेडिकलने, यंदा मोहन राकेश यांच्या 'छतरियाँ' या मूळ हिंदी एकांकिकेचे मराठी रूपांतर 'मॅड डिलाइट' सादर केले. विद्यार्थी दिग्दर्शक होते रवींद्र साठे. रूपांतर प्रसाद कुलकर्णीचे होते. प्रस्थापित समाज व्यवस्थेविरुद्ध लढणाऱ्या व्यक्तीची ही कथा. सामान्य माणसाच्या मूलभूत हक्कांची जागोजाग होणारी पायमल्ली या एकांकिकेत दिसते. कावळ्याच्या छत्र्यांचे प्रतीकात्मक अर्थ सादरीकरण शैलीद्वारे दिग्दर्शकाने मांडण्याचा प्रयत्न केला. प्रयोग अत्यंत नेटकेपणाने सादर करण्यात कलाकारांना यश आले. एकांकिकेतील ध्वनिमुद्रण परिणामकारकरीत्या रंगमंचावरील संरचनांशी एकात्म झालेले होते. मात्र सुहृद सरदेसाईचे शब्द प्रेक्षकांपर्यंत नीटपणे पोहोचू शकले नाहीत. यातील प्रसाद कुलकर्णीचा अभिनय एकांकिकेचा तोल सांभाळू शकला आणि इतर समूहाने त्याला योग्य साथ दिली. तरीही प्रसाद कुलकर्णीला प्रशस्तिपत्रक देऊन त्याचा 'गौरव' परीक्षकांनी का केला कळले नाही. पहिल्या दिवशीची ही एकमेव चांगली एकांकिका.

त्यानंतर पुणे विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या विभागाने 'एका पत्रकाराचा मृत्यू' ही एकांकिचा सादर केली. एकांकिकेतील शब्दांना कलाकार योग्य ती साथ देऊ शकले नाहीत. बाकी एकांकिका 'ठीक' दर्जाची झाली. केशव साठये यांचा अभिनय उल्लेखनीय. या एकांकिकेचे विद्यार्थी–लेखक शशी पटवर्धन यांना लेखनाचे बक्षीस मिळाले.

दुसऱ्या दिवशी बृहन महाराष्ट्र वाणिज्य महाविद्यालयाने दिलीप पुरुषोत्तम चित्रे यांची 'सुतक' ही एकांकिका सादर केली. 'सुतक'ची थीम अशी नसली तरीही 'शोक' या कल्पनेच्या वेगवेगळ्या डायमेन्शन्स या एकांकिकेत लेखकाने दाखविल्या आहेत. शोक आणि शोक प्रदर्शनाच्या विविध छटा दिपू चित्रेंनी जेवढ्या ताकदीने मांडल्या आहेत, त्याला 'विधवे'ची भूमिका करणाऱ्या वंदना परांजपेने न्याय दिला. संपूर्ण एकांकिकेत वंदना परांजपे यांचा अभिनय लक्षात राहण्यासारखा होता. बोलका चेहरा आणि भूमिकेतील बारकावे यामुळे तिला सर्वोत्कृष्ट अभिनयाचे नटवर्य केशवराव दाते पारितोषिक मिळाले. एकांकिका दिग्दर्शित केली होती, सुहास कुलकर्णी या विद्यार्थ्याने. त्याचा प्रयत्न स्तुत्य होता.

मात्र एकांकिका एकसंध परिणामात कुठे तरी उणी पडली. तरीही या एकांकिकेला परीक्षकांनी सातवा क्रमांक दिला.

'होळी' ही एलकुंचवारांची एकांकिका यंदा फर्ग्युसन महाविद्यालयाने निराशजनक पद्धतीने सादर केली. रंगमंचावरील हालचाल, संवाद, नेपथ्य, प्रकाशयोजना, संगीत यामध्ये असणारे अंतर्गत नाते संपूर्ण एकांकिकेत कुठेच दिसले नाही. त्यामुळे 'होळी'ने प्रेक्षकांची निराशा केली. फक्त राजीव मिरासदार, बहर जोशी यांच्या भूमिका (त्यातल्या त्यात) उल्लेखनीय. बाकी साराच आनंद.

आबासाहेब गरवारे महाविद्यालयाने यंदाच्या वर्षी 'यू मस्ट डाय' ही एकांकिका (फक्त) सादर केली एवढेच! प्रेक्षकांनीही या एकांकिकेला योग्य ती 'दाद' दिली. रंगमंचाची, भूमिकेची आणि अभिनयाची जाण यांच्या अभावामुळे हे घडले.

'प्रत्यंतर' ही या तिसऱ्या दिवशीची प्रत्ययकारी एकांकिका, अभियांत्रिकी महाविद्यालयाने सादर केली. प्रदीप फाटक या (विद्यार्थी) लेखकाने लिहिलेली ही एकांकिका सतीश देशमुख या विद्यार्थ्याने सादर केली. एका पत्रकाराचा हा अनुभव, प्रत्यंतर. बलात्कार प्रकरणी फाशीची शिक्षा झालेल्या गुंडावर सनसनाटी पुस्तक लिहिण्याच्या इराद्याने, माहिती मिळविण्यासाठी तुरुंगात जाऊन तेथेच अडकून पडलेल्या पत्रकाराची ही कथा. अनपेक्षितपणे तुरुंगाधिकाऱ्याने रजेवर जाऊन त्या जागी नवीन आलेल्या अधिकाऱ्याने त्या गुंडानंतर पत्रकारास फासावर चढवून फाशीचा जिवंत अनुभव या एकांकिकेत मांडला आहे. पत्रकाराची भूमिका सतीश देशमुखने खरोखरीच उत्तम केली. अभिनयातील लवचिकता, संवादाची समर्थ फेक आणि हालचालीतील सफाई याचा सुमेळ सतीश देशमुखच्या भूमिकेत दिसून आला. पहिल्यापासून शेवटपर्यंत उत्कंठा वाढवत नेऊन पत्रकाराची फासावरून सुटका करवून प्रेक्षकांना दिलासा देणारी ही एकांकिका. शब्दबंबाळ असली तरीही त्यातील सादरीकरणामुळे एकांकिका अत्यंत 'स्मूथ' झाली. नेपथ्य, प्रकाश व ध्वनी हेही या एकांकिकेचे विशेष. एवढे असूनही परीक्षकांनी सतीश देशमुखला काकाजी जोगळेकर पारितोषिक आणि एकांकिकेला सहावा क्रमांक दिला. यामागे परीक्षकांचा नेमका दृष्टिकोन कोणता? असो.

मध्यमवर्गीय मनुष्याच्या जीवनातील ओढाताण आणि त्यातील नाट्य वृंदावन दंडवतेंच्या 'खोटं नाटक'मध्ये. ही एकांकिका गरवारे वाणिज्य महाविद्यालयाने सादर केली. रोजच्या जगण्यात करावी लागणारी 'खोटी नाटकं' दंडवतेंनी मांडलीयेत. विद्यार्थी दिग्दर्शक शेखर घारपुरे याचे दिग्दर्शन एकांकिकेत आपले अस्तित्व दाखवून देत होते. 'माईम' पद्धतीची समूह दृश्ये एकांकिकेत वापरण्यात आली होती. या समूह-दृश्यांबरोबरच शेखर घारपुरे, शुभदा देसाई यांचा अभिनय ही जमेची बाजू; पण तांत्रिकतेच्या आहारी गेल्यामुळे की काय, एकांकिका फार उठावदार होऊ शकली नाही.

## परस्पर पावणेबारा

स. प. महाविद्यालयाने प्रा. विजय कारेकर लिखित आणि दिग्दर्शित 'सर्प' ही एकांकिका सादर केली. 'यथातथा' एवढाच शेरा या संदर्भात देता येईल. बाकी, एकांकिका प्रेक्षकांची 'दाद (!)' घेऊन गेली.

'परस्पर पावणेबारा' हा दि. ३० रोजीचा एक अनुभवच होता. शाहू मंदिर महाविद्यालयाने पद्माकर गोवईकरांची ही नर्म विनोदी एकांकिका समर्थपणे सादर केली. विद्यार्थी दिग्दर्शक होते, कुंदन डांगी. एकांकिकेतील सर्वांचा अभिनय, रंगमंचावरील हालचाली, प्रतिसाद आणि त्याचबरोबर लक्षात राहणारे नेपथ्य यामुळे ही एकांकिका सफाईदार झाली. वनमाला माळवदे यांचा संयत अभिनय एकांकिकेच्या परिणामकारकतेला पूरकच ठरला. 'टीम वर्क' हे या नाटकाचे विशेष. ध्वनिसंयोजन, प्रकाशयोजना, नेपथ्य या तांत्रिक बाबीत ही एकांकिका संपूर्णपणे यशस्वी झाली. म्हणून तिला सांघिक दुसरे पारितोषिक प्राप्त झाले; पण एकांकिकेवर 'सराईत' हात फिरला असल्याची जाणीव सतत होत होती. या संदर्भात पुढे आणखी लिहीनच; पण प्रयोग सुविहित झाला यात शंका नाही.

'दर्वबिंदू' ही एकांकिका सिम्बायसिसच्या लॉ कॉलेजने सादर केली. लेखक—मंगेश कुलकर्णी. विद्यार्थी—दिग्दर्शक—रवींद्र रामतीर्थकर.

टिळक आयुर्वेद महाविद्यालयाने 'गणूचा सदरा' ही डॉ. श्रीराम लागू यांची एकांकिका सादर केली. विद्यार्थी दिग्दर्शक होते रवींद्र बेके. अभिनय, शब्दोच्चारण, नेपथ्य याबाबतीत एकांकिका उणी पडल्याने ती योग्य तो परिणाम साधू शकली नाही. आशयातील नेमकेपणा एकांकिकेत कुठेही दिसला नाही. त्यामुळं हा प्रयोग फसला! पण रवींद्र बेकेंना मात्र अभिनयाचे प्रशस्तिपत्रक मिळाले. बाकी काही न लिहिणेच बरे!

अभिनव कला महाविद्यालयाने सतीश आळेकरांची 'भजन' ही एकांकिका सादर केली. भजन ही आळेकरांची एक सुरेख एकांकिका, त्यातील भडकमकर हे पात्र केंद्रबिंदू आहे. भडकमकर ही व्यक्तिरेखा प्रातिनिधिक आहे; पण या कलाकारांना एकांकिका कळलीच नाही असे म्हणावे लागेल. भजनमधील संवाद ज्या पद्धतीने बोलले गेले पाहिजेत, त्या पद्धतीने ते बोलले गेले नाहीत. पात्रांना रंगमंचावर काय करायचे? असा प्रश्न पडतो, साहजिकच टीम वर्कच्या अभावामुळे एकांकिकेच्या पदरी अपयश आले!

खुर्च्या हीही अपयशी एकांकिका! सादरकर्ते—पूना महाविद्यालय.

'पांढऱ्या पायाचा' ही एकांकिका म्हणजे विद्यार्थिलेखक (कम्) दिग्दर्शक दत्तात्रय भरेकर यांचा एक केविलवाणा प्रयत्न. संवाद, रचना आणि अभिनय, हालचाली यांचा एकमेकांशी काही संबंध असतो, शब्दांना दर्शनात्मक दर्जा असतो याचे भान भरेकरांना नव्हते. अर्थात एकांकिका फक्त शेवटपर्यंत झाली एवढेच.

'रक्तबीज' हे शंकर शेष यांचे गाजलेले नाटक. त्यातील पहिला अंक आबासाहेब गरवारे महाविद्यालयाने सादर केला. विद्यार्थी, दिग्दर्शक व हिरो होते शेखर लोणकर. त्यांना दोन्ही कार्ये यशस्वीपणे सांभाळता आली नाहीत. एका शास्त्रज्ञाच्या संशोधनाचा फायदा त्याचा बॉस घेतो आणि 'आयत्या बिळावर नागोबा'प्रमाणे तो जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ म्हणून मान्यता पावतो. याचे पडसाद शंतनु या शास्त्रज्ञावर पडणे साहजिक आहे. एकांकिका म्हणून यातील नाट्यमूल्य ओळखण्यात लोणकर अयशस्वी ठरले असेच वाटते. चुकीचे नेपथ्य, रंगभूषा, वेषभूषा आणि 'इतर' यामुळे एकांकिका 'ठीक' या

दर्जाची झाली.

'मेषगान' हा एक लक्षणीय प्रयत्न होता. अभियांत्रिकी महाविद्यालयाने प्रा. चारु भागवत यांनी लिहिलेले हे संगीतक ( ? ) सादर केले. विद्यार्थी दिग्दर्शक होते, दिपू फाटक. मेषगान ही राजा ऑर्फियसची ग्रीक कथा. त्यातील काव्यात्मकतेचा शोध घेत प्रा. भागवतांनी हे संगीतक लिहिले. संगीत दिले होते निरंजन कणगलेकर व श्रीरंग करकरे यांनी. नियती आणि मानव यांच्या लढ्यातील नियतीचा जय हे या संगीतकातील अनुस्यूत सूत्र.

या एकांकिकेचा प्रयोग सुविहित झाला यात शंका नाही, दिपू फाटकांचे नेपथ्य आणि दिग्दर्शन यातील लक्षणीयताही वाखाणण्यासारखी आहे यातही शंका नाही, फक्त मनात पुढील शंका उभ्या राहिल्या.(१) एकांकिकेतील काव्य जरा शब्दबंबाळ होते. त्यामुळे त्याला असलेली संगीताची साथ त्या शब्दांचा आणि सुरांचा मेळ घालू शकत नव्हती. ( २ ) मद्यदेवापुढील नृत्य हे ग्राम्य नृत्य. तिथे नाचणारे सारे पुरुष मग, पार्श्वगायनात स्त्रियांचा आवाज कशासाठी? त्यामुळे बेसूरता वाढली आणि संगितिकताही कमी झाली. (३) दिग्दर्शनात, रंगमंचाचा वापर हा एकाच प्रकारच्या फॉरमेशनने, संरचनांनी केलेला दिसला. रंगमंचाची रंगमंचीयता यामुळे काही प्रमाणात लोप पावली. ( ४ ) पार्श्वसंगीतातील संगीत या कथेला अनुरूप नव्हते. त्याचा आणि या कथा वस्तूंचे नाते सांगणारे स्वर तिथे नव्हते.

पण तरीही हा प्रयोग लक्षणीय होता यात शंका नाही. या एकांकिकेला तिसरा क्रमांक मिळाला. दिपू फाटकला दिग्दर्शनाचे पारितोषिकही मिळाले.

वी. जे. ने स्ल्यूथ (खेळिया) या नाटकाची थीम असलेली 'अतिथी देवो भव' (ले. रीमा लागू) ही एकांकिका सादर केली. विद्यार्थी दिग्दर्शन रवींद्र सरदेसाई यांचे होते. परिणामाकडे जाणारी ही एकांकिका कुठे तरी कमी पडली व योग्य तो परिणाम साधू शकली नाही. आवाज, संवादाची फेक, तांत्रिक गोष्टींचा वापर यांमुळे ही एकांकिका म्हणावी तेवढी यशस्वी होऊ शकली नाही. दीपक पुरोहितांचा अभिनय मात्र उल्लेखनीय.

**प्रश्न**

पुरुषोत्तम करंडक विजेती एकांकिका 'प्रश्न' टिळक आयुर्वेदने सादर केली. मूळ लेखक– महेशभाई पटेल, स्वैर रूपांतर व विद्यार्थी दिग्दर्शक विनय हुईलगोळकर. सामान्यांचे प्रतिनिधित्व करणारा 'अ' आणि सत्तेचं प्रतिनिधित्व करणारा 'ब.' सत्ता आणि जनसामान्य यामध्ये केवढी मोठी खोल दरी, मध्ये पूलही नाही. मग काय करायचं? आत्महत्या! चालेल; पण स्वर्गलोकातही सत्तेचं राजकारण आलेच. मग भूलोक काय वाईट! पण इथलं राजकारण गढूळलेलं, खुर्चीला चिकटलेलं याचं विदारक दर्शन एकांकिकेत झालं.

संपूर्ण 'माईम' पद्धतीने एकांकिका बसविली होती. दोघांचाही अभिनय, प्रतिसाद, हालचाली चांगल्या होत्या. विशेष म्हणजे प्रकाशयोजना. एकांकिका रूपांतर करीत असताना मूळ विषयाला बगल देऊन स्वैरपणे विहार करू लागल्यावर प्रकाशयोजनेने प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. सर्व एकांकिकांमध्ये तांत्रिकदृष्ट्या संपूर्णपणे यशस्वी ठरलेली ही एकमेव एकांकिका पण आशयाच्या दृष्टीने तिच्यात काहीच दम नव्हता. फक्त सादरीकरण पद्धतीवर तिला करंडक मिळाला एवढेच!

आदर्श बहुव्यापी शिक्षण व संशोधन महाविद्यालयाने रत्नाकर मतकरींची 'मधुवंती' एकांकिका सादर करण्याचा एक धीट प्रयत्न केला.

'प्रेम पुराण' ही मतकरींची एकांकिका स. प. महाविद्यालयाने सादर केली. 'मध्यमवर्गीयांचं प्रेम' हा विषय. यात अभिनय, रंगमंचावरील हालचाल, रचना, यामध्ये कुठेही ताळमेळ नव्हता. सर्वजण मागील बाजूच्या ओटयावर संपूर्ण वेळ बसून राहतात. तिथून पुढील पात्रांकडे पाहतात, त्यांचे संवाद पुटपुटतात. कलाकारांची (अ) चूक निवड यामुळे ही एकांकिका 'ठीक' झाली पण परीक्षकांना काय वाटले कुणास ठाऊक. त्यांना ती प्रत्यंतरपेक्षाही प्रत्ययकारी वाटली. तिला पाचवा क्रमांक मिळाला.

'सल' ही वामन तावडे लिखित एकांकिका पुणे विद्यापीठ जिमखान्याने नेटकेपणाने सादर केली. 'छिन्न' या तीन अंकी नाटकाची ही मूळ एकांकिका. अंजली काळूरकर यांचं दिग्दर्शन ठीक होतं. विवेक सबनीसांच्या अभिनयाला प्रशस्तिपत्र मिळालं. 'ती' ची भूमिका करताना अंजली काळूरकरांचं चालणं स्टायलाईज् का केलं कळलं नाही. त्यातून कोणताही आशय सांगितला गेला नाही. पण त्यांचा अभिनय एकांकिकेचा तोल सांभाळीत होता. त्यांना काकाजी जोगळेकर पारितोषिक मिळालं.

मॉडर्न महाविद्यालयानं 'काच सामान जपून वापरा' ही सामाजिक एकांकिका सादर करण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. त्यात उल्लेखनीय–अतुल देशपांडे व मिलिंद देशपांडे.

बी. एम. सी. सी. ची दुसरी एकांकिका स्टॅच्यू (ले. सुहास तांबे) सुतक एवढीच हीही एकांकिका परिणामकारक ठरली. याचे दिग्दर्शन होतं शिरीष मोरे यांचे! उल्लेखनीय अभिनय शिरीष लिमयेंचा. राजेंद्र शारंगपाणी रंगमंचावर सतत अवघडल्यासारखा का वावरत होता कळले नाही. पण हीही एकांकिका चांगली झाली.

असा हा सर्व एकांकिकांवरील थोडक्यात अभिप्राय. यंदाच्या स्पर्धेत सामान्यतः काही वेगळ्या गोष्टी दिसून आल्या. एक म्हणजे एकांकिकेची निवड. या निवडीमुळे विद्यार्थी वर्गातील अभिरुचीचे दर्शन घडते. दुसरे म्हणजे अवाजवी पार्श्वसंगीत. याचा विचार विद्यार्थी-कलाकारांनी करायला हवा. एखाद्या ऑर्केस्ट्राप्रमाणे पार्श्वसंगीत सतत अनाठायी वाटले.

आता स्पर्धेसंबंधी थोडेसे. पुरुषोत्तम करंडक स्पर्धेचे हे पंधरावे वर्ष. आता स्पर्धा स्थिर झाली आहे. तेव्हा आता काही गोष्टींचा पुनर्विचार करणे भाग आहे. विद्यार्थ्यांना रंगभूमीविषयी आत्मीयता निर्माण व्हावी, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, व्यासपीठ मिळावे हे शैक्षणिक हेतू या स्पर्धेमागे असले पाहिजेत. तर मग पंचवीसपैकी वीस एकांकिका जर 'ड' दर्जाच्या होत असतील तर मग विद्यार्थ्यांना नाट्यशिक्षणाची सोय करायला नको? नाट्य शिबिरांपेक्षा अशा स्पर्धातून मिळणारे शिक्षण जास्त उपयोगी ठरते; पण कलोपासकीय बाहेरच्या दिग्दर्शकांना परवानगी देत नाहीत. (आणि तरीही काही त्यांच्यातलेच दिग्दर्शन करतातच! त्यांना बक्षीस मिळणे स्वाभाविक आहे!) यावर उपाय असा सुचतो. विद्यार्थी

दिग्दर्शन करणारे फार थोडे. तेव्हा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने बाहेरच्या कलाकारांना या एकांकिका बसविण्यास द्याव्यात. निदान विद्यार्थ्यांना शिक्षण तरी चांगले मिळेल !

यंदाच्या निकालावरून नजर टाकली म्हणजे एक दिसून येते. आणि ही गोष्ट उघडपणे बोललीही जाते की सर्व बक्षिसे कलोपासकीयांनाच मिळाली ! यातील खरे खोटे तेच जाणोत ! पण सफाईदार एकांकिका आणि इतर 'ड' दर्जाच्या एकांकिका यामध्ये दरी निर्माण होते. ही दरी भरून काढण्यासाठी कलोपासकीय काहीच करणार नाहीत का ? की केवळ स्पर्धा भरविणं हे आमचे काम, अशी त्यांची वृत्ती झाली.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांचा विकास करण्यासाठी अशा स्पर्धांबरोबरच शिबिरे भरविण्याची जबाबदारीही कुण्या संस्थेने उचलायला हवी. बाकीच्या संस्थांना ही एक अॅक्टिव्हिटी करता येईल; पण इकडे कुणी लक्ष देत नाहीं. आपण बरे की आपले बरे ही त्यांची भूमिका. विद्यार्थि-कलाकारांनी याची दाद सामुदायिकरीत्या मागितली पाहिजे. तरच या स्पर्धेमागील खरा हेतु साध्य होऊ शकेल.

पुढील वर्षापासून या स्पर्धा अधिक काटेकोरपणे व बंदोबस्तात होणार, असे ऐकतो. याबाबत मला असे वाटते की स्पर्धेचं आहे हे स्वरूप बदलू नये, दोन फेऱ्या केल्या तर ठीक होईल; पण त्याच महाविद्यालयातील विद्यार्थी त्यांचीच एकांकिका बघू शकतील असा काटेकोरपणा असू नये. पुरुषोत्तम ही महाविद्यालयीन व युवक क्षेत्रातील लोकांना एक पर्वणी आहे, तिचे स्वरूप असे बदलले तर मग स्पर्धेचे महत्त्वच कमी होईल असे वाटते.

स्पर्धा चालू असताना श्री. प्रभाकर वाडेकर यांनी 'मंथन' हे प्रतिक्रियात्मक पत्रक वाटले. निर्मिती संकल्पन त्यांचे होते. त्यामध्ये दोन हितचिंतकांनी स्पर्धेच्या दर्जाबद्दल कळकळीने लिहिले आहे.

पुण्यातील हौशी रंगभूमीवरील प्रस्थापितांना त्यांनी दोष दिला आहे. 'या प्रस्थापितांनी या, स्पर्धेच्या निर्मितीक्षेत्रात विनाकारण शिरकाव करून घेतला आहे. खरे म्हणजे विनाकारण म्हणण्यापेक्षाही तो अप्रस्तुत आहे असे म्हणजे श्रेयस्कर ठरेल.'

यां विधानाशी माझी असहमतता यापूर्वीच व्यक्त झाली आहे. प्रस्थापितही याच रंगभूमीवरून पुढे आलेले असतात. या स्पर्धकांचा अनुभव तोकडा. बरे, घाऊकरीत्या नाटके बसविणाऱ्यांना कुणीतरी धडा शिकवायलाच पाहिजे. प्रस्थापित शिरकाव वगैरे काहीही करून घेत नाहीत, त्यांचीही तळमळच यामागे असते, नाही तरी त्यांना काय मोठं नाव किंवा पैसे मिळणार असतात. यातील शैक्षणिक मुद्द्याला वैचारिक 'मंथनात' बगल दिलेली आहे. या स्पर्धांना एक शैक्षणिक पार्श्वभूमी आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, इ. पण त्याकडे दुर्लक्ष करून, चुकलात तरी चालेल; ती तुमची स्वतःची कलाकृती आहे असे लांबून कुणी तरी (आणि वाडेकरांसारख्यांनीही) म्हणणे योग्य नाही. या चुकीतून तो स्पर्धक पूर्णपणे निराश होतो, आणि मग नाट्यकलेची आवड वगैरे सर्व गोष्टी कुठल्या कुठे पळून जातात.

प्रकाश योजनेचा, ध्वनि संयोजनाचा, नेपथ्याचा एकांकिकेत वापर कशासाठी ? का ? आणि कसा केला जातो याची जाण बहुतांशी स्पर्धक संघांना नसली पाहिजे. अभिनय कशाशी खातात, याची जाणीव नाट्य–शिबिरातून दिली जात असली, तरी त्याचा उपयोग प्रत्यक्ष एकांकिका बसविताना कसा केला जातो याचे ज्ञान त्याला तिथे मिळत नाही. त्यासाठी हौशी कलाकारांनी आपल्या अनुभवाचा उपयोग करून दिल्यास काय हरकत आहे ! फक्त या प्रकारातील कलात्मक दृष्टी, व्यावसायिकतेकडे वळू नये एवढीच अपेक्षा.

बक्षीस समारंभ दि. ८ रोजी नाट्य संमेलनाध्यक्ष प्रा. भालबा केळकर यांच्या हस्ते झाला. या प्रसंगी परीक्षकांच्या वतीने श्री. वसंत माने बोलले. राजाभाऊ नातूंनी पुढील वर्षीपासून स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये होतील हा आपला निर्णय जाहीर केला, त्याला भालबांनी दुजोरा दिला.

बाकी स्पर्धा नेहमीप्रमाणेच ठीक पार पडल्या ... !

# छिन्न : खुलासा

## हा कलेच्या पूर्णत्वासाठी केलेला अट्टाहास आहे

दि. ८ सप्टेंबरच्या 'माणूस'च्या अंकात 'छिन्न' या माझ्या नाटकपरीक्षणावरील श्री. सतीश कामत यांची प्रतिक्रिया वाचली.

'छिन्न' या नाटकाला लैंगिक विषयावरचे चलनी नाणे असे मी म्हटले होते. नाटक असे सवंग का वाटले, याची कारणेही मी दिली होती. श्री. कामत त्यांच्याशी सहमत नाहीत; पण म्हणून मी ती दिलेली नव्हती असे नाही. ('अजून यौवनात मी' या नाटकावरच्या माझ्या परीक्षणाचाही श्री. कामत यांनी जाता जाता कंसात उल्लेख केला आहे. त्याहीवेळी नाटक 'वाईट' कोणत्या बाजूने वाटले, त्याची कारणे मी दिली होती. ते नाटक एका पानात उडविताना नवीन विषय शोधल्याचे श्रेय मी लेखकाला आवर्जून दिले होते.)

'छिन्न' या नाटकाचा विषय केवळ लैंगिक आहे म्हणून मी ते वाईट म्हटलेले नाही हे माझ्या पहिल्या परिच्छेदात स्पष्ट आहे. श्री. कामत यांना जे अनुभव सुन्न करणारे वाटले तेच मला भडक, उथळ म्हणून चलनी नाण्यासारखे वाटले. कोणत्याही कलाकृतीतील अनुभव सखोल, सूक्ष्म आहेत किंवा नाहीत असे वाटणे, त्याची सौम्य-तीव्र स्पंदने मनात उमटणे हे कमालीचे वैयक्तिक असते. या बाबतीत विस्तारित लेखन किंवा प्रत्यक्ष संभाषण यातून भिन्न मते असणाऱ्या व्यक्तींशी संवाद साधता येतो. स्थलकालाअभावी येथे ते शक्य नाही. म्हणून श्री. कामत यांनी उपस्थित केलेल्या मुख्य मुद्द्यांचे स्पष्टीकरण करते.

श्री. कामत म्हणतात, 'नाटकातील पात्रांच्या जीवनाचे आणि व्यक्तिमत्त्वाचे सर्व धागेदोरे या अडीच-तीन तासांतच आपल्याला संपूर्णपणे कळले पाहिजेत हा पारंपरिक अट्टाहास कशासाठी ?' हा कलेच्या पूर्णत्वासाठी केलेला अट्टाहास आहे.

तो पारंपरिक असो किंवा नसो, मला त्याच्याशी कर्तव्य नाही. नाटकाची वेळ मर्यादित आहे म्हणून व्यक्तिमत्त्वाचे धागेदोरे कळत नाहीत, हे बोलणे फोल आहे. हत्तीचे चित्र काढायचे आहे; पण कागद जेमतेम तळहाताएवढा दिला. एवढ्या मोठ्या प्राण्याचे केवळ इतक्या लहान कागदामुळेच पूर्ण चित्र काढणे शक्यच नाही असे कोणी म्हटले तर कामत ते मान्य करतील का? एखाद्या चित्रकाराने पूर्ण हत्ती काढलाच पाहिजे असे नाही. केवळ पाय काढून किंवा फक्त तोंड रेखाटून (लहान किंवा मोठ्या, कोणत्याही कागदावर) समर्थपणे तो हत्ती आहे. (किंवा चित्रकाराच्या मनात असलेला कोणताही प्राणी) अशी प्रतीती दिली की, ते कलादृष्ट्या पूर्ण चित्र झाले असे मी म्हणते कोणी तरी चार उभ्या रेघा काढायच्या, वर आयताकृती चौकोन काढायचा, त्याच्या दोन बाजूंना सोंड आणि शेपटी म्हणून तिरक्या रेघा मारायच्या आणि समर्थकांनी दावा करायचा हे हत्तीचे उत्कृष्ट चित्र आहे, त्याचे सगळे तपशील दिलेच पाहिजेत हा पारंपरिक अट्टाहास का? श्री. कामत यांचे मत मला अशा प्रकारचे वाटते. कारण मला ते 'छिन्न'मधील अनुभवविश्वच उथळ वाटते. रेघोट्यांचे हत्तीचे चित्र ज्या अर्थाने ढोबळ असते त्याच अर्थाने 'छिन्न' हे ढोबळ आहे. या ढोबळपणामुळे लैंगिक विषयही कृत्रिम सनसनाटी वाटतो.

श्री. कामत पुढे म्हणतात, तुम्ही नाटक म्हणून काही concessions देणार आहात की नाही? (आईचे लफडे शालीला आधीच कळलं असतं तर तिने श्रीकांतशी लग्न केलं नसतं आणि मग पुढे उभं राहिलेलं थरारून मोडणारं नाट्य घडलंच नसतं.) नाही. कलेच्या प्रांगणात concessions हा प्रकार मी समजूच शकत नाही. ज्याला कामत concessions म्हणतात त्याला मी न्यून म्हणते.

रोमिओ ज्यूलिएटच्या उदाहरणात श्री. कामत म्हणतात, पहारा चुकवून रोमिओ ज्यूलिएटच्या खिडकीखाली आला या प्रसंगातले माधुर्य चाखावे. त्याने पहारा कसा तोडला हे महत्त्वाचे नाही. या मताशी मी सहमत आहेच. पहारा कसा चुकविला याचा तपशील नको. पण तो 'पहारा चुकवून' आला आहे एवढे तर कळले पाहिजे ना? हे जर कळले तरच त्यांच्या भेटीचे रोमहर्षक माधुर्य समजू शकते. ते जर कळले नाही आणि रोमिओ ज्युलिएटच्या खिडकीशी एवढेच दृश्य दिसले तर ते बिनबुडाचे वाटेल. 'छिन्न' मधले प्रसंग अशा प्रकारे बिनबुडाचे वाटतात. आणखी पुढे जाऊन मी म्हणते, रोमिओने कोणत्या प्रकारचा पहारा कसा तोडला याची तपशीलवार हकीगत नको पण धावते सूचन हवेच. त्याशिवाय त्याचे व्यक्तिमत्त्व उभे राहू शकणार नाही. शेजाऱ्यांच्या नजरांचे पहारे चुकवीत 'बेबी'च्या खिडकीखाली येणारा चाळीतला बंडू आणि तटबंदीतल्या शस्त्रधारी पहारे तोडून येणारा रोमिओ यांच्या व्यक्तिमत्त्वातला फरक कळण्यासाठी हे सूचन हवे.

श्री. कामत एके ठिकाणी म्हणतात, 'छिन्न'मधील अनुभव आपल्याही समाजात अनेक ठिकाणी येणारा अनुभव आहे.' एखादी गोष्ट जगात अस्तित्वात आहे म्हणूनच केवळ तिचे कलाकृतीतील अस्तित्व समर्थनीय ठरू शकत नाही. भोवतालच्या जगात हे असे घडते म्हणून अगदी तसेच ते नाटकात दाखविले तर तो वास्तवाचा कोरडा तपशील ठरतो. जेव्हा त्या अनुभवांना नाटककारांच्या व्यक्तिमत्त्वाचा स्पर्श होतो तेव्हा ते अर्थपूर्ण होतात. कलानिर्मिती होते.

मला वाटते श्री. सतीश कामत यांच्या 'छिन्न'वरील प्रतिक्रियेला एवढे स्पष्टीकरण पुरेसे आहे.

—विनया खडपेकर

चित्रपट । सदानंद बोरसे

# जानकी

### कथा ही (आधुनिक) राम–जानकीची

पुणजी नावाची एक अयोध्यानगरी होती. तेथे श्रीराम (डॉ. श्रीराम लागू) नावाचे सावंतकुलतिलक सुखाने संसार करीत होते. या श्रीरामांचे दशरथ आधीच स्वर्गवासी झाले होते, कौसल्या (सुमती गुप्ते) मात्र जिवंत होती आणि श्रीराम, त्यांची पत्नी जानकी (सीमा) आणि मुलगी उमा (उषा नाईक) यांचा हसता–खेळता संसार ती डोळे भरून पाहात होती.

एक दिवस या श्रीरामांना प्रमोशनचा अभिषेक करण्याचे त्यांच्या मॅनेजरने (अशोककुमारने) ठरविले. या प्रकरणात त्यांच्या ज्येष्ठ (सीनिअर) सहकाऱ्याचा—जनार्दनचा—प्रमोशनपदावरील कायदेशीर ज्येष्ठताहक्क डावलला गेल्याने त्याने व चंपा नावाच्या मंथरेने श्रीरामांना मारण्याचा घाट घातला; पण ते सगळे फसले. जनार्दन रेल्वे-अपघातात मारला गेला. 'आपल्या हातून चंपाचा खून झाला,' या भीतीने श्रीरामांनी आपले 'प्रमोशनपदच काय, पण जानकीचाही त्याग केला आणि ते वनवासात गेले.

श्रीरामांच्यानंतर त्यांच्या पादुकांची पूजा करीत जानकीने कौसल्या आणि श्रीरामांची अमानत उमाला सांभाळले, त्यासाठी मिल—मजुरी केली, मुंबई नावाच्या अशोकवनात राक्षसांच्या गराड्यात राहूनही आपले पावित्र्य वगैरे सांभाळले. तेथे तिला तुकारामबापू (राजा गोसावी) नावाचा एक हनुमानही भेटला. अखेर बरोबर चौदा वर्षांनी श्रीराम वनवासातून परतले; पण हातून न झालेल्या (पण या न झालेल्या खुनाची माहिती नसलेल्या) खुनामुळे 'मी श्रीराम आहे,' हे त्यांना व जानकीला सांगता येईना. अखेर एका स्मगलरशी लढत देण्याचे अग्नि-

दिव्य करून, खुनाचा कबुलीजबाब देऊन त्यांनी प्राण पणाला लावले; पण तेवढ्यात तुकारामबापू व हनुमंताने करामत करून तो न झालेला खून झालाच नाही हे उघडकीला आणले आणि अक्षरशः शरयूच्या काठावरून श्रीरामांना परत आणले आणि मग–

'पुत्र / पती / पितृभेटीचा घडे महोत्सव!'

आणि समाप्त.

असे सुटा-बुटांतील आधुनिक रामायण. यातील संदर्भामध्ये स्थलकालपरिस्थितीनुसार बरेच फरक केले आहेत. उदाहरणार्थ–मूळ रामायणात मारुती बालब्रह्मचारी असला, तरी यातील मारुती–तुकारामबापू विधुर असून पुढे त्यांनी आपल्या एकुलत्या मुलाला –महेशला श्रीरामांची मुलगी उमा घेऊन त्यांच्याशी नातेसंबंधही प्रस्थापित केला, किंवा मूळ रामायणात बिभीषण हा रावणाचा भाऊ असला, तरी या रामायणात धर्माप्पाशेट (धुमाळ) आणि मदन (अशोक सराफ) या रावण–बिभीषणाचे नाते बाप आणि मुलाचे आहे. तेव्हा मूळ कथेचा थोडा जुनाट गंज घालविण्यासाठी आणि थोडा अप-टू-डेट् रंग चढविण्यासाठी असे मामुली बदल केले असले, तरी वाल्मीकीचा रामायणाचा मूळ ढाँचा मात्र तोच ठेवला आहे.

या रामायण कथेची पटकथा बनविताना मधुसूदन कालेलकरांनी अक्षरशः नवरस (नवग्रहांप्रमाणे) एकेक करून पालथे घातले. त्यासाठी काही जुन्या चित्रपटांमधील प्रसंग (उदा. अशोक सराफ अर्थात मदनकुमार तुकारावापूंना आपल्या आगामी चित्रपटाची कथा ऐकवतो,' तो प्रसंग म्हणजे सही सही 'प्यार किये जा' मधील मेहमूदचा कथाकथनाचा प्रसंग. एकूणच या चित्रपटातील मदनची व्यक्तिरेखा ही मेहमूदच्या 'प्यार किये जा'मधील हिंदी व्यक्तिरेखेचा मराठी स्वैर अनुवाद वा आविष्कार होता.) आणि गाणी ('हम काले हैं तो क्या हुआ', 'माना जनाब ने पुकारा नहीं' आणि 'बाई ग केळेवाली मी' या तिन्ही गाण्याच्या चालींची गाणी आणि त्यावेळी मदनने अनुक्रमे मेहमूद, देव आनंद व दादा कोंडके यांच्या केलेल्या नकला अर्थात अशोक सराफांनी केलेला नकलांचा प्रयत्न) वेठीला धरली. हसू, आसू, रुसू इत्यादी इत्यादी सर्व रसू वापरून बेतलेली ही पटकथा. त्यात संवादांचे छापील खिळेही मधुसूदन कालेलकरांनीच वाजवलेले. मग त्यात विधवेचे गरोदरपण अर्थात पावित्र्यभंग अर्थात शील-भ्रष्टता अर्थात व्यभिचार अर्थात अनीती–अधर्म अर्थात नीतीचे पाठ अर्थात वासना विरुद्ध पावित्र्याचा कज्जा इत्यादी इत्यादी एकाच विषयावरील ठराविक परंपरागत झिजवट खिळे वापरून टाकले.

इतके सगळे असूनही 'जानकी' हा चित्रपट प्रेक्षणीय बनविला आहे तो कलाकारांनी. यात सिंह आणि सिंहिणीचा वाटा डॉ. श्रीराम लागू आणि सीमा यांचा डॉक्टरांच्या कोणत्याही भूमिकेमध्ये सतत 'लागू' डोकावत असतात, त्यांची बोलण्याची लकब, मान किंचित तिरकी करून पाहण्याची ढब आता तीच तीच झाली असे आक्षेप त्यांच्या हल्लीच्या बऱ्याच भूमिकांबद्दल घेतले गेले होते. हे सर्व आक्षेप त्यांनी श्रीराम सावंतच्या भूमिकेने पुसून टाकले. तशी ही व्यक्तिरेखा एका सामान्य संसारी माणसाची. मुखात हसणारा, संकटाच्या वादळात हेलपाटलेला, अगतिक झालेला हा माणूस त्याच्या सामान्यपणासकट डॉक्टरांनी उभा केला. विशेषतः कालेलकरांच्या निर्जीव संवादातसुद्धा आपल्या अत्यंत सहज आणि अकृत्रिम संवाद फेकीने जान आणली. (हे कसब बाकी कलाकारांपैकी फक्त राजा गोसावी, अशोक सराफ आणि काही प्रमाणात धुमाळला साधले.) बऱ्याच ठिकाणी संवादांमध्ये असलेला छापीलपणा सोडल्यास सीमाने उभी केलेली जानकी सुरेख. बाकी अशोक सराफ, राजा गोसावी, धुमाळ, रमेश देव आणि सुमती गुप्ते या कलाकारांनीही आपापल्या भूमिका नीट उभ्या केल्या. उषा नाईकने आपल्या कामातील सहजता दाखविण्याचा व त्यासाठी बालिश, लाडीक बोलण्याचा कृत्रिम अट्टाहास करण्याची जरूर नव्हती. ती बरी नाचते, एवढे खपवून घ्यायची प्रेक्षकांची तयारी असते.

दिग्दर्शक वसंतराव जोगळेकरांची बाकी कामगिरी ठीक असली; तरी काही गोष्टी मला उलगडल्या नाहीत. १) सुरुवातीच्या 'होडी चाले लाटेवरी, कोण चालवी उमगेना' या गीताला एकच जोडपे एकदा शहरी, एकदा कोळ्याच्या अशा वेगवेगळ्या वेषात आणण्याचा हेतू काय ? (माझे केलेले ओढाताण उलगडे-एक हेतू विविधता. दुसरा हेतू अटळ पण अज्ञात नियती हे जे गाण्याचे सूत्र त्याची स्थलकालनिरपेक्षता दाखविणे. आता पहिला हेतू असेल तर पोषाखाबरोबर जोडपीही बदलायची म्हणजे विविधता वाढली असती. दुसरा हेतू असेल तर एकदा पुरुष आधुनिक शहरी पोषाखात तर स्त्री मोहेंजोदडो हडप्पाच्या वेषात, मग दुसऱ्या वेळी पुरुष वा स्त्री तोच वा तीच ठेवून अनुक्रमे स्त्री वा पुरुष बदलणे. या सगळ्यातून त्या सूत्राची व्यक्तिनिरपेक्षताही दिसली असती आणि स्थलकालनिरपेक्षताही अधिक ठसली असती. असो या व्यतिरिक्त एखादा तिसरा हेतू असला; तर तो सांगावा. त्यातही एखादी मौलिक सूचना करता येईल.) २) काळ ही स्थितप्रज्ञ वस्तू प्रत्येकाला सारखी वागणूक देते. चौदा वर्षांमध्ये बाकी सगळ्यांमध्ये शारीरिकदृष्ट्या बराच फरक पडूनही जानकी मात्र अजिबात बदलली नाही. किंवा तुकारामबापूंच्या मिश्यां चौदा वर्षांमध्ये पिकल्या पण डोईवरचा केस न् केस काळा कुळकुळीत. या रहस्यांचे उलगडे आम्हाला एखाद्या ब्यूटी पार्लरमध्ये वा हेअर डायमध्येच होऊ शकतील. ३) धर्माप्पा शेटजी जानकीने सांगितलेल्या यादीप्रमाणे सामानाच्या पिशव्या घेउन तिच्याकडे येतो, पिशव्या खाली ठेवतो, तो लघळपणा करू लागताच जानकी त्याला घालवून देते, श्रीरामच्या आठवणीने ती कोपऱ्यात जाऊन रडू लागते, पिशव्या तेथेच असतात, रडतच राहते, पिशव्या कोणीही हलवलेल्या नाहीत; कारण जानकी घरात एकटी आणि ती रडत बसलेली, संध्याकाळ होते, उमा आणि आजी देवळातून घरी येतात, घरामध्ये मिट्ट काळोख, आजी दिवा लावते, जानकी रडत बसलेली, पिशव्या मात्र पाहता पाहता गायब.

अर्थात अशा बऱ्याच गोष्टींचा उलगडा करून देण्याची जबाबदारी रंगभूषाकार, कला–दिग्दर्शक इत्यादी व्यक्तींवर सोपवून वसंतराव जोगळेकर बाजूला होऊ शकतात आणि अशा न उलगडणाऱ्या गोष्टी दाखविणाऱ्या प्रेक्षकांना 'टीकाकार, समीक्षक' असे हिणवून मधुसूदन कालेलकरांच्या मदतीने चित्रपटातून टोमणेही मारू शकतात. आणखी एका गोष्टीचा उल्लेख करायला हवा. चित्रपटाची लांबीही बरेच प्रसंग आटोपते घेऊन खूपच कमी करता आली असती.

चित्रपटाची गीते सुधीर मोघे यांची तर संगीत हृदयनाथ मंगेशकरांचे. 'विसरू नको, श्रीरामा, मला,' 'झुलतो बाई रासझुला' आणि 'घुंगरू तुटले रे' ही गीते गोड असली; तरी चालींमध्ये नाविन्य काही नाही. त्या दृष्टीने 'होडी चाले लाटेवरी' हे गीत जास्त आकर्षक.

ही ताकदवान कलावंत मंडळी भेटली नसती; तर या आधुनिक रामायणातील जानकीवर केव्हाच राम म्हणण्याची पाळी आली असती. ☐